| सभा दिनांक | प्र. क्र. | विषय | ठराव क्र. | विभाग |
|---|---|---|---|---|
| १८/४/०६ | १ | दि. १८/११/२००५ व दि. १७/१२/२००५ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | १ | सचिव |
| १८/४/०६ | २ | नागरीकांचा जाहिरनामा मंजुरी देणेबाबत. | २ | सा. प्र. |
| १८/४/०६ | ३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये दि. २०/०९/२००५ रोजी ठराव क्र. ४१ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांचे विसर्जन करणे. | ३ | सचिव |
| १८/४/०६ | ४ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत. | ४ | सचिव |
| १८/४/०६ | ५ | प्राथमिक विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण सुरु करणेबाबत. | ५ | सा. प्र. |
| १८/४/०६ | ६ | मंजूर विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मौजे-उत्तन व पाली स.क्र. ६५ स.क्र. २५ एकूण क्षेत्र ३१.४६ हेक्टर या जागेतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता मंजूर विकास योजनेत फेरबदल करुन १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणे. | ६ | नगररचना |
| १८/४/०६ | ७ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेबाबत. | ७ | नगररचना |
| /०६ | ८ | जकात प्रारुप नियमांना मंजुरी देणेबाबत. | ८ | जकात |
| ०६ | ९ | महानगपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती मंजूर करणे बाबत. | ९ | आस्थापना |
| १८/४/०६ | १० | आरोग्य विभागातील विविध कामांना प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. | १० | आरोग्य |
| १८/४/०६ | ११ | सार्वजनिक रस्ते घोषित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | ११ | सा. बां. |
| १८/४/०६ | १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | १२ | सा. बां. |
| १८/४/०६ | १३ | मालमत्ता हस्तांतरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | १३ | कर |
| १८/४/०६ | १४ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०६/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तींच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत. | प्रस्ताव फेटाळ-ण्यात आले. | परवाना |
| १८/०६ | १५ | सन्मा. सदस्य श्री. शशीकांत आर. शाह यांचे दिनांक ०७/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीमधील विविध दराने झालेली कर आकारणी समान दराने करणे बाबत. | १४ | कर |
| १८/४/०६ | १६ | सन्मा. सदस्य श्री. गजानन लक्ष्मण भोईर यांचे दिनांक ३०/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ रोजीचा ठराव क्र. ९४) | प्रस्ताव फेटाळ-ण्यात आले. | आस्थापना |
| १८/४/०६ | १७ | सन्मा. सदस्य श्री. शशीकांत आर. शाह यांचे दिनांक १२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- "जैन मंदिर बावन जिनालय" भाईंदर (प.) सभोवती "ना फेरीवाला क्षेत्र" घोषित होऊनही त्या ठिकाणी फेरीवाल्यांना बसण्यास सहाय्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करणेबाबत. | १५ | अतिक्रमण |
| १८/४/०६ | १८ | सन्मा. सदस्य श्री. शुभांगी सिताराम नाईक यांचे दिनांक १२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हॉस्पीटल होणेबाबत. | प्रस्ताव फेटाळ-ण्यात आले. | सा. बा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८/५/०६ | -- | मा. महासभा तहकुबी ठराव | १६ | सचिव |
| १८/५/०६ | -- | दुखःवठा ठराव | १७ | सचिव |
| १८/५/०६ | १९ | दि. २०/०१/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | १८ | सचिव |
| १८/५/०६ | २० | सन २००५-०६ सालातील जकात वसुली बाबत आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आणि अभिकर्ता मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा.लि. ह्यांच्यातील वादाबाबत (Dispute) मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले दि. ५/५/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १३ मंजुर करणे बाबत. | १९ | जकात |
| १८/५/०६ | २१ | मंजुर विकास योजनेत मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ७४७ या जागेत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कब्रस्तान स्मशानभुमी, बरेल ग्राऊन्ड व बगिचा आरक्षण प्रस्तावित करणेबाबत. | तहकुब | नगररचना |
| १८/५/०६ | २२ | विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १९२, १९३ मधील नियोजित रक्तपेढी, वातानुकुलित शवागृह, दवाखाना व वाचनालय इमारतीवर दवाखाना व प्रभाग कार्यालयाकरिता वाढीव दोन मजले बांधणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | २० | सा. बां. |
| १८/५/०६ | २३ | विकास आराखड्यातील आरक्षण क्र. २६२ ''टाऊन पार्क'' विकसित करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | २१ | सा. बां. |
| १८/५/०६ | २४ | मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ नुसार बंद न केलेल्या दुभाजकातील प्रवेशाची माहिती देणे. | २२ | सा. बां. |
| १८/५/०६ | २५ | गटनेत्यांना केबिन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | तहकुब | सा. बां. |
| १८/५/०६ | २६ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० पोटकलम १ अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत. | २३ | सचिव |
| १८/५/०६ | २७ | सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर यांचे दिनांक ०३/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. | प्रस्ताव फेटाळ-ण्यात आले. | आस्थापना |
| १८/५/०६ | २८ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १०/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तींच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत. | | नगररचना |
| १८/५/०६ | २९ | सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक १२/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विकास आराखड्यातील आरक्षणे हस्तांतरीत करुन घेण्याबाबत. | | नगररचना |
| १८/५/०६ | ३० | सन्मा. सदस्य श्री. शशीकांत जगन्नाथ भोईर यांचे दिनांक १२/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव -- समान घरपट्टी कर आकारणी करण्यास अधिकारी टाळाटाळ करीत आहेत अशा अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसारन कारवाई करणेबाबत. | | कर |
| २०/६/०६ | ३१ | दि. २०/०३/२००६ व दि. ३१/०३/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | २४ | सचिव |
| २०/६/०६ | ३२ | मा. वृक्षप्राधिकरण सदस्यांना सभेचे मानधन देणेबाबत. (मा. वृक्षप्राधिकरण समिती सभेने शिफारस केलेले दि. २०/०५/२००६ रोजीचे प्रकरण क्र. ३६) | २५ | सचिव |
| २०/६/०६ | ३३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नऊ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे. | २६ | सचिव |
| २०/६/०६ | ३४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पॅथॉलॉजीकल लॅब सुरु करणेबाबत. | २७ | आरोग्य |
| २०/६/०६ | ३५ | महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीवर पाचवा व सहावा मजला बांधणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | २८ | सा. बां. |
| २०/६/०६ | ३६ | संगणकचालक/लघुलेखक नेमणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | २९ | आस्थापना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०/६/०६ | ३७ | घोडबंदर येथिल उघाडीचे दरवाजे दुरुस्ती करणे बांधकाम बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. | ३० | सा. बां. |
| २०/६/०६ | ३८ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावली (Appendix - XX) मध्ये फेरबदल करणेबाबत. | ३१ | नगररचना |
| २०/६/०६ | ३९ | महापौर निधी वितरणाबाबत धोरण ठरविणे. | ३२ | सा. प्र. |
| २०/६/०६ | ४० | मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन बांधा, वापरा व हस्तांतरित करा ह्या तत्त्वावर खतनिर्मिती प्रकल्प उभारणेबाबत. | ३३ | आरोग्य |
| २०/६/०६ | ४१ | पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे. | ३४ | आस्थापना |
| २०/६/०६ | ४२ | कर्मचारी / अधिकारी वर्गाची पदोन्नती व सरळसेवाने केलेल्या नेमणुकीच्या माहितीसह मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे. | ३५ | आस्थापना |
| २०/६/०६ | ४३ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १४/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मांस मटण विक्री दुकाने परवाना विषय व कत्तलखाना बाबत. | ३६ | नगररचना |
| २०/६/०६ | ४४ | सन्मा. सदस्य श्री. केशव रामभाऊ घरत यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. | सदस्य उप-स्थित नस-ल्याने प्रस्ताव फेटाळ-ण्यात आला. | आस्थापना |
| [illegible]/६/०६ | ४५ | सन्मा. सदस्या श्रीम. अनिता जयवंत पाटील यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- प्रशासकिय इमारतीस नाव देणे बाबत. | | सा. बां. |
| २०/६/०६ | ४६ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- नगरभवन इमारतीस नांव देणेबाबत. | | सा. बां. |
| २०/६/०६ | ४७ | सन्मा. रोहिदास आत्माराम पाटील यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका सभागृहास नांव देणेबाबत. | | सा. बां. |
| २०/६/०६ | -- | दुखःवठा ठराव | ३७ | सचिव |
| २०/७/०६ | ४८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी नवीन (आठ) सदस्यांच्या नेणमुकीकरिता.<br>दिनांक १ ऑगस्ट, २००६ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.<br>१) श्री. मोहन मधुकर पाटील ५) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील<br>२) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर ६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील<br>३) श्री. मिलन गोविंदराव पाटील ७) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र<br>४) श्री. केशव रामभाऊ घरत ८)श्री. गजानन लक्ष्मण भोईर | ३८ | सचिव |
| २०/७/०६ | ४९ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. | ३९ | सचिव |
| २०/७/०६ | — | दुखःवठा ठराव | ३९अ | सचिव |
| २१/८/०६ | ५० | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम १ अन्वये दि. १८/०५/२००६ रोजी ठराव क्र. २३ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांवर सदस्यांची ठरावाद्वारे नावे घोषित करणे. | ४० | सचिव |
| २१/८/०६ | ५१ | बंदिस्त बाल्कनी साठीच्या दंडनिय शुल्काच्या आकारणीसाठी फेरविचार करणेबाबत. | ४१ | नगररचना |
| २१/८/०६ | ५२ | महापालिका कराची वसुली मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी मालमत्ताधारकांना प्रोत्साहनपर मालमत्ता कराच्या रक्कमेवर बट्टा (सुट) देणेस मंजुरी मिळणेबाबत. | ४२ | कर |
| २१/८/०६ | ५३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दरास मंजुरी मिळणेबाबत. | ४३ | कर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | एकेरी मार्ग याबाबत स्थायी समितीने शिफारस केलेल्या महासभा ठराव क्रमांक ६७ अन्वये नो पार्किंग झोन व एकेरी मार्ग निर्णय होणेबाबत. | | |
| २०/९/०६ | ७१ | सन्मा. सदस्य श्रीम. रिटा सुभाष शाह यांचे दिनांक १५/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बिगर मंजुर नकाशा बांधकामाबाबत. | ण्यात आले. | अतिक्रमण |
| २०/९/०६ | ७२ | सन्मा. सदस्य श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भोला नगर येथील विस्थापित झालेल्या लोकांचे पुर्नवसन करणेबाबत. | | सा. बां. |
| २०/९/०६ | ७३ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत. | प्रस्ताव फेटाळ- | नगररचना |
| २०/९/०६ | ७४ | सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मौजे मुर्धे मोर्वा येथिल इलेक्ट्रॉनिक पार्क झोन बाबत महापालिकेचे धोरण स्पष्ट करणेबाबत. | ण्यात आले. | नगररचना |
| २०/९/०६ | -- | दुखःवठा ठराव | ५८ | सचिव |
| १२/१०/०६ | ७५ | दि. २०/०६/२००६ व दि. २०/०७/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | ५९ | सचिव |
| [illegible]/१०/०६ | ७६ | रस्त्यांना नावे देण्याबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २७/०७/२००६ रोजीचे प्रकरण क्र. ६० व दि. ३१/०८/२००६ रोजीचे प्रकरण क्र. ९४) | ६० | सार्व. बांधकाम |
| १२/१०/०६ | ७७ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी करिता सानुग्रह अनुदान देणे बाबत. | ६१ | आस्थापना |
| १२/१०/०६ | ७८ | काजुपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणिपुरवठा पाईप लाईन टाकणे कामी जागा दिलेल्या प्रकल्प ग्रस्तांना महानगरपालिकेच्या अस्थापनेवर कायमस्वरूपी नेमणूक देणे बाबत. | ६२ | आस्थापना |
| १२/१०/०६ | ७९ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०५/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मालमत्ता नावात फेरबदल बाबत. | | कर |
| १२/१०/०६ | ८० | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०५/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत. | | नगररचना |
| १२/१०/०६ | ८१ | सन्मा. सदस्य श्रीम. रिटा सुभाष शाह यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बिगर मंजुर नकाशा बांधकामाबाबत. | | अतिक्रमण |
| १२/१०/०६ | ८२ | सन्मा. सदस्या श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, भोला नगर येथील लोक विस्थापित झाले. योजनेत रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्यांना प्राधान्य देऊन घरे उपलब्ध करून देण्यात यावीत असे स्पष्ट निर्देश शासनाने मनपाकडे दिले आहेत. आरक्षण क्र. २२२ व २२२ अ (बेघरांसाठी घर) या जागेच्या मालकाने / विकासकाने १०१ सदनिका मनपाकडे दि. १६/०८/२००६ रोजी विनामुल्य हस्तांतरीत करणार आहेत असे लेखी पत्र दिले आहे. तरी मनपा ने १०१ सदनिका ताब्यात घेऊन विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ९ टेबल ३-१ ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्तापीत होणाऱ्या झोपडीधारकांना सदरील घरे देऊन पुर्नवसन करणे व घरे वाटप करण्याबाबत मनपाने धोरण निश्चीत करून योग्य निर्णय घेणेबाबत. | गोषवा-ऱ्यासह प्रस्ताव पुढील सभेत घेण्याचे ठरले. | नगररचना |
| १२/१०/०६ | ८३ | सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ गजानन पाटील यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. | | आस्थापना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | खरेदीस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत. | | |
| २१/१२/०६ | ९८ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. | तह-कुब | आस्थापना |
| २१/१२/०६ | ९९ | मालमत्ता नोंदणी करण्यासाठी महानगरपालिकेचा नाहरकत दाखला देणेबाबत विचार विनिमय करणे. | ७५ | कर |
| २१/१२/०६ | १०० | श्री. संजय काकडे, शाखा अभियंता यांना महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त पदांवर कायम स्वरुपी सामावून घेणेबाबत निर्णय घेणे. | तहकुब | आस्थापना |
| २१/१२/०६ | १०१ | महानगरपालिकेकडून शिक्षण मंडळाला रक्कम वर्ग करणेबाबत. | ७६ | लेखा |
| २१/१२/०६ | १०२ | वाढीव पाणी पुरवठ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | ७७ | पा. पु. |
| २१/१२/०६ | १०३ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-३ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याबाबत अवलोकनार्थ. | ७८ | आस्थापना |
| २१/१२/०६ | १०४ | सन्मा. सदस्य श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर यांचे दिनांक ३०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिका आस्थापनेवरील ५३८ कर्मचाऱ्यांच्या सेवा जेष्ठतेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. २३/०३/२००५ रोजी पारित झालेला ठराव क्र. १७९ नुसार कार्यवाही करणेबाबत. | ७९ | आस्थापना |
| २१/१२/०६ | १०५ | सन्मा. सभापती, प्रभाग समिती क्र. २ श्री. महेंद्रसिंह चौहान यांचे दिनांक ३०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मा. महासभा ठराव क्र. ५७ दि. १९/१०/२००५ अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा कालावधी माहे मार्च २००७ अखेरपर्यंत वाढविण्याबाबत. | ८० | कर |
| [illegible]/१२/०६ | १०६ | सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक ३०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणेबाबत. | ८१ | |
| २१/१२/०६ | १०७ | सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर यांचे दिनांक ३०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शासनाच्या नियमानुसार बदलीबाबतच्या तिन वर्षाच्या कालावधीचा विचार करून प्रशासनाने नुकत्याच बदली केलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत. | ८२ | आस्थापना |
| २१/१२/०६ | १०८ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०१/१२/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तीच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत. | ८३ | नगररचना |
| २१/१२/०६ | -- | दुखःवठा ठराव | ८४ | सचिव |
| २०/०१/०७ | १०९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(२) अन्वये मा. परिवहन समितीच्या रिक्त होणाऱ्या सहा (६) सदस्यांच्या जागी नवीन (सहा) सदस्यांच्या नेणमुकीकरिता.<br>**दिनांक १ फेब्रुवारी २००७ रोजी निवृत्त होणाऱ्या परिवहन सदस्यांची नावे खालील प्रमाणे :-**<br>१) श्रीम. उमा श्याम पाटील    ४) श्री. रेनॉल्ड बेचरी<br>२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी    ५) श्री. प्रशांत पालांडे<br>३) श्री. अशोक तिवारी    ६) श्री. श्याम मदने | ८५ | सचिव |
| २०/०१/०७ | ११० | दि. १२/१०/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. | ८६ | सचिव |
| २०/०१/०७ | १११ | प्रभागनिहाय वॉर्ड साफसफाई करणे व घनकचरा व्यवस्थापन करण्याच्या कामाच्या प्रस्तावास मंजुरी देणेबाबत. | ८७ | आरोग्य |
| २०/०१/०७ | ११२ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेली दारिद्र्य रेषेखालील कुटुंब यादी मा. महासभेच्या निदर्शनास आणून देणे बाबत. | तहकुब | सुवर्ण जयंती |
| २०/०१/०७ | ११३ | सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांचे दिनांक १५/०१/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- दुकाने व अस्थापना यांच्या नाम फलकावर मराठी भाषेतील अक्षरे सर्व प्रथम लिहिली जाणे आवश्यक करणे | ८८ | सामान्य प्रशासन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | बाबत. | | |
| २०/०२/०७ | ११४ | दि. १७/११/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. | ८९ | सचिव |
| २०/०२/०७ | ११५ | परिवहन उपक्रमासाठी बस गाड्यांची पार्किंग करण्याकरिता महानगरपालिका विकास आराखड्यातील आरक्षणे परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. महासभेस विनंती करणे. (परिवहन समिती सभा दि. २०/१२/२००६ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. ५२ अ) | तहकुब | परिवहन |
| २०/०२/०७ | ११६ | परिवहन उपक्रमासाठी डेपो, (आगार) बस स्थानक बांधणेकरीता महानगरपालिका विकास आराखड्यातील आरक्षणे परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. महासभेस विनंती करणे. (परिवहन समिती सभा दि. २०/१२/२००६ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. ५२ ब) | तहकुब | परिवहन |
| २०/०२/०७ | ११७ | सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहान यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रिक्त असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुशेष भरणेबाबत. | नामंजुर | आस्थापना |
| २०/०२/०७ | ११८ | सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेच्या अस्थापनेवरील श्री. देविदास पाटील व श्री. संतोष पाटील, पद - शिपाई यांना दि. ०१/०६/१९९२ पासून कायम करून सेवाजेष्ठता व नियमानुसार असणारे सर्व फायदे देणेबाबत. | ९० | आस्थापना |
| ..०/०२/०७ | ११९ | सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ गजानन पाटील यांचे दिनांक १३/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर वाहन चालक पदावर नेमणूक करणेबाबत. | ९१ | आस्थापना |
| २०/०२/०७ | १२० | सन्मा. सदस्य श्री. लिओ इजिदोर कोलासो यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत. | नामंजुर | आस्थापना |
| २०/०२/०७ | १२१ | सन्मा. सदस्य श्री. शशिकांत आर. शाह यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारे सर्व परवाने (एन.ओ.सी.) मार्केट परवाना विभागामार्फत देणेबाबत . | ९२ | परवाना |
| १७/३/०७ | १२२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. २००) | ९३ | लेखा |
| १७/३/०७ | १२३ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १९९) | ९४ | लेखा |
| ..७/३/०७ | १२४ | मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १९८) | ९५ | लेखा |
| १७/३/०७ | -- | दुखःवठा ठराव | ९६ | सचिव |
| १७/३/०७ दु.३.०० वा. | १२५ | गितकार श्री. जगदीश खेबुडकर ह्यांचे अमृत महोत्सवा निमित्त महानगरपालिकेतर्फे नागरी सत्कार व मानपत्र देणेबाबत निर्णय घेणे. | | सा. प्र. |
| १७/३/०७ दु.३.०० वा. | १२६ | मा. महापौर व अधिकारी यांच्याकरिता कॉमन वेल्थ लोकल गर्व्ह. फोरम (लंडन UK) यांनी न्युझिलंड येथे आयोजित केलेल्या अभ्यास दौऱ्यांबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | कोरम अभावी सभा रद्द करण्यांत आली | सा. प्र. |
| १७/३/०७ दु.३.०० वा. | १२७ | सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचे दिनांक ०८/०३/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मा. न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हापरिषद ठाणे यांच्या ताब्यातील भाईंदर (प.) टेंभा व उत्तन पाली या दोन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती जागेसह महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घेणे व भाईंदर (प.) टेंभा येथे महानगरपालिकेची अद्यावयत हॉस्पीटल इमारत बांधणे कामी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन (१) (ज) नुसार मा. महासभेत निर्णयाकरिता ठेवणेबाबत. | | सा. बां. |

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२००६

**प्रकरण क्र. ०१ :-** दि. १८/११/२००५ व दि. १७/१२/२००५ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. १८/११/२००५ व दि. १७/१२/२००५ रोजीचे मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(2)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/४/२००६**

**प्रकरण क्रमांक २ :- नागरिकांचा जाहिरनामा**

**ठराव क्र.** २ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका ही नव्याने स्थापन झालेली आहे. नव्याने स्थापन झाल्याने शहरातील नागरीकांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत. नागरिकांच्या दैनंदिन गरजा, अडचणी, प्रभावीपणे सोडविण्यासाठी महानगरपालिकेने माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे महानगरपालिकेचे मुळ नियम, उपविधी शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे या बाबी विचारात घेऊन तसेच नागरीकांच्या अडचणी समयबद्ध वेळात निकाली काढण्यासाठी प्रशासनात पारदर्शकता, गतिमानता येण्यासाठी, नागरीकांच्या सोयी, सुविधा, कामे तत्परतेने होण्याच्या दृष्टीने नागरीकांचा जाहिरनामा तयार केलेला आहे. याबाबत सभागृहात चर्चा होऊन नगरसेवकांनी सुचविलेल्या दुरुस्त्यासह नागरीकांचा जाहिरनामा तयार करणेत येऊन सदर "जाहिरनाम्याची अंमलबजावणी" प्रभावीपणे करणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे. याबाबत प्रशासनाने लवकरात लवकर जाहिरात देऊन जाहिरनाम्याची तातडीने अमंलबजावणी करावी.

**सुचक :-**          **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**पीठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

महासभा- दि० १८/४/०६

प्रकरण क्र 3 -

ठराव — 3 मिरा- भाईंदर महानगरपालिका महासभा दि० २०/९/०५ रोजी ठराव क्र० ४१ अन्वये विशेष समित्या स्थापन केलेल्या होत्या. सदर समित्या स्थापन करताना मा० महासभेच्या विषयपत्रिकेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण 2 नियम 30 अन्वये विषय पत्रिकेवर विषय ~~आल~~ आलेला होता परंतू महासभेचा पारित केलेला ठराव व विषय हा विसंगत झाला असल्या कारणाने सदर ~~स~~ विशेष समित्या स्थापन करणेस तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे तरी ~~झाल्या कारणाने~~ सदर समित्या कलम 30 अन्वये विसर्जन करण्या असा मी ठराव मांडतो

सूचक :- श्री [illegible] बोर्जीस

अनुमोदक — अॅड. एस. ए. खान

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०४/२००६

प्रकरण क्र. ०४ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत.

ठराव क्र. ०४ :-

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये स्थापन करावयाच्या विशेष समित्यांवर पुढीलप्रमाणे सदस्यांची नांवे घोषित करण्यांत येत आहेत.

**समिती क्र. १** | **समितीचे नांव :- क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | सौ. अनिता जयवंत पाटील |
| २. | श्री. नितीन ठाकुर |
| ३. | सौ. ग्रिटा फॅरो |
| ४. | सौ. ज्युडी डिसोझा |
| ५. | सौ. उर्मिला भामरे |
| ६. | सौ. गिता जैन |
| ७. | सौ. उमा सपार |
| ८. | सौ. संगिता म्हात्रे |
| ९. | श्री. जयंत पाटील |

**समिती क्र. २** | **समितीचे नांव :- माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | सौ. हेलन गोविंद |
| २. | श्री. याकुब कुरेशी |
| ३. | सौ. जेन्वी आल्मेडा |
| ४. | श्री. मिलन पाटील |
| ५. | श्री. परशुराम म्हात्रे |
| ६. | सौ. रिटा शहा |
| ७. | सौ. मुक्ता रांजणकर |
| ८. | सौ. सुधा गोयंका |
| ९. | श्री. हंसुकुमार पांडे |

**समिती क्र. ३** | **समितीचे नांव :- आरोग्य परिरक्षण समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | श्री. रोहिदास आत्माराम पाटील |
| २. | श्री. महेंद्रसिंग चौहाण |
| ३. | श्री. सुर्यकांत भोईर |
| ४. | सौ. जयाबाई भोईर |
| ५. | श्री. ध्रुवकिशोर पाटील |
| ६. | सौ. सय्यद नुरजहाँ |
| ७. | ॲड. श्री. एस्. ए. खान |
| ८. | श्री. दिनेश नलावडे |
| ९. | श्री. चंद्रकांत मोदी |

| समिती क्र. ४ | समितीचे नांव :- गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
|---|---|
| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
| १. | श्री. चिंतामण पाटील |
| २. | श्री. रविंद्र माळी |
| ३. | सौ. ज्योत्स्ना हसनाळा |
| ४. | सौ. जिवी वाडे |
| ५. | श्री. हरेश गावंड |
| ६. | सौ. शानु गोहिल |
| ७. | सौ. लीला पाटील |
| ८. | श्री. अशोक पाटील |
| ९. | सौ. सुनिता पाटील |

याप्रमाणे सदस्यांच्या नावाच्या यादीसह विशेष समित्या स्थापन करणेबाबत ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## मा. महासभा दि.१८/०४/२००६

**प्रकरण क्र. ५ :- प्राथमिक विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण सुरू करणे बाबत.**

**ठराव क्र. ( ०५ )**

**मा. आयुक्त सो. हयांची हया विषयासंदर्भात टिप्पणी वाचन करण्यात आली.**

सध्याच्या विज्ञान युगामध्ये मानवाने मोठया प्रमाणावर प्रगती केली आहे. माहिती व तंत्रविज्ञान मध्ये देखील प्रगती झाली आहे. चालू स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना टिकून राहण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान हया बरोबरच संणकाची देखील आवश्यकता निर्माण झाली आहे. संगणक शिक्षण घेणे ही काळाची गरज होवून बसली आहे मिरा-भाईदर शहरातील प्रत्येक शाळेमध्ये संगणक शिक्षण सुरू झालेले आहे. मात्र महापालिकेच्या असलेल्या २९ शाळांमधील ९,६५६ शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना अद्यापर्यंत संगणक शिक्षण मिळत नसल्याने ते विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. महापालिका विद्यार्थ्यांना संगणक ज्ञान नसल्याने हे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडत आहेत. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य पुढील शिक्षण व उज्वल भविष्यासाठी स्पर्धेच्या युगामध्ये पुढे टिकून राहण्यासाठी प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देणे अत्यावश्यक आहे.

महापालिकेकडे संगणक तज्ञ नाहीत, संगणक शिक्षण नाहीत, संगणक दुरूस्ती करणारा स्टाफ नाही. ही कामे नियमितपणे महापालिकेद्वारे करणे अशक्य आहे. संगणक शिक्षण (ठेका पध्दतीने ) देणाऱ्या नामंकित संस्था मुंबईत व इतरत्र मोठया प्रमाणावर आहेत अशा संस्थांकडे संगणक तज्ञ व संगणक शिक्षण व पुरेसा स्टाफ उपलब्ध असतो. संगणक शिक्षण देण्यासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे भांडवली व नैमित्तिक खर्च मोठया प्रमाणावर करावा लागणार असल्याने तो (गुंतवणूक करावा लागणारा खर्च, व्याप्ती) विचारात घेता संगणक शिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित अनुभवी संस्थेकडून १० वर्षे मुदतीसाठी ठेका पध्दतीने निविदा मागवून संगणक शिक्षण देण्यास हि सभा मंजूरी देत आहे. तसेच संगणक शिक्षण देणेसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे खालील प्रमाणे संगणक लॅब बांधणे आवश्यक आहे. सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग मिरा-भाईदर महानगरपालिका यांच्याकडून रितसर होणे आवश्यक आहे. त्याकरिता येणाऱ्या खर्चाचा तपशिल व अंदाजपत्रकीय खर्च खालीलप्रमाणे असून सदर खर्चास व अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यास येत आहे. सदर कामांसाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षाच्या अर्थ संकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

## मिरा-भाईदर महानगरपालिका प्राथमिक शाळामध्ये संगणक लॅब बांधण्यास अंदाजपत्रकीय खर्च

| अ.क्र. | प्रभाग क्र. | शाळेचे नांव | सिव्हील वर्क | इलेक्ट्रीक वर्क | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३ | काशी मराठी शाळा क्र.४ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| २ | १३ | काशी उर्दु शाळा क्र.५ | | | |
| ३ | ०८ | नवघर मराठी शाळा क्र.१३ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| ४ | ०८ | नवघर हिंदी शाळा क्र.२९ | | | |
| ५ | ०२ | मुर्धा मराठी शाळा क्र.२२ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/- |
| ६ | ०२ | मुर्धा खाडी गुजराथी क्र.२३ | | | |
| ७ | ०२ | राई मराठी शाळा क्र.२५ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| ८ | ०२ | राई गुजराथी शाळा क्र.२६ | | | |
| ९ | १७ | भाईदर मराठी शाळा क्र.१६ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/- |
| १० | १७ | भाईदर गुजराथी शाळा क्र.१८ | | | |
| ११ | १७ | भाईदर हिंदी शाळा क्र. १७ | | | |
| १२ | १० | काजुपाडा मराठी क्र.३ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| १३ | १३ | मिरा मराठी शाळा क्र.२० | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| १४ | १२ | पेणकरपाडा मराठी शाळा क्र.१४ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/- |
| १५ | ११ | माशाचा पाडा मराठी शाळा क्र.१९ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| १६ | १० | घोडबंदर मराठी शाळा क्र.९ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/- |
| १७ | १० | रेती बंदर मराठी शाळा क्र.२७ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| १८ | १० | वर्सोवा मराठी शाळा क्र.२८ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | १० | चेणा मराठी शाळा क्र.१० | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/- |
| २० | १२ | मिरारोड गुजराथी शाळा क्र.२१ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| २१ | २५ | गोडदेव मराठी शाळा क्र.८ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/- |
| २२ | २४ | खारी मराठी शाळा क्र.६ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| २३ | ०६ | बंदरवाडी मराठी शाळा क्र. १५ | रू.४,१२,९६३/- | रू.३०,३५१/- | रू.४,४३,३१४/- |
| २४ | ०१ | मोर्वा मराठी शाळा क्र.२४ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/ |
| २५ | १८ | उत्तन मराठी शाळा क्र.१ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/ |
| २६ | १८ | उत्तन उर्दू शाळा क्र.२ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/ |
| २७ | ०१ | मोर्वा मराठी शाळा क्र.२४ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/ |
| २८ | ०१ | चौक मराठी शाळा क्र.११ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/ |
| २९ | ०१ | डोंगरपाली मराठी शाळा क्र.१२ | रू.१,५१,४४५/- | रू.३०,३५१/- | रू.१,८१,७९६/ |
| | | | | **एकूण** | **रू.७०,५८,००६/-** |

प्राथमिक शाळांचे सन २००६-०७ हे शैक्षणिक वर्ष जून २००६ पासून सुरु होत असून हया वर्षापासूनच संगणक शिक्षण सुरू करणे आवश्यक असल्याने शैक्षिणिक वर्ष सुरू होण्यासाठी राहिलेला कालावधी अल्प असल्याने सदर कामे युध्दपातळीवर करणे अनिवार्य ठरत आहे. हया सर्व तांतडीच्या बाजू विचारात घेता सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावानुसार तातडीने कार्यवाही करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :-** श्री हेरल बोर्जीस **अनुमोदन :-** श्री शशिकांत शेठ

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**पिठासन अधिकारी**

# मिरा-भाईदर महानगरपालिका.

## मा. महासभा दि.१८/०४/२००६

## // महासभा //

**ठराव क्र.** ६

**प्रकरण** :- ०६ मंजूर विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मौजे –उत्तन व पाली स.क्र. ६५ स.क्र. २५ एकूण क्षेत्र ३१.४६ हेक्टर या जागेतील धनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा करिता मंजूर विकास योजनेत फेरबदल करून १५.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित करणे.

मिरा-भाईदर शहराची विकास योजना दि.१४/०५/९७ रोजी मंजूर झाली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झाली असून दि.१५/१०/२००० पासुन अमंलात आलेली आहे.

मौजे-पाली स.क्र. ६५ क्षेत्र १०.७२ हे. व मौजे -उत्तन स.क्र.२५ क्षेत्र २०.७४ हे.असून एकूण क्षेत्र ३१.४६ हे. आहे. ही शासकीय जागा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता मिळणेबाबत जागा मागणी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचे कडे दि.२१/१२/२००२ रोजी सादर करण्यात आला होता. सदरची जागा मागणीच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.महसूल/ कक्ष-१/टे-१/एलबीपी /कवि -१५७२/२००२ दि.२६/१२/२००२ अन्वये आगाऊ ताबा देणेबाबत मंजूर झाले असुन दि.३१/१२/२००२ रोजी उपरोक्त नमुद क्षेत्रासाठी ७/१२ अभिलेखात इतर हक्कात मिरा-भाईदर महानगरपालिका नाव नोंदविण्यात आले आहे.

केंद्रं शासनाच्या पर्यावरण व वनविभागाने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० तयार केले असून सदर नियमांची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. सदरच्या नियमानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा दि.२१/१२/२००२ पूर्वी ताब्यात असणे बंधनकारक होते. त्याअनुषंगाने विहित कालमर्यादेत महानगरपालिकेने जागा ताब्यात घेतली आहे. तथापी सदर जागेत जाणेयेणे साठी पोहच रस्ता उपलंब्ध नसल्याने मोजणी नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-उत्तन स.क्र.१७८ डी व स.क्र.४३ सी. हि.क्र.१ स.क्र.१७८सी, स.क्र.२९७ या खाजगी मालकीच्या जागेतून १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर जागेचा वापर सार्वजनिक प्रयोजनार्थ करावयाचा असल्यामुळे मंजूर विकास योजनेत १५.००मी.रुंद रस्ता आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक:- [signature] [signature] अनुमोचक:- ॲड. एस. ए. खान [signature]

**ठराव सर्वानुमते मंजूर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१८/०४/२००६

**प्रकरण क्र.०७ :-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मिरा-भाईदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. :-** ०७

मिरा-भाईदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह काही भाग वगळून शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९६/८४७/ सीआर/९६/नवी-१२ दि.१५ मे.१९९७ अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/नवी -१२, दि.२५ ऑगस्ट २००० अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. सदर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दि.१५ जुलै १९९७ व दि.१५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे.

त्यानंतर दि.२८ फेब्रवारी २००२ रोजी मिरा-भाईदर नगरपरिषदेचे रुपांतर मिरा-भाईदर महानगरपालिकेत झालेले आहे. त्यामुळे सदर विकास नियंत्रण नियमावलीत प्रशासकीय स्वरुपाचे फेरबदल करणे आवश्यक झाल्यामुळे शासनाकडे मंजूरीसाठी विहित कार्यवाही करून प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१(५) अंतर्गत तरतूदीनुसार शासन निर्णय क्र. टीपीएस-१२०४ /७११ / सीआर-२१९/०५/नवी, दि.०३ ऑगस्ट २००४ अन्वये मंजूरी दिलेली आहे. अशा प्रकारे वरीलप्रमाणे मंजूर झालेली विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सद्यस्थितीत अंमलात व अस्तित्वात आहे.

सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल व काही नवी तरतूदी सामाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत फेरबदलाही कार्यवाही करण्यासाठी मा. महासभा ठराव क्र. ८ दि.१३/०४/२००५ रोजी प्रस्तावास मंजूरी दिलेली होती त्याअनुषंगाने दि.२६/११/२००५ रोजी दैनिक नवशक्ती व दै. वार्ताहर या वृत्तपत्रात जाहिर सुचना देवून संबधितांच्या सुचना व हरकती मागविलेला होत्या. तसेच सदर सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०८/१२/२००५ प्रसिध्द झालेली होत्या. त्याअनुषंगाने काही सुचना व हरकती प्राप्त झालेल्या होत्या. सदर सुचना व हरकत दारांची सुनावणी दि.०३/०२/२००६ रोजी घेवून ~~आहे~~. प्रस्तावित फेरबदलासह विकास नियंत्रण नियमावलीची मसुदा पुस्तीका पृष्ठ क्र. (१ ते २०५) तयार करण्यात आलेली आहे. सदर पुस्तिकेत खालीलप्रमाणे दुरुस्ती / बदल करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पृष्ठ क्र. | विनियम क्र. | दुरुस्ती / बदल |
|---|---|---|---|
| १ | २ | ४(vi) | वगळण्यात यावे |
| २ | ८१ | ३४.२-ब | निवासी बांधकाम २५% मर्यादित ठेवणे .<br>सार्वजनिक इमारती ४०% च्या मर्यादित |
| ३ | १६६ | अनुसूची – ए<br>ए - ९ | ४०% ऐवजी ८०% |

तसेच सदर पुस्तिकेतील टंकलेखन व तत्सम चुका दुरुस्त करुन सदर प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावलीतील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूरी मिळणेकरिता शासनास सादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- अनुमोदकः-

ठराव ~~सर्वानुमते~~ मंजूर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि:-१८/०४/२००६

**प्रकरण क्र.: ०८** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अधिनियम चे कलम १४९ चे पोट कलम (१), कलम १२७ चे पोट कलम(२), खंड(अ) आणि कलम ४५५ व कलम ४५७ च्या खंड(७) चा पोट खंड(क) व १४९ चे पोटकलम(२) द्वारे जकातीची आकारणी, मुल्यांकन व संकलन ह्यांचे नियमन करण्याकरिता केलेले नियम.**

**ठराव क्र.: ०८**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी स्थापन झाली असून जकात विभागाचा कारभार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अधिनियमाच्या तरतुदी नुसार व महाराष्ट्र नगरपालिका जकात (नियम) १९६८ नुसार चालू आहे. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदी नुसार महापालिकेस स्वतःचे जकात नियम करणे अनिवार्य आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप जकात नियमावली मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९ चे पोटकलम(१), कलम १२७ चे पोटकलम(२) खंड(अ) आणि कलम ४५५ व कलम ४५७ च्या खंड(७) चा पोट खंड(क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेत वापरात असणाऱ्या महाराष्ट्र नगरपालिका (जकात) नियम १९६८ आणि त्यासंबंधी लागू असणाऱ्या अन्य सर्व नियमांना अधिक्रमित करुन उक्त अधिनियमाच्या कलम १४९ चे पोट कलम(२) अन्वये उक्त महानगरपालिकेच्या क्षेत्रातील जकातीची आकारणी, मुल्यांकन व संकलन यांचे नियमन करण्याकरिता केलेल्या प्रारुप नियमांना सदस्यांनी सुचविलेल्या व मा. महासभेने मान्य केलेल्या आवश्यक त्या सूचना/दुरुस्त्या प्रारुप नियमांत समाविष्ट करण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

मा. महासभेच्या मान्यतेनंतर अधिनियमांतील तरतुदीप्रमाणे उक्त नियमांना पूर्व प्रसिध्दी देणे आवश्यक आहे. पूर्व प्रसिध्दी नंतर आलेल्या आक्षेप व सुचनांवर मा. महासभा पुन्हा एकवार विचार करुन त्यास अंतिम स्वरुप देईल. मा. महासभेने यानंतर अंतिम केलेल्या नियमांना राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने मा. महासभेच्या अंतिम मंजुरीच्या ठरावासह नियम राज्य शासनाच्या मान्यतेकरीता सादर करावेत.

तसेच जकात वसुली करीता "जकात अभिकर्ताः नेमणूक बाबतची उदा. (निविदा पत्रक, करारनामा प्रत वृत्तपत्रामध्ये निविदा मागविण्याच्या जाहिराती प्रसिध्द करणे (मराठी, इंग्रजी व हिन्दी), फॉर्म ऑफ लेटर ऑफ एक्सेपटन्स ऑफ ऑफर, वर्क कमेन्समेंट ऑर्डर, वगैरे) प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीस ही सभा मंजुरी देत असून सदर कार्यवाही मध्ये मा. महासभेने व मा. स्थायी समितीने तसेच वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार जकात निविदा मागविण्याच्या दृष्टीने कार्यवाही प्रस्थावित करुन प्रति वर्षी जकात निविदा मागविण्यात याव्यात.

उक्त "प्रारुप जकात नियमांबाबत" व "जकात अभिकर्ता नेमणूकीबाबत" निर्देशित केलेली कार्यवाही करणेकरिता ही महासभा मंजुरी देत आहे.

श्री. श्री हरेश बोडिसे (सुचक)

श्री चंद्रकांत मोदी (अनुमोदक)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.१८/०४/२००६

**प्रकरण क्र.९ :- महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती मंजूर करणे बाबत**

**ठराव क्र. ८ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या १) श्री. हेमंत पांडूरंग पाटील, स.का. २) श्री. जितेंद्र रा. कांबळे, लिपिक, ३) श्री. कैलास दा. शेवंते, लिपिक या तीन कर्मचारी यांच्या कुटूंबियांना शासन निर्णया अंतर्गत मोडत असलेल्या पाच गंभीर आजारा अंतर्गत आजारांवर उपचार घेतले असून शासन निर्णयाचे अधिन राहून अग्रिम मंजूर केले होते. त्या मंजूर केलेल्या अग्रिमापेक्षा प्रत्यक्ष कमी / जास्त खर्च झालेला आहे. तो पुढील प्रमाणे.

१) श्री. हेमंत पांडूरंग पाटील, (स.का.) यांनी त्यांची मुलगी कु. रुची हेमंत पाटील, करीता लोकमान्य टिळक, महापालिका रुग्णालय, मुंबई येथे हृदयावर शस्त्रक्रिया करण्याकरीता **रु.२०,०००/-** अग्रिम घेतले आहे व प्रत्यक्ष खर्च **रु.५०,०००/-** झालेला आहे.

२) श्री. जितेंद्र रा. कांबळे, लिपिक यांनी त्यांची मुलगी कु. जानव्ही जितेंद्र कांबळे, करीता के. ई. एम. रुग्णालय येथे हृदयाची झडप बदलणे करीता **रु.४५,०००/-** अग्रिम घेतली आहे व प्रत्यक्ष खर्च **रु.७३,७००/-** झालेला आहे.

३) श्री. कैलास दा. शेवंते, लिपिक यांनी त्यांची पत्नी श्रीम. अर्चना कैलास शेवंते, करीता नायर रुग्णालय, मुंबई येथे हृदय शस्त्रक्रिया करण्यासाठी **रु.४५,०००/-** अग्रिम घेतले आहे व प्रत्यक्ष खर्च **रु.३४,२१९/-** झालेला आहे.

शासन निर्णय क्र.MAG/१०९५/CR-४५/९५/आरोग्य-३ दि.४/७/२००० अन्वये उक्त क्र. १ व २ येथील कर्मचारी यांनी उचल केलेल्या अग्रिम रकमेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती त्यांनी सादर केलेल्या वैद्यकिय बिलाप्रमाणे करणेस मान्यता देण्यात येत असून क्र. ३ येथील कर्मचाऱ्याचा खर्च उचल केलेल्या अग्रिम रकमेपेक्षा कमी झालेला आहे. त्याचे समायोजन करुन घेणेस मान्यता असुन केलेल्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा कार्यभार हा महाराष्ट्र शासनाचे धोरण व नियमानुसार व देखरेखीखाली करण्यात येतो. त्यानुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांना तत्कालीन नगरपालिकेपासून महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत व ते लागू असल्याबाबत मा. सर्वसाधारण सभा दि.२७/१२/१९९५ ठराव क्र.५२८ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार नगरपालिकेची महानगरपालिका झाल्याने जे नियम व अटीशर्ती नगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू आहेत तेच महानगरपालिका कर्मचाऱ्याना लागू होतात. त्यानुसार शासनाचे निर्णय हे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू आहेत. सद्यस्थितीमध्ये महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अथवा त्यांचे कुटूंबातील अन्य सदस्य जे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे. त्यांना शासन निर्णय क्र. एमएजी/१०९९/प्र.क्र.२४०/९९ आरोग्य-३ दि.३०/८/१९९९ अंतर्गत नमूद २७ आजारांना व महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुदीनुसार मा. स्थायी समिती सभा दि.२८/५/२००३ ठराव क्र.४९ अन्वये कर्मचाऱ्यांस रु.२०,०००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येत आहे. परंतू सदरचा वैद्यकिय प्रतिपुर्तीचा लाभ महानगरपालिकेच्या ठराविकच कर्मचाऱ्यांना जे मागणी करतात त्यांना मिळत आहे. याकरीता वैद्यकिय प्रतिपुर्तीचा लाभ सर्व कर्मचाऱ्यांना मिळावा अशी महानगरपालिका प्रशासनाची धारणा असून तशी महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटनांनी सुद्धा मागणी केलेली आहे. या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिका शेजारील ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका, कल्याण-

डोंबिवली महानगरपालिका तसेच नवि-मुंबई महानगरपालिका या महानगरपालिकांमध्ये कोणत्या पद्धतीने वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती केली जाते याबाबत माहिती उपलब्ध केली आहे. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका सर्व कर्मचाऱ्यांना (वर्ग १ ते वर्ग ४) रु.२७००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती वर्षातून समान दोन हप्त्यामध्ये देत आहे. भिवंडी महानगरपालिका वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी कर्मचाऱ्यांना वेतनात दरमहा रु.२००/- देत आहे. तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका त्यांची स्वतःची रुग्णालये असल्यामुळे खाजगी रुग्णालयात तातडीचे वेळी खर्च केल्यास एकूण खर्चाच्या ७५% परंतू वेतनश्रेणी नुसार जास्तीत जास्त रु. २५,०००/- च्या मर्यादेत देत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेकडून माहिती उपलब्ध झालेली नाही.

त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका शेजारील महानगरपालिकांनी सुरु केलेली पद्धत ही या महानगरपालिका स्थायी कर्मचाऱ्यांना लागू केल्यास त्याचा फायदा सर्व कर्मचाऱ्यांना होणार असल्याने तत्पुर्वी मा.स्थायी समिती सभा दि.२८/५/२००३ ठराव क्र.४९ नुसार सुरु असलेली वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बंद करुन यापुढे महानगरपालिकाचे आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना आकस्मिक आजाराचे प्रतिपुर्ती पोटी (वर्ग- १ ते वर्ग ४) वार्षिक रु.२७००/- इतकी रक्कम एक रक्कमी वैद्यकिय खर्चाकरीता देऊन या देण्यात येणाऱ्या रकमेतून कर्मचाऱ्यांनी परस्पर मेडीक्लेम योजना स्वतःचे कुटूंबासह घ्यावयाची आहे. त्यामुळे ठरावाचे दिनांकापर्यंत प्राप्त वैद्यकिय प्रतिपुर्तीचे अर्ज वगळून या योजने अंतर्गत प्रत्येकी वर्ग - १ ते ४ मधील कर्मचारी / अधिकारी यांना वैद्यकिय खर्चाकरीता अर्थसंकल्पात प्रतिवर्षी स्थायी कर्मचाऱ्यांचे प्रमाणात स्वतंत्र लेखाशिर्षाखाली आर्थिक तरतूद ठेवून त्या तरतूदीनुसार वैद्यकिय खर्चाकरीता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता आहे. तसेच शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९/३/२००५ अंतर्गत परिशिष्ट 'अ' मधील भाग - २ मधील पुढील पाच गंभिर आजार अनुक्रमे (१) हृदय शस्त्रक्रियाची प्रकरणे (Heart Surgery), (२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye Pass Surgery), (३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, (४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation), (५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer)

यांना महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी व त्याच्या कुटूंबियानी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभिर व विशिष्टोपचारावरील खर्चाची शासकिय तसेच खाजगी रुग्णालयात घेतलेल्या संपूर्ण औषधोपचाराची प्रतिपुर्ती फक्त वैद्यकिय देयके शासकिय रुग्णालयात औषधोपचार घेतल्यास त्यांना नमुना 'अ' व 'ब' मध्ये प्रमाणपत्रे व खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतल्यास वैद्यकिय सेवाकरीता आलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती देयके 'क' व 'ड' नमुन्यात सादर केल्यानंतर कर्मचारी / अधिकारी किंवा त्यांचे कुटूंबियांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती प्रदानास येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यात येत असून मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना गंभीर आजारांना येणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती करुन देण्याचे अधिकार याद्वारे देण्यात येत आहेत.

**सुचक :-** श्री हेरल बोर्जिस    **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १८/४/२००६

**प्रकरण क्र. :-** ९०

**ठराव क्र. :-** ९०

**विषय :-** **आरोग्य विभागातील विविध कामांना प्रशासकीय मंजूरी देणे बाबत.**

**अ) पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करणे बाबत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करण्याबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवा-याचे अवलोकन केले असता शहरातील कच्चे पक्के नाले साफसफाई करण्यासाठी आवश्यक लागणारे मनुष्यबळ व डंपरच्या संखेत खालीलप्रमाणे वाढ करणे आवश्यक आहेत.

| गट क्र. | प्रभाग क्र. | आवश्यक मजूर | आवश्यक वाहने |
|---|---|---|---|
| १ | १, २ | ४० | ०२ |
| २ | ३, ४, २० | ९० | ०२ |
| ३ | १८, १९ | ५० | ०३ |
| ४ | ५, २१, १६ | ५५ | ०२ |
| ५ | २६, १७ | ३५ | ०२ |
| ६ | ६ | ३५ | ०२ |
| ७ | ८ | ५० | ०२ |
| ८ | ९ | ४० | ०२ |

| गट क्र. | प्रभाग क्र. | आवश्यक मजूर | आवश्यक वाहने |
|---|---|---|---|
| ९ | ७, २४ | ४५ | ०२ |
| १० | २२, २३ | ४० | ०२ |
| ११ | १०, ११ | ५० | ०३ |
| १२ | १२ | ५० | ०३ |
| १३ | १३ | ५० | ०३ |
| १४ | १४ | ७० | ०४ |
| १५ | १५ | ७० | ०४ |
| १६ | २५ | ५० | ०४ |

सदरचे मनुष्यबळ व डंपर सध्या कार्यरत असलेल्या प्रभाग निहाय साफसफाई करणा-या मंजूर निविदाकाराकडून मंजूर दरानुसार त्या त्या गटातील नाले सफाईसाठी लागणारे जादा मजुर व डंपर ठेकापध्दतीने उपलब्ध करणेस हि सभा मान्यता देत असून या कामी जादा खर्च होणार असल्याने वॉर्ड सफाई व नाले सफाई कामी केलेली तरतुद अपुरी पडल्यास सदरचा खर्च घनकचरा व्यवस्थापन या शिर्षातून करण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

मनपा. क्षेत्रातील मोठे कच्चे पक्के नाले व खाडी लगत असलेले नाल्यातील गाळ माती काढण्याकामी भाड्याने पोकलन, बोटीसह पोकलन, जे.सी.बी मशिन घेणे कामी खालील अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

| क्र. | विभागाचे नाव | पोकलन, बोटीसह पोकलन व जे.सी.बी कामी येणारो अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर पश्चिम विभागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |
| २ | मुर्धे ते उत्तन या भागातील नाले सफाई करणे | रु. १०,०५,०००/- |
| ३ | नवघर, खारीगाव या भागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |
| ४ | मिरारोड भागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |
| ५ | मिरा ते चेना, घोडबंदर आदी विभागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |

सदर नाले सफाईची कामे अत्यावश्यक बाब असल्याने तसेच सदरची कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण होण्याच्या दृष्टीने या कामाच्या तातडीने निविदा मागवून कमी दराच्या निविदाकारास

कामाचा कार्यादेश देणेस व याकामी येणा-या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत असून सदरचे दर एका वर्षासाठी मंजुर करण्यात येत आहेत.

**ब) कचरा सपाटीकरण करण्यासाठी डोझर मशीन भाड्याने घेणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती, गृह संकुलने, इमारती, तसेच औद्योगिक क्षेत्र त्याचप्रमाणे शहरात मोठ्याप्रमाणावर उघड्यावर भरणारे भाजी मार्केट आदी मधून दररोज सुमारे २६० टन कचरा निर्माण होत असतो. सध्या महापालिकेच्या उत्तन पाली नियोजीत डंपिंग ग्राउंड येथे खत प्रकल्प उभारणेची कार्यवाही सुरु असून

सदर खत प्रकल्प सुरु होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यान काळात आरोग्य विभागामार्फत सध्या विकास आराखाड्यातील डि.पी. रस्ते, मैदाने इत्यादीच्या आरक्षण जागेत कचरा टकाण्यात येतो. सदरची जागा नागरी वस्ती पासून जवळ असल्याने त्या भागातील कचरा तातडीने सपाटीकरण करणे आवश्यक असल्याने भाड्याने चेन डोझर उपलब्ध करणे आवश्यक असल्याने मनपा क्षेत्रातील दररोज निघणा-या कच-याचे सपाटीकरण करण्याकरीता डोझर भाड्याने घेणे कामास हि सभा मान्यता देत असून या कामी केलेली तरतुद अपुरी असून सदरचा खर्च घनकचरा व्यवस्थापन या शिर्षातून करणेस हि सभा मान्यता देत आहे.

**क) मनपा क्षेत्रातील सार्वजनीक शौचालय व खाजगी इमारतीच्या सेफ्टी टॅंक सफाई करण्यासाठी व्हॅक्युम टॅंकर खरेदी करणे** :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे सहा ते साडे सहा लाख असून शहरात मोठ्याप्रमाणात इमारर्ती, गृह संकुलने, औद्योगिक वसाहती आहेत. महानगरपालिका मालकीची सार्वजनीक शौचालय सेफ्टी टॅंकची संख्या १०३ आहेत. मनपा क्षेत्रातील खाजगी इमरती, ग्रामिण भागातील घरे तसेच औद्योगिक परिसरातील वसाहतीतील सेप्टीक टॅंकची संख्या अंदाजे ८० ते ९० हजार असून सदर बाबीचा विचार करता सध्या आरोगय विभागाकडे असलेल्या एकमेव व्हॅक्युम टॅंकर मार्फत शहरातील खाजगी व सार्वजनीक शौचलयांच्या सेफ्टी टॅंक सफाई करणेचे कामात मोठ्याप्रमाणात अडथळा निर्माण होत आहे.

शहरातील खाजगी व सार्वजनीक शौचालय सेफ्टी टॅंक सफाई करण्यासाठी नवीन तीन व्हॅक्युम टॅंकर खरेदी करणे आवश्यक आहे. या साठी चेसीज व त्यावर बॉडी बांधणे कामी येणा-या खर्चास हि सभा मान्यता देत असून सदर कामास तरतुद अपुरी पडल्यास घनकचरा व्यवस्थापन या शिर्षातून खर्च करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :-** टैंपर लोरिंस      **अनुमोदक :-** चंद्रकांत मोदी

**महापौर**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२००६

**प्रकरण क्र :-** ( ११ ) सार्वजनिक रस्ते / डी.पी. रस्ते घोषित करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. :-** ( ९१ )

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना दि. १४/०५/१९९७ रोजी मंजुर झालेली असुन दि. १५/०७/१९९७ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजुर झालेली असुन दि. १५/१०/२००० पासुन अंमलात आलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या पुर्वेकडील मौजे काशि, मौजे घोडबंदर स्थित आदिवासी पाडे आहेत. सदर आदिवासी पाडे दाचगुलपाडा पाडा, माशाचा पाडा, बाबळीची भाट क्र १ व २ नावाने ओळखले जातात. १) द्राचकुल पाडयाकडे जाण्याकरीता लक्ष्मी बाग ते द्राचकुलपाडा हा रस्ता २) माशाचा पाडयाकडे जाण्याकरीता काशि जनता नगर ब्रीज ते मंदिरा पर्यतचा रस्ता ३) बाबळीचा भाट क्र. १ व २ कडे रा.म.क्र. ८ पासुनचा रस्ता हे रस्ते विद्यमान अस्तित्वातील रस्ते असुन सदर रस्ते उपरोक्त मंजुर विकास योजनेत अंतर्भुत करण्यात आलेले नाहीत व त्या ठिकाणी विकास योजनेत नियोजित रस्ते दर्शविण्यात आलेले नाहीत. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता सदर आदिवासी पाडयाकडे जाणारे अस्तित्वातील रस्ते हे खाजगी मालकीच्या जागेतुन तर काही भाग वन विभागाच्या जागेतुन जात आहेत. सदर आदिवासी पाडयाकडे जाण्याकरीता पक्क्या स्वरूपात रस्ते विकसित करणे / बांधणे आवश्यक आहे. सदर तीन्ही रस्त्याबाबत सर्व्हे करून मोजणी नकाशा तयार करण्यात आलेला असुन त्यानुसार ९.०० मीटर रूंदीचे रस्ते प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचा व जागेचा वापर सार्वजनिक प्रयोजनार्थ करावयाचा असल्यामुळे मंजुर विकास योजनेत ९.०० मीटर रूंद रस्ता आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजुर विकास योजनेत फेर बदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री रॉयल बोर्जिस  **अनुमोदन :-** श्री चंद्रकांत मोदी

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

DKV/DK/2

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.१८/०४/२००६

**प्रकरण क्रमांक :- ( १२ )** मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारती बाबत विचार विनियम करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. :- ( ९२ )**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत खालील प्रमाणे धोकादायक इमारती आहेत. सदर इमारतीना महानगरपालिका प्रशासनामार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ (१) (२) (३) अन्वये इमारती रिकाम्या करून तोडून टाकणे बाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | लता को. ऑ. हौ.सो. | खारीगांव भाईदर (पू) |
| २ | शैला उद्योग भवन | नवघर रोड, भाईदर (पू) |
| ३ | दत्ता निवास चाळ | नवघर गांव, भाईदर (पू) |
| ४ | स्वानंद गणेश | खारीगांव भाईदर (पू) |
| ५ | केतकी निवास | बी.पी.रोड भाईदर (पू) |
| ६ | सिल्व्हर लाईन को. ऑ.हौ.सो. | रेल्वे समांतर रस्ता भाईदर (पू) |
| ७ | कल्याण कॉटेज | बी.पी.रोड, भाईदर (पू) |
| ८ | राम अवतार सदन अे | बी.पी.रोड भाईदर (पू) |
| ९ | दळवी चाळ | नवघर रोड,भाईदर (पू) |
| १० | भरत बी पाटील व इतर (घर) | नवघर रोड,भाईदर (पू) |
| ११ | रेल व्हयु को. ऑ.हौ.सो. | रेल्वे समांतर रस्ता, भाईदर (पू) |
| १२ | नविन अपार्टमेंट | खारिगांव भाईदर (पू) |
| १३ | आर.के.पेठी /अग्रवाल | व्यापार आळी, भाईदर (प.) |
| १४ | नुरजहाँ अपार्टमेंट | नयानगर मिरारोड पूर्व |
| १५ | रोझ को. ऑ. हौ. सो. | नयानगर मिरारोड पूर्व |
| १६ | तुळशी निवास | बी.पी.रोड, भाईदर (पू) |
| १७ | चंदू निवास | बी.पी.रोड, भाईदर (पू) |
| १८ | कांचन कॉटेज | बी.पी. रोड, भाईदर (पू) |
| १९ | अल्पेश बिल्डीग | स्टेशन रोड, भाईदर(प) |
| २० | न्यु रेड रोज को.ऑ.हौ.सो. | स्टेशन रोड, भाईदर (प.) |
| २१ | दुल्हन बी.~~महल~~ ~~चाळ~~. | पोलिस स्टेशन बाजूला भाईदर (प) |
| २२ | महेश नगर बिल्डींग नं.१ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग भाईदर (प) |
| २३ | लता कॉ. ऑ. हौ.सो. | खारिगांव भाईदर (पू) |
| २४ | स्वानंद गणेश | खारिगांव भाईदर (पू) |

| अ.क्र. | इमारतीचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| २५ | सिल्व्हर लाईन कॉ.ऑ. हौ.सोसायटी | भाईदर (पू) स्टेशन रोड |
| २६ | रॉयल कॉ.ऑ.हौ.सोसायटी | मिरारोड (पू) |

वरील इमारती मधील रहिवाशी / भाडे करु व मालकांना वारंवार नोटीसा देउुन सुध्दा संबधितानी इमारती रिकाम्या करुन तोडलेल्या नाहीत. वरील प्रमाणे अ.क्र. १ ते २६ इमारती बाबत सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या शासकीय संस्थेमार्फत तपासणी, टेस्टींग करुन त्यांच्या अहवालानुसार इमारती धोकादायक असल्याबाबत घोषित केलेल्या आहेत, तसेच सदर संस्थेमार्फत खालील इमारतीची तपासणी टेस्टींग करून त्यांच्या अहवालानुसार इमारत दुरूस्ती / मजबुतीकाम करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नाव / ठिकाण |
|---|---|
| १ | चंद्रलोक बिल्डींग बी.को.ऑ.हौ.सो.लि. भाईदर (प) |
| २ | पितृछाया भाईदर(पूर्व) |
| ३ | प्रिमियम बिल्डींग, मिरारोड (पूर्व) |
| ४ | चैतन्य बिल्डींग खारीगांव, भाईंदर (पूर्व) |
| ५ | शास्त्री नगर नं.१ कॉ.ऑ.हौ.सोसायटी भाईदर (प) |
| ६ | नटवर हाउुस को.ऑ.हौ.सो. नवघर भाईदर (पू) |
| ७ | सुदंरा को.ऑ.हौ.सो.लि. भाईदर (पू) |
| ८ | मिना बिल्डींग, भाईंदर (प) |
| ९ | मंगलनगर,ई आणि एफ मिरारोड |
| १० | महेश नगर बिल्डींग नं.५, भाईंदर (प) |
| ११ | महेश नगर बिल्डींग नं.४, भाईंदर (प) |
| १२ | निराज पार्क को.ऑ.हौ.सो.लि. भाईदर (पू.) |
| १३ | नटवर हाउुस को.ऑ.हौ.सो.लि. भाईदर (पू.) |
| १४ | शांतीधाम श्री गणेश को. ऑ.हौ.सो. मिरारोड (पू) |
| १५ | यमुना निवास, भाईंदर (पू) |
| १६ | मातृछाया, भाईंदर (पू) |
| १७ | ठाकूर बिल्डींग, भाईंदर (प) |
| १८ | साई व्हिला भाईदर (प) |
| १९ | अमिना मंजिल, भाईंदर (प), |
| २० | किट्टी कृपा, भाईंदर (प) |
| २१ | गणेश कृपा, भाईंदर (पू) |

| अ.क्र. | इमारतीचे नाव / ठिकाण |
|---|---|
| २२ | चितारी निवास, भाईंदर (पू) |
| २३ | वृदांवन (स्वस्तिक इंडस्ट्रीयल इस्टेट), भाईंदर (पू) |
| २४ | चंदनबाला इमारत, भाईंदर (प) |
| २५ | न्यु यशोदिप को. हाउसिंग सोसायटी, भाईंदर (प) |
| २६ | शातीनगर, भाईंदर (पू) |
| २७ | अरिहंत अपार्टमेंट, भाईंदर (प) |
| २८ | चंद्रभागा लक्ष्मण पाटील, भाईंदर (प) |
| २९ | मनिच्छा को.हाउसिंग सोसायटी, भाईंदर (पू) |
| ३० | बाबू मिस्त्री चाळ नं.ए/१, भाईंदर (प) |
| ३१ | बाबू मिस्त्री चाळ नं.बी/२, भाईंदर (प) |
| ३२ | के.जी.महल, भाईंदर (प) |
| ३३ | निर्विकार सोसायटी, भाईंदर (पू) |
| ३४ | माग्यश्री निवास, भाईंदर (पू) |
| ३५ | जामा मस्जिद,भाईदर(प) |
| ३६ | रामा निवास, भाईंदर (पू) |
| ३७ | व्हीनस कॉर्नर, मिरारोड (पू) |
| ३८ | हिरा-पन्ना, भाईंदर (पू) |
| ३९ | शुभम करोती , भाईंदर (प) |
| ४० | ओम गणेश कृपा, भाईंदर (प) |
| ४१ | पाटील बंद्रर्स इंडस्ट्रीयल इस्टेट , भाईंदर (पू) |
| ४२ | लवडेल को.ऑ.हौ.सो, भाईंदर (पू) |
| ४३ | तोदी उद्योग नगर , भाईंदर (प) |
| ४४ | साई निवास, भाईंदर (पू) |
| ४५ | जय वृषभ को.ऑ.हौ.सो, भाईंदर (प) |
| ४६ | नवकिर्ती प्रिमायसेस, भाईंदर (पू) |
| ४७ | चंद्रलोक -अे., भाईंदर (प) |
| ४८ | आराधना को.ऑ.हौ.सो. लि., भाईंदर (पू) |
| ४९ | संध्यागुप्ता भवन भाईदर (पू) |

वरील प्रमाणे सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या संस्थेच्या अहवालनुसार धोकादायक इमारती म्हणून घोषित केलेल्या इमारतीचे मालक, भाडे करुन विकासक रहीवाशी यामध्ये पुर्नबांधणी बाबत तडजोड होत नसल्याने तसेच पुर्नबांधणी करीता उपलंब्ध होणाऱ्या चटईक्षेत्रातून सर्वांना जागा उपलंब्ध होउु न शकत असल्याने सुध्दा इमारती तोडण्यास विलंब होत आहे. सदर धोकादायक इमारती या ग्रामपंचायत काळातील असुन सदर इमारतीनी १.५० ते ५ पेक्षा जास्त चटईक्षेत्र व्यापलेले आहे .

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर असलेल्या विकास नियंत्रण निमावलीनुसार चटईक्षेत्र १ (एक) अनुज्ञेय असून पुर्नविकासाच्या इमारतीसाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावालीतील परिशिष्ठ II नियम ३२ (७) नुसार अशा इमारती जर दि. ०१/०६/१९८५ पुर्वीच्या असतील तर त्यासाठी ०.२५ जादा चटईक्षेत्र जे की १.५० चटईक्षेत्राच्या मर्यादेत देण्याची तरतुद आहे. सदर धोकादायक इमारती हया रहीवास व्याप्त असल्यमुळे या इमारतीच्या भुखंडाच्या हद्दी निश्चित करणे शक्य होत नसल्यामुळे विदयमान जो त्याच्या क्षेत्राचे मोजमाप करून चटईक्षेत्र निर्देशांक विचार घेण्यात आला असून सदर इमारतीचे विदयमान क्षेत्र १.५० चटई पेक्षा जास्तीचे आहे. मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या दि.१३/०४/२००५ च्या महासभेत पुर्नविकासाच्या इमारतीना अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र व जास्तीचे चटईक्षेत्र निर्देशांक १.०० इतके बांधकाम क्षेत्र देण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ठराव पारीत झालेला आहे. सदर फेरबदल शासनाकडून अंतिम झाल्यानंतर त्यानुसार पुर्नबांधणी परवानग्या देता येतील प्रशासनाने याबाबत मा. प्रधान सचिव, नगर सचिव विभाग, मंत्रालय, मुबंई -४०००३२ यांना पत्रान्वये सर्व इमारतीची माहिती देवुन पुर्नविकास परवानगी देणे बाबत मार्गदर्शन मागविलेले आहे. परंतु सदर मार्गदर्शन शासनाकडून मिळालेले नाही.

धोकादायक इमारतीबाबतची वरील प्रमाणे परिस्थिती पाहता त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांची तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी व्यवस्था करण्याकरीता मंजूर विकास योजनेतील Housing for Dishoused आरक्षित जागा ताब्यात घेण्याबाबत नगररचना विभागाने त्वरित कार्यवाही करावी अतिधोकादायक इमारतीबाबत महानगरपालिकेने तातडीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६८ (१) (क), (४) (५) अन्वये पोलीस विभागाचे सहकार्य घेवुन धोकादायक इमारती खाली करून द्याव्यात सदर रिकामी केलेल्या इमारती संबधित इमारत मालक / रहिवांशानी न तोडल्यास महानगरपालिकेमार्फत इमारतीचे मुल्यांकन करून लिलाव द्वारे इमारती तोडण्यात याव्यात. नगररचना विभागामार्फत धोकादायक इमारती तोडण्यापुर्वी जागेचे क्षेत्रफळ प्रमाणित करून घ्यावे. ज्या इमारतीना दुरूस्ती / मजबुती कामाबाबत कळविण्यात आलेले असेल अशा इमारतीना तीन नोटीसा देवुन सुध्दा दुरूस्ती / मजबुतीकाम करून सक्षम दाखला सादर न केल्यास व आवश्यकता भासल्यास पुन्हा इंजिनिअरींग कॉलेज मार्फत तपासणी व टेस्टींग करून इमारती धोकादायक आढळल्यास तसेच घोषित करून पोलीस बंदोबस्तात रिकाम्या कराव्यात सदर प्रस्तावात नमुद केल्या व्यतिरिक्त प्रशासनामार्फत सर्व्हे करून आवश्यकता भासल्यास मा.स्थायी समिती सभा दि. १३ /११ / २००३ ठराव क्र. १५२ अन्वये मंजूर दरानुसार यापुढे सुध्दा सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिरिअरिंग या संस्थेमार्फत तपासणी व टेस्टींग करून पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

**सुचक :-** श्री हेरल्ड बोर्जिस

**अनुमोदन :-** श्री चंद्रकांत मोदी

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८ / ०४ २००६**

**प्रकरण क्र. १३ - मालमत्ता हस्तांतरणाबाबत विचार विनिमय घेवून निर्णय घेणे बाबत.**

ठराव क्र. - १३

मनपा क्षेत्रातील झोपडपट्टी व गावठाण विभागातील मालमत्तांचे हस्तांतरण होत नाही. सदर मालमत्ताचे दस्त ऐवज (करारनामे) दुय्यम निबंधक, ठाणे - २ यांचेकडे नोंदणीकृत होत नाहीत. यामुळे मनपा अशा मालमत्ताचे हस्तांतर करत नाही. हस्तांतरण न केल्यामुळे नागरीकांची गैरसोय होते. महानगरपालिकेच कर वसुली विभागाकडून अनाधिकृत बांधकामाना व अधिकृत घरांना करण्यात येणारी कर आकारणी मुळ मालकाच्या नावावरुन विकत घेणाऱ्या मालकाच्या नावावर करत नसल्यामुळे महानगपालिकेचे मोठया प्रमाणावर अर्थिक नुकसान होत आहे. अशा प्रकरणामध्ये मुळ मालकाकडून ना हरकत प्रमाणपत्र सत्य प्रतिवर घेण्यात यावे त्याच बरोबर दोन्ही पक्षाचे छायाचित्र प्रमाणीत करण्यात यावे. म्हणेज न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास दोन्ही पक्ष जबाबदार राहतील तसेच दुय्यम निबंधक रजिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करतील त्याबरोबर स्टॅम्प डयुटी भरण्याची जबाबदारी संबधीतावर राहील व त्याची सत्य प्रतिवर नोंद घेण्यात यावी. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी धारकाकडून ०१/०१/१९९५ पुर्वि चे सर्व पुरावे तपासून रु. ५० स्टॅम्प पेपरवर मुळ मालकाने नाहरकत प्रमाणपत्र सत्य प्रतिवर दयावे या कामी दोन्ही पक्षाचे छायाचित्र प्रमाणित करण्यात यावे. तसेच न्यायालयीन किंवा अन्य कोणताही वाद निर्माण झाल्यास दोन्ही पक्षकार जबाबदर राहतील.सदरची प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर गांवठाण व झोपडपट्टी विभागातील मालमत्ताचे हस्तांतरण करणे कामी व गावठाण विभागामध्ये येणाऱ्या मालमत्ता धारकांकडून हस्तांतरण फि रु. १०००/- बिगरनिवासी करीता रु. १५००/- तसेच झोपडपट्टी विभागातील मालमत्ता हस्तांतरण करणे कामी रु. ५००/- फि आकारण्यास ही सभा मंजुरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या इतिवृतांताची वाट न पाहता त्वरीत अमलबजावणी करण्यात यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुरी**

**सुचक** श्री. हॅरल्ड बोर्जीस

**अनुमोदक** श्री. चंद्रकात मोदी

**मा. महापौर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १८/४/२००६

(उप प्रस्ताव)

**प्रकरण क्र. १४ :-** सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०६/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/ प्र.क्र.१९८/ ०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तींच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत.

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## महासभा दि. १८/७/०६

१५ (उपप्रस्ताव)

प्रकरण कमांक : मिरा भाईदर शहरातील काही इमारतींना समान दराने कर आकारणी करण्यांत आलेली आहे. असा इमारतींना समान दराने कर आकारणी करणेबाबत...

ठराव कमांक : ९४

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत काही इमारतीमधील सदनिका / दुकाने यांना वेगवेगळया दराने कर आकारणी झालेली आहे. वास्तविक एकाच इमारतीमध्ये सर्व सदनिका/दुकाने/गाळे यांना एकाच वाजवी भाडे मुल्य दराने झालेली आकारणी होणे कमप्राप्त आहे. त्याप्रमाणे कर आकारणी झालेली नाही याकरीता कर आकारणीमध्ये सुसूत्रता येण्यासाठी ज्या इमारतीमधील सदनिकांना/ दुकाने / गाळे प्रथम कर आकारणी ज्या वाजवी भाडेमुल्य दराने झालेली आहे त्या वाजवी भाडेमुल्य दराने त्याच इमारतीमधील इतर सदनिकांना करावी आकारणी व्हावी या बाबतची मागणी नागरीकांकडून सतत होत आहे. तसेच अशा सदनिका / दुकाने / गाळे यांना सन २००५.२००६ वर्षापार्यंत जादा दराने कर आकारणीची बिले नगरपालिकेकडून देण्यात आलेली आहे या करीता असा मालमत्ता धारकांकडून सन २००५.०६ पर्यतचे कर वसूल करण्यांत येऊ नये व ज्या इमारतीमधील मालमत्तांना जादा दराने कर आकारणी झालेली आहे अशा मालमत्तांना प्रथम झालेल्या वाजवी भाडेमुल्य दराने कराची आकारणी होण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक
( शशिकांत शाह)
नगरसेवक

अनुमोदक
(रिटा शाह)
नगरसेविका

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०४/२००६

(त प्रस्ताव)

**प्रकरण क्र. १६ :-** सन्मा. सदस्य श्री. गजानन लक्ष्मण भोईर यांचे दिनांक ३०/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ रोजीचा ठराव क्र. ९४)

(सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(२५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०४/२००६

(उ प्रस्ताव)

**प्रकरण क्र. १७ :-** **''जैन मंदिर बावन जिनालय'' भाईंदर (प.) सभोवती ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित होऊनही त्या ठिकाणी फेरीवाल्यांना बसण्यास सहाय्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करणेबाबत.**

**ठराव क्र. १५ :-**

भाईंदर पश्चिम भागात डॉ. आंबेडकर रोड लगत जैन मंदिर आहे. सदर जैन मंदिरात दर्शन घेण्यासाठी नियमित शहरातील व शहरा बाहेरील भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात. बऱ्याच वेळा मोठ मोठ्या बसेस मधून भाविक येत असतात. जैन मंदिरात सतत मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने जैन मंदिर परिसरात सभोवती फेरीवाल्यांना बसण्यास मनाई केली आहे. त्या दृष्टीने सदरहू परिसर ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणून घोषित केला आहे. तसेच बाजार लिलावाच्या अटी शर्तीमध्ये देखील त्या ठिकाणी फेरीवाल्यांना बसण्यास प्रतिबंध केला आहे.

मा. महासभा, मा. स्थायी समिती यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही अंमलबजावणी संबंधित विभागची असते. असे असतांनाही जैन मंदिर सभोवती बिनधास्तपणे फेरीवाले बसतात. त्यामुळे देवळात येणाऱ्या भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. अशा प्रकारे फेरीवाल्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरीक, देवस्थान लोकप्रतिनिधी यांनी वेळोवळी लेखी स्वरुपात करुनदेखील त्याकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले जात आहे.

वास्तविकतः महापालिकेने चारही विभागासाठी स्वतंत्र अतिक्रमण पथक, क्षेत्रिय अधिकारी व उपायुक्त यांची नेमणुक केलेली आहे. असे असतांना फेरीवाल्यांना हटविण्याच्या कामी कोण्ताही अधिकारी लक्ष देत नाही. अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरीकांना त्रास होत आहे. महापालिकेने आदेश देऊनही कार्यवाही न करण्याची व फेरीवाल्यांना त्या ठिकाणी बसण्यास सहाय्य, प्रोत्साहन देणाऱ्या अशा अधिकाऱ्यां विरुद्ध कडक कार्यवाही करण्यांत यावी असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. शशिकांत शहा.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०४/२००६

(उप प्रस्ताव)

**प्रकरण क्र. १८ :-**

सन्मा. सदस्य श्री. शुभांगी सिताराम नाईक यांचे दिनांक १२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हॉस्पीटल होणेबाबत.

(सन्मा. सदस्या श्रीम. शुभांगी सिताराम नाईक ह्या गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०५/२००६

ठराव क्र. १६ :-

दि. ३ मे, २००६ रोजी भाजपाचे राजकीय नेते श्री. प्रमोदजी महाजन यांचे अत्यंत दुर्देवीरित्या निधन झालेले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आजची सभा ही १० मिनिटांसाठी तहकूब करावी असा मी या सभागृहासमोर ठराव मांडतो.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

३८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०५/२००६

**दु:खवटा ठराव क्र. १७ :-**

भारतीय जनता पार्टीच सरचिटनिस माजी केंद्रीय मंत्री महाराष्ट्राचे उमेदी नेतृत्व व राजकारणाला व्यवस्थापन शास्त्राची जोड देणारे कार्यक्षम लोकप्रतिनिधी स्वर्गीय प्रमोद महाजन ह्यांच्या स्मृतीस मिरा भाईंदर महानगरपालिकेची ही मा. महासभा विनम्र श्रद्धांजली अर्पण करित आहे. अंबेजोगाई सारख्या लहान गावात शिक्षकाच्या पोटी जन्म घेउन स्वकर्तृत्वावर केवळ महाराष्ट्रातच नव्हेतर राष्ट्रीय राजकारणावर ही आपला ठसा उमटवणारे प्रमोद महाजन ह्यांचे एक आगळे व्यक्तिमत्व होते. आपल्या विचारसरणीवर दृढ राहून अन्य पक्षामध्येही त्यांनी आपल्या वागणूकीने अनेक मित्र जोडले होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे दिल्लीतील एक प्रभावशाली नेतृत्व अस्तास गेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात उत्तन येथील केशवसृष्टीमध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधीनी सारखी एक वेगळी संस्था उभी करून तिला आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमोद महाजन ह्यांनी प्राप्त करून दिला व मिरा भाईंदर शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवले. आपले लोकप्रतिनिधी हे प्रशिक्षित असावे या हेतूने सुरू करण्यात आलेल्या म्हाळगी प्रबोधनीचा लाभ मिरा भाईंदर महापालिकेचे लोकप्रतिनिधींनी सुद्धा घेतला आहे. या संस्थेमुळे देशाचे माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी ह्यांचा मिरा भाईंदर शहरात भेटीचा योग जुळून आला होता. प्रमोद महाजन ह्यांच्या अकाली व दुर्दैवी निधनाने आधुनिक विचाराचा जनमाणसावर आपल्या कर्तृत्वाने स्थान मिळवलेले लोकशाही विकासासाठी एकनिष्ठ राहून डॉलरपेक्षा रूपया मजबूत करण्याचे स्वप्न पाहणारा आणि राजकीय विरोधकांनाही निरपेक्ष मैत्रीच्या नात्याने बांधून ठेवणारा असाधारण नेता महाराष्ट्राने गमावलेला आहे. महाराष्ट्राच्या या महान सुपुत्राला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेची विनम्र आदरांजली.

त्याचप्रमाणे २ मे रोजी टी.एम.टी. बसचा जो अपघात झाला. त्याच्यामध्ये ३० ते ३५ लोक मरण पावले आहेत. तसेच सन्मा. नगरसेवक श्री. प्रकाश दुबोले यांची मावशी, ॲडव्होकेट शिवाजी यादव यांच्या मातोश्री हौसाबाई दत्तू यादव यांच वृद्धापकाळाने निधन झाले. मोदी पटेल रोड येथे राहणारे राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते दिपक नांदीवडेकर यांचे अचानक निधन झालेले आहे. माजी नगरसेवक श्री. थॉमस डिसोझा यांचे बंधू पॅसेज डिसोझा यांचेही दु:खद निधन झालेले आहे. तसेच लक्ष्मीबाई पांडूरंग पाटील यांना दि. १२/०५/०६ रोजी देवाज्ञा झालेली आहे. त्या सर्वांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दु:खात ही सभा सहभागी असून सर्वांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. धनराज अग्रवाल.** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/०५/२००६

प्रकरण क्र. १९ :- दि. २०/०१/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १८ :-

दि. २०/०१/२००६ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हेरल बोर्जीस अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका



**मा. महासभा दि. १८/५/०६**

**प्रकरण क्रमांक :- २० सन २००५-०६ सालातील जकात वसुली बाबत आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आणि अभिकर्ता मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांच्यातील वादाबाबत ( Dispute)निर्णय घेणेकरिता मा स्थायी समितीने ठराव क्र. १४ दि. ०५/०५/२००६ नुसार केलेल्या शिफारसी बाबत**

**संदर्भ :- क्रमांक मि.भा. म.पा. ११०६/ ५३० प्रक्र ७१/०६/ नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई – ३२ दि. १३/०४/२००६ चे पत्र.**

**ठराव क्रमांक :- १९**

संदर्भाधिन विषयानुसार कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन २००५-०६ सालातील जकात वसुलीचा ठेका मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांना करारनाम्यातील मंजुर अटीशर्तीनुसार दिलेला आहे.

प्रस्तुत संदर्भात माहे जुलै दि. २६/०७/२००५ रोजी अतीवृष्टी झाल्याने त्याचा विपरीत परिणाम जकात वसुलीवर झाल्याने त्याबाबत मे. कोनार्क इन्फ्रा.प्रा. लि. ह्यांनी दि.०१/०८/२००५ दि. ०५/८/२००५ , दि. ०९/०८/२००५ रोजी पत्रे पाढवून त्याबाबत दि. २६ जुलै २००५ ते दि. १५ ऑगस्ट २००५ एकुण २१ दिवसाच्या, प्रती दिनी रु. ७,७६,०८९/- प्रमाणे झालेली रु. १,६२,९७,८६६/- एवढी नुकसान भरपाई मिळणे बाबत त्यांनी मागणी केलेली होती. सदर संदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. २२/०८/२००५,दि. २९/०८/२००५ दि. २३/०९/२००५ ,दि. १३/१०/२००५ दि. २७/१२/०५ दि. ०९/०१/२००६ दि, १०/०२/२००६ रोजी पत्रे पाठवून दि. २६ जुलै २००५ च्या अतिवृष्टीमुळे व तद्नंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये जकात उत्पादनात झालेल्या नुकसानीच्या अनुशंगाने करारनाम्यातील अटीशर्तीनुसार नमुना क. ३१ मध्ये दैनंदिन जकात वसुलीची माहिती देण्यास कळविण्यांत आले होते. परंतू ठेकेदाराकडून आवश्यक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

सदर प्रकरणी उपायुक्त (मु.) यांच्याकडे दि. ३०/१२/२००५ व दि. १०/०१/२००६ रोजी सुनावणी घेऊन ठेकेदाराचे म्हणणे ऐकुण घेण्यांत येऊन महापालिका पत्र जा.क्र. /मनपा/जकात /३७६/२००५-०६ दि. १०/०२/२००६ अन्वये कुठल्याही स्वरुपाची नुकसान भरपाई दिली जाणार नाही, असे मा. आयुक्त सो. ह्यांचे मान्यतेने कळवून प्रकरण निकाली काढणेंत आलेले होते.

सदर संदर्भात मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांनी मा. प्रधान सचिव -२,नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ह्यांच्याकडे दि. १६/०३/२००६ रोजी पत्र देऊन निविदा प्रपत्रातील Clause no. 22 प्रमाणे त्यांनी सदर नुकसान भरपाई बाबतचा वाद हा प्रधान सचिव ह्यांच्याकडे मांडलेला आहे. सदर बाबत मि.भा. म.पा. ११०६/५३० प्रक्र, ७१/०६/ नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय ,मुंबई – ३२ दि. २८/०३/२००६ च्या पत्राने निविदा प्रपत्रातील खंड २२ अन्वये मा. प्रधान सचिव-२, नगरविकास विभाग ह्यांच्याकडे निर्णयाकरिता बैठक आयोजित केलेली होती. परंतू मा. प्रधान सचिव-२ सो. ह्यांना काही कारणास्तव बैठकीस हजर रहाता आलेले नसल्याने बैठक रद्द करण्यांत आलेली होती. सदर संदर्भात महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक मि.भा. म.पा. ११०६/ ५३० प्रक्र, ७१/०६/ नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय ,मुंबई – ३२ दि. १३/०४/२००६ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी दोन्ही पक्षात झालेल्या वादासंदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव – २ यांच्या ऐवजी शासनातील सहसचिव किंवा अन्य महानगरपालिकेचे आयुक्त ह्यांची सदर संदर्भात लवाद म्हणून नियुक्ती केल्यास आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिकेची समंती असल्यास त्याबाबत शासनास तसे कळविणे बाबत सुचित केले होते. शासनाच्या सदर पत्रास इकडील पत्र क्र. मनपा/जकात/ ४२/२००६-०७ दि. १७/०४/२००६ नुसार कळवून सदर वादासंदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव -२ ऐवजी शासनातील सहसचिव अथवा अन्य महानगरपालिकेचे आयुक्त ह्यांची लवाद म्हणून नियुक्ती केल्यास त्यास मनपाची सहमती राहील असे कळविण्यांत आलेले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक मि.भा. म.पा. ११०६/ ५३० प्रक्र, ७१/०६/ नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय ,मुंबई – ४०००३२ दि. २५/०४/२००६ च्या पत्राने लवाद कामी शासनाचे सहसचिव मा. श्री. के एन. खवारे यांची शिफारस शासनानी केली असून आवश्यक आदेश निर्गमीत करण्यांस सुचीत् केलेले होते. त्याअनुषंगाने प्रस्ताव अवलोकनार्थ स्थायी समिती समोर सादर केले असता स्थायी समिती ठराव क्र. १४ दि. ०५/०५/२००६ नुसार त्यांनी सदर प्रकरणांत लवाद म्हणून मा. श्री. के. एन. खवारे , सह सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याऐवजी श्री. शिवमुर्ती नाईक , आयुक्त, भिवंडी महानगरपालिका ह्यांची नियुक्ती करण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि मा. आयुक्त , भिवंडी महानगरपालिका सदर लवादकामी उपलब्ध न झाल्यास किंवा असहमती दर्शविल्यास प्रधान सचिव -२ यांना वादासंदर्भात लवाद म्हणून कामकाज पहाण्यास हि महासभा मान्यता देत आहे. तसेच सदर वादासंदर्भात मा. प्रधान सचिव -२ यांच्याकडील निकाल विरोधात गेल्यास म.न.पा. मा. उच्च न्यायालयात दावा दाखल करील. व मा. उच्च न्यायालयातील निकाल विरोधात गेल्यास म.न.पा. मा. सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल करेल. सदरची कार्यवाही करणेबाबत ही महासभा मान्यता देत आहे.

**सुचक :-** (सही)

**अनुमोदन :-** (सही)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(सही)

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०५/२००६

प्रकरण क्र. २१ :-

मंजुर विकास योजनेत मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ७४७ या जागेत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कब्रस्तान स्मशानभुमी, बरेल ग्राऊन्ड व बगिचा आरक्षण प्रस्तावित करणेबाबत.

(मा. महापौर सो. यांच्या परवानगीने सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०५/२००६

प्रकरण क्रमांक ( २२ ) विकास आराखडयातील आरक्षण क्र.१९२, १९३ मधील नियोजित रक्तपेढी, वातानुकुलित शवागृह, दवाखाना व वाचनालय इमारतीवर दवाखाना व प्रभाग कार्यालयाकरीता वाढीव दोन मजले बांधणे कामाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्रमांक :- २०

मिरा रोड येथे विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक १९२, १९३ मध्ये आमदार निधी तसेच महानगरपालिकेच्या निधीतून नागरीकांकरीता रक्तपेढी, वातानुकुलीत शवागृह, दवाखाना (O.P.D.) व वाचनालय इत्यादी करीता इमारत बांधणे कामी मा.महासभा दि.०५/०५/२००५ ठराव क्र.११ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळाल्यानुसार प्रत्यक्षात काम सुरू आहे. सदर इमारत तळमजल्याची आहे. सदर इमारतीचे संकल्प चित्र G + 6 करीता मंजूर आहे. सदर इमारतीवर वाढीव दोन मजले बांधल्यास दवाखाना करीता एक मजला व प्रभाग कार्यालयाकरीता एक मजला उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रभाग क्र.४ करीता प्रभाग कार्यालयाकरीता अपु-या पडणा-या जागेची अडचण संपणार आहे. सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामांकरीता तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच आमदार निधीतून निधी उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. आर्कीझम यांच्याकडून सदर कामी रू.२,२८,९९,१७१/- एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. एकुण बांधकाम क्षेत्र १९४३.३४ चौ.मीटर एवढे प्रस्तावित आहे. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर काम मे. आर्किझम, तांत्रिक सल्लागार यांच्यामार्फत मंजूर दरानुसार करून घेण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सुचक:- श्री रॅटन बोर्जेस

अनुमोदक:- श्री परशूराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १८/५/२००६

**प्रकरण क्रं. :- ( २३ )** विकास आराखडयातील आरक्षण क्रं. २६२ "टाउनपार्क" विकसित करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक :- ( २१ )**

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात आरक्षण क्रं. २६२ "टाउनपार्क" करीता आरक्षित असुन सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र ४.४८ हेक्टर एवढे आहे. सदर आरक्षणाची जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असुन बरीचशी २.८९ हेक्टर एवढी जागा ताब्यात घेतलेली आहे. तसेच बाहेरील बाजुस कुंपणभिंत बांधण्याचे काम सुध्दा सुरु आहे. सदर आरक्षण पुर्णतः विकसित झाल्यास महानगरपालिकेच्या शोभेत भर पडणार आहे. सदर "टाउनपार्क" आरक्षणात तलावाचे विस्तारीकरण करणे, नागरीकाकरीता जॉगींग ट्रॅक, रस्ते, कॉफी हाउस, बोट क्लब, लहान मुलांना खेळण्याकरीता विविध सुविधा, लहान रेल्वे ट्रॅक, सुलभ शौचालय, ॲम्पी थिएटर (स्टेज) डेकोरेटीव्ह वॉल व इतर सुशोभिकरण लॅड स्केपिंग, विदयुत फिटींग, शोभेचे दिवे करणे कामी तांत्रिक सल्लागार मे. आर्कीझम यांनी एकुण रु. ६,४१,०३,०९८/- रकमेचे अंदाजपत्रक तयार केलेले असुन खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत.

| .क्रं. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | शिवार गार्डन मध्ये बोटींग ट्रॅक विस्तारीकरण करणे. (भाग – १ ) | रु. २,२१,३२,६१3/- |
| २ | टाउनपार्क कुपणभिंतीलगत खेळण्याकरीता रेल्वे ट्रॅक करणे. | रु. ४६,६८,०२०/- |
| ३ | टाउन पार्क मध्ये जॉगर्स ट्रॅक, पाथवे तयार करणे. | रु. ८०,८६,७९१/- |
| ४ | टाउन पार्क मध्ये अंतर्गत रस्ते तयार करणे. | रु. २८,९१,०८४/- |
| ५ | टाउन पार्क दर्शनी ठिकाणी डेकोरेटीव्ह व रिटेनिंग वॉल तयार करणे. | रु. १२,८७,३४०/- |
| ६ | टाउन पार्क मध्ये सुलभ शौचालय बांधणे. | रु. १०,५८,२०४/- |
| ७ | टाउन पार्क मध्ये ॲम्पी थिएटर बांधणे. | रु. ७,६८,८१३/- |
| ८ | टाउन पार्क मध्ये Curved Arch Structure बांधणे. | रु. ३०,३६,०६६/- |
| ९ | टाउन पार्क मध्ये कॉफी हाउस बांधणे. | रु. १९,६४,६५२/- |

| | | |
|---|---|---|
| १० | टाउुन पार्क मध्ये बोट क्लब बांधणे. | रु. ११,५१,५८८/- |
| ११ | संपुर्ण टाउुन पार्क मध्ये विदयुत फिटींग, लॅडस्केपिंग व इतर आवश्यक कामे करणे. | रु. १,००,००,०००/- |

वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्च मोठया प्रमाणावर असल्याने सदर काम हे बांधा वापरा व हस्तांतरण (B.O.T.) या तत्वावर खाजगी एजन्सी कडुन त्यांचा स्वतःची रचना, नकाशा, डीझाईन, मुदत, टाउुन पार्क मध्ये करावयाच्या विविध सोयी सुविधा व इतर अटीशर्तीनुसार करण्याकरीता निविदा फॉर्म तयार करुन स्पर्धात्मक निविदा मागविण्यात याव्यात. सदर स्पर्धात्मक निविदा मधुन योग्य अटीशर्तीच्या निविदास मा. स्थायी समितीची मान्यता घेउुन आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टिने अटीशर्ती ठेउुन एजन्सीसोबत करारनामा करण्यात यावा. तसेच आवश्यकता भासल्यास मे. आर्कीझम, तांत्रिक सल्लागार यांच्या देखरेखेखाली मंजुर दराने सदर प्रकल्पाचे काम करुन घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री हॅरल बोर्जिस. अनुमोदन :- श्री परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

SSP/DK/M/8

# मा. महासभा दि. १८/०५/२००६

प्रकरण क्रमांक ( २४ ) मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ नुसार बंद न केलेल्या दुभाजकातील प्रवेशाची माहिती देणे.

ठराव क्रमांक ( २२ )

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रस्त्यावरील दुभाजकात असलेले खालील प्रवेश वगळता इतर सर्व प्रवेश बंद करण्यावाबत मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

१. शिवाजी महाराज पुतळया मागील पहिले दोन प्रवेश
२. सिल्व्हर पार्क जक्शन
३. एस. के. स्टोन जक्शन
४. मिरारोड पोलिस स्टेशन (कनकीया जक्शन)
५. शिवार गार्डन जक्शन

वरील नमुद अ. क्र. १ ते ५ प्रवेश वगळता परीवहन सेवेच्या वसला जाण्याकरीता खालील प्रवेश बंद करण्यात आलेले नाहीत.

१. दिपक हॉस्पीटल समोरील जक्शन
२. हटकेश उद्योग नगर येथील जक्शन

मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ मध्ये वदल करून परीवहन सेवेकरीता

१) दिपक हॉस्पीटल समोरील जक्शन

२) हटकेश उद्योग नगर येथील जक्शन

वरील ठिकाणी दुभाजकातील प्रवेश सुरू ठेवण्यात यावेत. उर्वरीत सर्व ठिकाणचे रस्ता दुभाजकातील प्रवेश त्वरीत बंद करण्यात यावे.

सुचक :- श्री हैरल बोर्जीस

अनुमोदक :- श्री परशूराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिटासन अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०५/२००६

**प्रकरण क्र. २५ :-** गटनेत्यांना केबिन देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(मा. महापौर सो. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०५/२००६

**प्रकरण क्र. २६ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० पोटकलम १ अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत.**

ठराव क्र. २३ :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये (१) पाणी पुरवठा समिती, (२) विधी कामकाज समिती, (३) बांधकाम समिती व (४) नियोजन समिती अशा चार समित्या गठित करण्यांस ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. हेरल्ड बोर्जीस    अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०५/२००६

(ज प्रस्ताव)

**प्रकरण क्र. २७ :-**

**सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर यांचे दिनांक ०३/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत.**

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(४०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०५/२००६

(अप्रस्ताव)

प्रकरण क्र. २८ :-

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १०/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तींच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत.

(मा. महापौर सो. यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १८/५/२००६

(डी प्रस्ताव)

**प्रकरण क्र. २९ :-** सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक १२/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विकास आराखड्यातील आरक्षणे हस्तांतरीत करुन घेण्याबाबत.

मा. महापौर सो. यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/५/२००६

(उप प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ३० :-** सन्मा. सदस्य श्री. शशीकांत जगन्नाथ भोईर यांचे दिनांक १२/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - समान घरपट्टी कर आकारणी करण्यास अधिकारी टाळाटाळ करीत आहेत अशा अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार कारवाई करणेबाबत.

मा. महापौर सो. यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

प्रकरण क्र. ३१ :- दि. २०/०३/२००६ व दि. ३१/०३/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २४ :-

दि. २०/०३/२००६ व दि. ३१/०३/२००६ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

**प्रकरण क्र. ३२ :- मा. वृक्षप्राधिकरण सदस्यांना सभेचे मानधन देणेबाबत.**

ठराव क्र. २५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन केलेली आहे. सदर समितीमध्ये एकूण १५ सदस्य हे अध्यक्षासह आहेत व त्यापैकी ३ सदस्य हे स्विकृत सदस्य असून ११ सदस्य हे महापालिका सदस्य आहेत. पालिकेच्या सदस्या व्यतिरिक्त जे सदस्य वृक्षप्राधिकरण समितीवर सदस्य म्हणून काम करतात त्यांना मानधन अदा केले जात नाही तरी वरील वस्तुस्थितीचा विचार करता मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीच्या सदस्यांना मानधन म्हणून प्रतिमहिना रूपये एक हजार व बैठक भत्ता म्हणून रूपये शंभर अदा करणेस ही आजची सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडतो.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(८५)

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

प्रकरण क्र. ३३ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नऊ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे

ठराव क्र. २६ :-

प्रकरण पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला पालिका सदस्यांमधून ९ पालिका सदस्यांची नेमणूक ठरावाद्वारे करण्यांत येत आहे.

महिला व बालकल्याण समिती.

१) सन्माननिय नगरसेविका - सौ० जयाबाई भोईर
२) सन्माननिय नगरसेविका - सौ० उर्मिला भामरे
३) सन्माननिय नगरसेविका - सौ० जिवी वाडे
४) सन्माननिय नगरसेविका - सौ० ज्योत्स्ना हसनाळे
५) सन्माननिय नगरसेविका - सौ० लिला पाटील
६) सन्माननिय नगरसेविका - सौ० मुक्ता राजणकर
७) सन्माननिय नगरसेविका - सौ० संगीता म्हात्रे
८) सन्माननिय नगरसेविका - सौ० नयना म्हात्रे
९) सन्माननिय नगरसेविका - सौ० प्रियांका करंबळे

वरीलप्रमाणे महिला व बालकल्याण समिती (विशेष) सदस्यांची मुदत एक (१) वर्षाची राहील. असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सुचक :- श्री हेरल बोर्जिस

अनुमोदन :- श्री परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

(४९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०।०६।२००६.

प्रकरण क्र. ३४.

ठराव क्र.२७.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पॅथोलॉजिकल लॅब सुरु करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. १९.०४.२००३ मा. महासभा मंजूरीने शहरात एकूण सात आरोग्य केंद्र व एक फिरता दवाखाना सुरु आहे. या आरोग्य केंद्रामध्ये दररोज ४०० ते ५०० बाह्य रुग्ण तपासले जातात. यामधील काही रुग्णांना त्यांच्या आजाराने निदान करण्याकरिता व पुढील औषधोपचारासाठी रक्त व लघवी तपासणी करावी लागते. महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रावर पॅथोलॉजिकल लॅब नाही. याकरिता त्यांना खाजगी पॅथोलॉजिकल लॅबमधून रक्त व लघवी तपासणी करणेकामी पाठवण्यात येते.

मा. प्रभाग समिती दि. ३०.०८.२००५ प्रकरण क्र. १२, अन्वये महानगरपालिकेच्या भाईंदर पश्चिम आरोग्य केंद्रात पॅथोलॉजिकल लॅब उपलब्ध करणेत यावी असा ठराव मंजूर झाला आहे.

महापालिका क्षेत्रात पॅथॉलॉजिकल लॅब सुविधा भाईंदर पश्चिम आरोग्य केंद्र, भाईंदर पूर्व आरोग्य केंद्र, मिरारोड आरोग्य केंद्र, उत्तन आरोग्य केंद्र, याठिकाणी आवश्यक जागा उपलब्ध असल्याने सुरु करणे आवश्यक आहे. या आरोग्य केंद्रामध्ये पॅथोलॉजिकल लॅब सुरु करणेपूर्वी आवश्यक असे बांधकाम व फर्निचरचे काम करावयास लागणार आहे.

प्रत्येक पॅथोलॉजिकल लॅब करिता खालील प्रमाणे साहित्य व उपकरणे आवश्यक आहे.

5) Cell Analyser

6) Cell Counter

7) Micro Scope

8) Centrifuge Machine

इत्यादी.

तसेच पॅथोलॉजिकल लॅबमध्ये रक्त व लघवी तपासणीकरिता विविध प्रकारचे Reagents आवश्यक असतात.

महापालिका क्षेत्रात चार ठिकाणी पॅथोलॉजिकल लॅब सुरु करणेकामी खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग आवश्यक आहे.

**1) PATHOLOGIST (M.D.)**

**2) TECHNICIAN (B. Sc.) (D.M.L.T.)**

**3) COMPUTER OPERATOR** संगणक चालक

**4) ASSISTANT** सहाय्यक

वरील प्रमाणे चार ठिकाणी पॅथोलिजिकल लॅब सुरु करणेसाठी एकुण चार प्रयोगशाळा तत्रंज्ञ, चार संगणक चालक व चार मदतनीस / सुफाई कामगारांची आवश्यक आहे. या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. चा तपशिल खालील प्रमाणे.

**१) TECHNICIAN (B.Sc.) (D.M.L.T.) प्रयोगशाळा तंत्रज्ञ**

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | :- | मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी. एस. सी. पदवी<br>डी. एम. एल. टी. आवश्यक |
| अनुभव | :- | पॅथोलॉजिक लॅबमध्ये काम केल्याचा दोन वर्षाचा अनुभव |
| वय | :- | २८ वर्षापर्यंत |
| ठोक वेतन | :- | करारपध्दतीने ठोक वेतन ४०००/- |

**२) COMPUTER OPERATOR संगणक चालक**

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | :- | कोणत्याही शाखेतील पदवी परिक्षा + MSCIT उत्तीर्ण |
| अनुभव | :- | संगणकावर काम करण्याचा सहा महिन्याचा अनुभव |
| वय | :- | २८ वर्ष किंवा कमी |
| ठोक वेतन | :- | ३५००/- |

**3) ASSISTANTE - सहाय्यक / मदतनीस (सफाई कामासह)**

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | :- | १२ वी पास |
| अनुभव | :- | |
| वय | :- | २८ ते ३५ वर्ष |
| ठोक वेतन | :- | ३०००/- मानधन |

वरील पदापैकी पॅथोलॉजिस्ट एम. डी. या पदाचा पगार जास्त असल्याने महापालिका क्षेत्रात सद्या कार्यरत असणाऱ्या वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीची साइनिंग

पॅथोलॉजिस्ट म्हणून ठोक मानधनावर नेमणूक करणे गरजेचे आहे. याकरिता पॅथोलॉजिस्ट एम. डी. या पदाकरीता ठोक मानधन म्हणून रू. १५,०००/- प्रती माह देणेस मा. महासभेस शिफारस आहे.

या पॅथोलॉजिक लॅबमध्ये येणाऱ्या रूग्णाकडून शुल्कपोटी ठराविक रक्कम घेणे आवश्यक आहे. रक्त व लघवी तपासणी करिता ५० रू. शुल्क आकारणी करणेस शिफारस आहे. पॅथोलॉजिकल लॅब सुरू करणेस व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरूपात करारपध्दतीने नेमणेस औषधी, उपकरणे, साहित्य खरेदी करणेस व आरोग्य केंद्रावर पॅथोलॉजिकल लॅब सुरू करणेकामी आरोग्य केंद्रावर आवश्यक ते फेरबदल करणेस व ज्याठिकाणी पुरेशी जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी भाडयाने जागा घेणेस आवश्यक आहे.

महापालिका क्षेत्रात पॅथोलॉजिकल लॅब सुरू करणे मा. महासभा मंजुरी देत आहे. तसेच पॅथोलॉजिकल लॅब सुरू करणे करीता आवश्यक पदे मंजुरी करीता शासनाकडे पाठवावी व पदांना मंजुरी मिळेपर्यंत करार पध्दतीने पदे भरण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक हेरल्ड बोर्जीस अनुमोदक परशुराम पाटील

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

४९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०.९.२००६

**प्रकरण क्रमांक :-** ( ३५ ) महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीवर पाचवा व सहावा मजला बांधणे कामाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक :-** ( २८ )

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची मुख्य कार्यालय इमारत बांधकाम २००० मध्ये पूर्ण झालेले असुन सदर इमारत तळ + ४ मजल्याची आहे. सदर इमारतीचे संकल्प चित्र तळ + ६ माळयाचे मंजुर आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली आहे. महानगरपालिकेचे विविध समित्यांची स्थापना झालेली असुन विविध सांविधानिक पदाधिकारी कार्यरत आहेत. महापालिकेच्या आस्थापनेवर कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत. कामाचा व्याप वाढून कर्मचारी, अधिकारी सुध्दा वाढलेले आहेत. त्यामुळे विविध विभागामध्ये कर्मचारी / अधिकारी यांना बसण्याकरीता जागा अपूरी पडत आहे, तसेच पदाधिका-यांना सुध्दा जागा अपूरी पडत आहे. महानगरपालिकेची मुख्य कार्यालय इमारत तळ + ६ मजल्याची बांधण्याकरीता सन ९७ मध्ये निविदा काढण्यात आल्या होत्या, परंतु तद्नंतर सदर इमारत तळ + ४ मजले बांधण्याचा निर्णय घेतल्यानुसार सदर इमारत तळ + ४ मजले बांधलेली आहे. सदर इमारतीवर पाचवा व सहावा मजला बांधण्याकरीता तांत्रिक सल्लागार मे. आर्किझम यांच्याकडून रू. २,११,३१,०९६ /- एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सन २००६ – ०७ वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर पाचवा व सहावा मजला बांधणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे सदर काम हे मे. आर्किझम यांच्या कंन्सल्टंसीखाली मंजुर दराने करून घेण्यास सुध्दा मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री हेरल बोर्जिस  **अनुमोदन :-** श्री परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.२०/६/२००६

**प्रकरण क्र. ३६ :- संगणक चालक / लघुलेखक नेमणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** :- २९

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अत्यंत अपुरा कर्मचारी वर्ग असून संगणक चालक व लघुलेखक या पदनामाची पदे शासन मंजूर नाहीत. मा.प्रशासकिय ठराव क्र. ७१ दि.२९/४/२००२ अन्वये संगणक चालक व लघुलेखक संवर्गातील पदाच्या पदनिर्मितीत मंजूरी असून प्रशासनामार्फत सदर पदे शासन मान्यतेकरीता व मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्तावसहित पाठविण्यांत आलेला आहे. महानगरपालिकेच्या दैनंदिन कामाचा व्याप लक्षात घेता संगणक चालक व लघुलेखक पदावर कर्मचारी पुरवठा करण्याचा ठेका दिलेला आहे. सदर संगणक चालक व लघुलेखक गेली तीन वर्षापासून बरेच कर्मचारी काम करीत आहेत. परंतू त्यांना ठेकेदार तुटपुंजे पगार देत आहे. सदर कर्मचारी महानगरपालिकेची करीत असलेली सेवा व कामकाज लक्षात घेता त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नेमणे आवश्यक आहे असे मा. महासभेचे मत आहे. प्रशासनामार्फत मा. महासभेच्या मान्यतेने यापूर्वी आरोग्य केंद्रावरील कर्मचाऱ्याची अशाप्रकारे नेमणूक केलेली आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नेमावयाच्या कर्मचाऱ्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | कु. सपना जे. मर्वी | संगणक चालक |
| २ | कु. दिप्ती रा. चांदणे | संगणक चालक |
| ३ | सौ. प्रज्ञा प्र. जाधव | संगणक चालक |
| ४ | कु. निर्भय जगदिश पाटील | संगणक चालक |
| ५ | कु. सेंड्रीका जेम्स बगाजी | संगणक चालक |
| ६ | कु. मिनाक्षी किसन भोईर | संगणक चालक |
| ७ | कु. स्वाती घनश्याम पाटील | संगणक चालक |
| ८ | कु. आदेश यशवंत पाटील | संगणक चालक |
| ९ | कु. अनुराधा वि. साळूंखे पाटील | संगणक चालक |
| १० | कु. गुरुनाथ गो. मयेकर | संगणक चालक |
| ११ | सौ . अर्चना पंकज घरत | संगणक चालक |
| १२ | कु. निलेश चंद्रकांत शनगरपू | संगणक चालक |
| १३ | कु. प्राजक्ता संतोष चुरी | संगणक चालक |
| १४ | कु. सुरेखा सीताराम नाईक | संगणक चालक |
| १५ | कु. कुणाल शशिकांत गुडेकर | संगणक चालक |
| १६ | कु. अतुल चंद्रहास्य लाड | संगणक चालक |
| १७ | कु. माधुरी देवचंद चिटके | संगणक चालक |
| १८ | सौ. अस्मिता भु. जगताप | संगणक चालक |
| १९ | कु. यामिनी रतन पाटील | संगणक चालक |

| | | |
|---|---|---|
| २० | श्री. किरण सुरेश जाधव | संगणक चालक |
| २१ | कु. कविता संभाजी गुरव | संगणक चालक |
| २२ | कु. रुपेश तुकाराम दहिवलकर | संगणक चालक |
| २३ | कु. राकेश रामदास खेडेकर | संगणक चालक |
| २४ | कु. वैशाली गायकवाड | संगणक चालक |
| २५ | कु. सुचिता परब | संगणक चालक |
| २६ | सौ. वैशाली भगवान कल्याणकर | संगणक चालक |
| २७ | कु. विकास अनिल परबत | संगणक चालक |
| २८ | सौ. कविता गणेश सुळे | संगणक चालक |
| २९ | कु. हर्षला अनंत पाटील | संगणक चालक |
| ३० | कु. भाग्यश्री रामचंद्र पाटील | संगणक चालक |
| ३१ | कु. महेश रामचंद्र पाटील | संगणक चालक |
| ३२ | कु. रंजना एडवर्ड कासुधर | संगणक चालक |
| ३३ | कु. सुहास सुरेश परब | संगणक चालक |
| ३४ | कु. दर्पण कमलाकर वझे | संगणक चालक |
| ३५ | कु. वैभव गाडे | संगणक चालक |
| ३६ | कु. मनिष ग. भोईर | संगणक चालक |
| ३७ | कु. निष्कलंका (निशा) इ. बगाजी | संगणक चालक |
| ३८ | कु. विरेंद्र यशवंत पाटील | संगणक चालक |
| ३९ | कु. भक्ती राजन अरवंदेकर | संगणक चालक |
| ४० | कु. मंजिरी पेंडसे | संगणक चालक |
| ४१ | कु. विक्रम उंडाळे | संगणक चालक |
| ४२ | सौ. शर्मिला शेलार | संगणक चालक |
| ४३ | कु. एरीका सिरील बोर्जीस | संगणक चालक |
| ४४ | कु. दिपमाला विनायक मोसेकर | संगणक चालक |
| ४५ | कु. अमोल जयंत पाटील | संगणक चालक |
| ४६ | कु. महेश उमाकांत पाटील | संगणक चालक |
| ४७ | कु. रियाज शेख | संगणक चालक |
| ४८ | श्री. दिनेश रघुनाथ चापके | संगणक चालक |
| ४९ | कु. लॉरेटा गऱ्या | संगणक चालक |
| ५० | कु. सनिल जिकमडे | संगणक चालक |
| ५१ | कु. मिना पोशापीर | संगणक चालक |
| ५२ | कु. पुरुषोत्तम पाटील | संगणक चालक |
| ५३ | कु. तुषार दि. जगदाळे | संगणक चालक |
| ५४ | कु. दिपिका मनोहर पाटील | संगणक चालक |
| ५५ | कु. शंकर ल. चौधरी | संगणक चालक |
| ५६ | कु. संतोष सुर्यकांत सावंत | संगणक चालक |
| ५७ | कु. दिलीप पुंडलिकराव बुरपल्ले | संगणक चालक |
| ५८ | कु. ऑफेलिया मुनिस | संगणक चालक |
| ५९ | सौ. रेश्मा म्हात्रे | संगणक चालक |
| ६० | कु. भावेश विश्वनाथ राणे | संगणक चालक |

| | | |
|---|---|---|
| ६१ | कु. सुनिल जाधव | संगणक चालक |
| ६२ | कु. मंगेश प्रकाश घरत | संगणक चालक |
| ६३ | कु. सुप्रिया चंद्रकांत पाटील | संगणक चालक |
| ६४ | कु. निवेदिता मनोहर मोरे | संगणक चालक |
| ६५ | कु. प्रमिला जगदिश बावडेकर | संगणक चालक |
| ६६ | कु. मेघा मारुती पाटील | संगणक चालक |
| ६७ | सौ. अनुष्का आनंद जोशी | संगणक चालक |
| ६८ | कु. प्रफुल्ल पाटील | संगणक चालक |
| ६९ | कु. राकेश पाटील | संगणक चालक |
| ७० | कु. सुशिल घरत | संगणक चालक |
| ७१ | कु. श्रुतिका श्रीकांत मोरे | संगणक चालक |

## लघुलेखक

| | | |
|---|---|---|
| १ | कु. सुजाता जयंत येलवे | लघुलेखक सचिव विभाग |
| २ | कु. स्वाती तांबे | लघुलेखक सचिव विभाग |
| ३ | कु. श्वेता चंदनशिवे | लघुलेखक सचिव विभाग |
| ४ | कु. रुपेश बाणे | लघुलेखक सचिव विभाग |

वरील सर्व कर्मचारी हे संबधित पदास लागणारी पात्रता व शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत. तरी त्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक रु.३९००/- महिना (२६ दिवसाकरीता) व लघुलेखक रु. ५०००/- महिना (२६ दिवसाकरीता) या मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे. सदर नेमणूकींबाबत पुढील सर्व कार्यवाही आस्थापना विभागाने करावी. संगणक चालक / लघुलेखक पुरवठा करणे बाबतचा ठेका रद्द करण्यांत यावा.

**सुचक :- श्री. ॲरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**पिठासीन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२०/०६/२००६**

**प्रकरण क्र. ( ३७ )** :- घोडबंदर येथिल उघाडीचे दरवाजे दुरुस्ती व बांधकाम करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र.** ३०

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर जनतानगर, काशीगांव, लक्ष्मीबाग संजय गांधी उद्यान येथील डोगंरावरील पावसाळी पाण्याचा निचरा घोडबंदर येथील उघाडी क्र. ३ व ४ मधूनच होतो. सदर भागातील पावसाळे पाणी खाडीला जाणारा एकमेव मार्ग आहे. अस्तीवातील उघाडी अपूरी पडत असल्याने गावालगत परीसरात पुरदृष्य परिस्थिती निर्माण होते. पावसाळी पाण्याचा निचरा पूरेसा होत नसल्याने सदर ठिकाणी उघाडी वाढीव दरवाजे बांधणे गरजेचे आहे.

सदर जागा महाराष्ट्र शासन खार भूमी विकास विभागाची असल्याने उघाडी दूरुस्ती करणे बाबत खार भूमी विकास विभागाची परवानगी आवश्यक आहे. त्यानुसार पत्रव्यवहार केला असता त्यांच्यामार्फत प्रत्यक्ष जागेची पाहणी करून रु.२५,२९,३१६/- रक्कमेची अंदाजपत्रके सादर करण्यात आलेली आहेत. सदर काम करण्याकरिता खारभूमी विकास विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याने त्यांनी महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केलेली आहे. तरी रु.२५,२९,३१६/- खार भुमी विकास विभागाकडे त्वरीत भरणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री हेरल बोर्जेस **अनुमोदक :-** श्री परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

10 R.P. (Legal)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०। ६।२००६

प्रकरण क्र ३८ -

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावली (Appendix - XX) मध्ये फेरबदल सौरउर्जेवर पाणी गरम करण्याची व्यवस्था अस्तित्वातील वाणिज्य, शासकीय, सार्वजनिक, रहिवास वापराचे तसेच नव्याने बांधण्यात येणा-या रहिवास, सार्वजनिक, शासकीय वापराचे इमारतीमध्ये बसविण्याची तरतूद नियमावलीत करण्याबाबत.

ठराव क्र. ३७ -

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील (१) हॉस्पीटल (२) हॉटेल्स व विश्रामगृह (३) हॉटेल्स, शाळा, कॉलेज व इतर संस्था (४) पोलिस / लष्करी छावणी (५) कॅन्टीन (६) प्रयोगशाळा व संशोधन संस्था (ज्यासाठी गरम पाण्याची आवश्यकता आहे.) अशा वापराच्या इमारतीसाठी सौरउर्जेवर (Solar Energy) पाणी गरम करण्याची व्यवस्था बसविणेसाठी मिरा भाईंदर शहरासाठीच्या विकास नियंत्रण नियमावली मध्ये (Appendix - XX) (पृ.क्र. १३७) मध्ये तरतूद आहे.

महानगरपालिका क्षेत्रात विजेची बचत मोठ्या प्रमाणात होण्याचे दृष्टीने वरील प्रमाणेच्या तरतूदीची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील वाणिज्य वापराच्या इमारती, शासकिय इमारती (ज्यामध्ये गरम पाण्याची आवश्यकता भासणार आहे.) तसेच जुन्या रहिवासी वापराच्या इमारतीसाठी व नविन रहिवास वापराचे इमारतीसाठी याप्रमाणेची तरतूद लागु करण्यासंदर्भात विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतूद करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. ज्या अस्तित्वातील इमारतीत वर नमुद १ ते ६ प्रयोजनार्थ वापर सुरु असतील त्या वापरदारांना तसेच शासकिय इमारतींना हि तरतूद सक्तीची करणे आवश्यक आहे.

जुन्या रहिवास वापराचे इमारतींसाठी ज्या सोसायटी / मालक अशाप्रकारे तरतूद करतील त्यांना वार्षिक मालमत्ता करात सवलत दिल्यास या योजनेस चांगला प्रतीसाद मिळेल त्यादृष्टीने जुन्या रहिवास इमारतींच्यासाठी १०% मालमत्ता करात सवलत देणे योग्य आहे.

विकास नियंत्रण नियमावलीमधील याबाबतचे फेरबदल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Existing Rule | Modified Rule |
|---|---|---|
| 1 | Add – Appendix – XX Hospital and | Appendix – XX<br>Hospital and Nursing Homes |
| 2 | New – Appendix – XX – (2) VI | Appendix – XX – (2) VI<br>Residential Building of any type. |
| 3 | New – Appendix – XX – (2) VII | Appendix – XX – (2) VII.<br>All Government building and Public sector building where hot water required. |
| 4 | New – Appendix – XX – (2) VIII | Appendix – XX – (2) VIII<br>Functional Building, Railway Stations like waiting rooms, retiring rooms, rest rooms and inspection bungalows and Catering units. |

<table>
<tr><td>5</td><td>New – Appendix – XX – (2) IX</td><td>Appendix – XX – (2) - IX<br>Community Centers, Banquet Halls, Mangal Karyalaya and Buildings for Similar use.</td></tr>
<tr><td>6</td><td>New – Appendix – XX – (8)</td><td>Appendix – XX – (8)<br>(g) Installation of Solar Water assisted water heated system in the existing building shall be made mandatory at the time of change of use to above said category (In rule Appendix –XX (2) – I to V) provided there is a system or installation for supplying hot water.<br>(h) Installation of Solar assisted Water heated system in the existing building shall be made mandatory where existing user is as rule Appendix – XX (2) I to V and VII the provision of system shall be started within one year and shall be completed within two years from the date of sanction of this rule.<br>(i) The Commissioner may insist for installation of solar assisted water heated system in the existing residential building of all type the owner / co-operative Housing society who provide the system will be given 10% incentive in payment of yearly property tax till the system is working.<br><u>Note</u> – for the existing Building where such system is proposed submission of the R.C.C Consultants Certificate regarding the stability of structure shall be made compulsory.</td></tr>
<tr><td>7</td><td>Append x –XX -5 (Table)<br><table><tr><th>Type of Building</th><th>per capita capacity Recommended Liter per day</th></tr><tr><td>6) (New)<br>7) (New)</td><td>------<br>------</td></tr></table></td><td>Appendix – XX – 5 (Table)<br><table><tr><th>Type of building</th><th>per capita capacity Recommended Liter per day</th></tr><tr><td>6) Residential</td><td>25</td></tr><tr><td>7) Government / Public Sector</td><td>100</td></tr></table></td></tr>
</table>

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील Appendix –XX मध्ये वरिलप्रमाणे फेरबदल रण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये नागरिकांच्या ुचना व हरकती मागविण्यास व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक – श्री हरल बोरिले        अनुमोदक – श्री परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

**प्रकरण क्र. ३९ :- महापौर निधी वितरणाबाबत धोरण ठरविणे.**

**ठराव क्र.** ३२ **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने **''महापौर सहाय्यता निधी''** स्थापन करण्याकरिता प्रस्ताव या सोबत सादर करण्यांत आला असून ''महापौर सहाय्यता निधी'' त्याचा उद्देश, कार्यकारी समिती, सभा व त्यांचे अधिकार, ''महापौर सहाय्यता निधी'' वितरणासंबंधी नियम आदी बाबतचा तपशिल सोबत जोडलेला आहे.

मा. महासभेच्या मान्यतेनंतर धर्मदाय आयुक्त यांच्याकडून रितसर परवानगी घेऊन **''मिरा भाईंदर महानगरपालिका महापौर सहाय्यता निधी''** स्थापन करुन पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यांस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** श्री हरल बोर्जिस **अनुमोदन :-** श्री पारशराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/६/२००६.

ठराव क्र. ३३

प्रकरण क्र. ४०

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करून बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर खत निर्मिती प्रकल्प उभारणे बाबत.

मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या १९९१ च्या जनगणनेनुसार १ लाख ७५ हजार होती. २००१ च्या जनगणनेनुसार महापालिका क्षेत्राची लोकसंख्या ५ लाख २० हजार आहे महापालिका क्षेत्राची सध्याची अंदाजित लोकसंख्या ७,५०,००० आहे. महापालिका क्षेत्रात दररोज ४५८ मेट्रीक टन घनकचरा निर्माण होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस उत्तन व पाली येथे ३१ .हेक्टर ४६ आर जागा घनकचरा प्रकल्पाकरता मा. जिल्हाधिकाऱ्याकडून दि. २६.१२.२००२ प्राप्त झालेली आहे. प्राप्त जागेवर घनकचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणे, प्रकल्पाकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ऑथोरायझेशन दि. २७.०८.२००४ प्राप्त झाले आहे. मा. महासभा दि. ६.११.२००४ ठराव क्र. ३७ अन्वये खत निर्मिती प्रकल्पास उभारणेस मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार निविदा मागवून प्राप्त निविदा पैकी मे. मार्लंड वायो इंजिनिरीग यांची निविदा मा. स्थायी समितीने ठराव क्र. १८६ दि. ३०.३.२००० अन्वये मंजूर केलेली आहे. दि. ३.६.२००५ रोजी मे. मार्लंड बायो ईंजिनिरीग यांनी ५० मेट्रिक टन जैविक विघटन होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करण्याचा कार्यादेश देण्यात आला. प्रकल्पाठिकाणी जाणारा रस्त्याचे काम पूर्ण होत आले आहे. त्यानुसार खत निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सुरु झाले आहे.

मा. महासभेने पेणकरपाडा येथे २५ मेट्रीक टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करून मिथेन गॅस / विद्युत निर्मिती करण्याच्या प्रकल्प कामास मंजूरी दिली होती. त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या. मे. मलहॅम ईंजिनिरींग यांची निवीदा मा. स्थायी समितीने निवीदा मंजूर करून त्यांच्याशी समवेत करारनामा करण्यात आला. करारनामा केल्यानंतर करार [illegible]

महिन्याच्या आत मंजूर निविदाकाराने वित्तीय संस्थाची मंजूरीचे पत्र महानगरपालिकेस सादर करावयाचे होते. सदरचे पत्र प्राप्त न झाल्याने या कार्यालयाने मे. मेलहॅम इंजिनिरीग यांना अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला त्यास कोणताही प्रतिसाद न आल्याने मा. स्थायी समितीच्या मंजूरीने त्यांची निवीदा दि. १३.०२.२००६ रोजी रद्द करण्यात आलेली आहे.

महापालिका क्षेत्रात जमा होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी फक्त ५० मेट्रीक टन जैविक विघटन होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. उर्वरीत ४०८ मेट्रीक टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे, घनकचरा प्रक्रिया व हाताळणी २००० नुसार महापालिकेस आवश्यक आहे.

सध्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे करिता खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध आहे.

1) Incineration
2) Pyrolysis
3) Pelletisation
4) Anaerobic Digestion (Biomethanation)
5) Aerobic Digestion

तथापी मा. सर्वोच्च न्यायालय तसेच तज्ञांचे मतानुसार घनकचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणे बाबत खत निर्मिती प्रकल्प भारतीय हवामानास, वातावरणास अनुकूल असल्याचे मत दिले आहे.

Aerobic Composting जैविक यापध्दतीने विघटन होणाऱ्या कचऱ्यामध्ये बायो कल्चर मिसळून त्यापासून कंम्पोस्ट खत प्राप्त केले जाते. यांचा भांडवली खर्च तुलनेत कमी आहे व दैनंदिन खर्च व देखभाल खर्चही कमी आहे.

भारतात काही शहरांत घनकचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खत निर्मितीचे प्रकल्प कार्यान्वित आहे. पैकी राजकोट म. न. पा. ने B.O.T. तत्वावर ३०० टन क्षमतेचा प्रकल्प उभारला असून Auto Seggregation सह मुख्यत्वे खतनिर्मिती, कचऱ्यातील उष्मांक असलेल्या पदार्थापासून औद्योगिक कारखान्यामध्ये वापरात येणाऱ्या कोळशाला काही अंशी पर्यायी असे ज्वलनशील पॅलेट्स पुर्नवापर

करता येणारे प्लास्टिक धातु, काच तसेच कचऱ्यात आढळणाऱ्या माती व रेती पासून बांधकाम करणेकामी वापरात येणाऱ्या विटा इ. बाह्य प्रॉडक्टस पुरेशा कार्यक्षमतेने तयार केली जाते.

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या ४५८ मेट्रीक टन घनकचऱ्यापैकी ५० मेट्रीक टन जैविक विघटन होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन खत निर्मिती प्रकल्प उभारणेचे काम सुरू झाले आहे. उर्वरीत ४०८ मेट्रीक टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करून बांधा, वापरा, व हस्तांतरीत करा या तत्वावर खत निर्मिती प्रकल्प उभारणेकामी अनुभवी संस्थाकडून प्रस्ताव (Expression of Interest) मागविणेस महासभा मंजूरी देत आहे.

सुचक :- सौ. सुरेखा गायकवाड      अनुमोदक श्री. प्रफुल्ल पाटील

**महापौर**
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

**प्रकरण क्र. ४१ :-** **पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. ३४ :-**

शासन निर्णयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे "ड" वर्गामध्ये वर्गीकरण करण्यात आलेले असून "ड" वर्ग महानगरपालिकेकरीता निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालील पदे सद्या मंजुर नाहीत.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | महिला व बाल विकास अधिकारी | ६५००-१०५००/- | ०१ |
| २ | अधिक्षक | ५५००-९०००/- | ०१ |
| ३ | सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी | ५५००-९०००/- | ०१ |
| ४ | पशु शल्य चिकित्सक / संबंधित अधिकारी | ८०००-१३५००/- | ०१ |
| ५ | शिक्षणाधिकारी | ८०००-१३५००/- | ०१ |
| ६ | उप परिवहन व्यवस्थापक | ८०००-१३५००/- | ०१ |
| ७ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ८०००-१३५००/- | ०१ |

तरी वरील प्रमाणे शासन निर्णय क्र. संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.-३७९/०५/नवि-२४, दि. ०४/०५/२००६ नुसार पदे महानगरपालिकेस अनुज्ञेय असून सदर पदाची महानगरपालिकेस आवश्यकता आहे. तसेच दैनंदिन कामकाजाचा व्याप लक्षात घेता वरील पदाव्यतिरिक्त खालील पदनामाची पदे मंजुर होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक नगररचनाकार | ६५००-१०५००/- | ०४ |
| २ | शाखा अभियंता | ६५००-१०५००/- | १० |
| ३ | नगररचनाकार | ८०००-१३५००/- | ०१ |
| ४. | सार्वजनिक आरोग्य अधिकारी (स्वच्छता) | ८०००-१३५००/- | ०१ |
| ५ | सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी | ५५००-९०००/- | ०१ |
| ६ | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक | ६५००-१०५००/- | ०९ |
| ७ | स्वच्छता निरीक्षक | ४०००-६०००/- | १६ |
| ८ | महिला आरोग्य सहाय्यक (LHV) | ५०००-८०००/- | ०१ |
| ९ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका (PHN) | ५५००-९०००/- | ०१ |
| १० | व्हॉलमन | २५५०-३२००/- | ५० |
| ११ | प्लंबर | ३०५०-४५९०/- | ०५ |

वरील प्रमाणे शासन निर्णयात नमूद पदे व अन्य विभागात अत्यावश्यक असणारी इतर पदांची आवश्यकता असून सदर पदे मंजुर झाल्यास महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्च ३०%

पर्यंतच राहणार आहे. तरी सदर पदनिमिर्ती करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) अन्वये मा. महासभेची मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.२०/६/२००६

**प्रकरण क्र. ४२ :- कर्मचारी / अधिकारी वर्गाची पदोन्नती व सरळसेवा नियुक्तीचे माहितीसह मान्यता देणे**

**ठराव क्र. ३५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार नेमणूकीसाठी अर्हता व सेवाभरती नियम २००५ (सेवानियम) तयार करुन त्यास मा. महासभा दि.१२/८/२००५ ठराव क्र. २९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. आस्थापनेवरील शासन मंजूर रिक्त पदावर अनुक्रमे वर्ग – १ ची अतांत्रिक ३ पदे व तांत्रिक २ पदे तसेच अतांत्रिक वर्ग – २ ची २८ पदे सेवानियमास अनुसरुन अधिकारी / कर्मचारी वर्गामधून ग्रामपंचायत / नगरपालिका कालावधीपासून कार्यक्षमरित्या व सचोटीने, प्रामाणिकपणे काम करीत असलेल्या उपलब्ध अधिकारी / कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) नुसार गठीत केलेल्या निवड समितीमार्फत शासनमान्य मंजूर व रिक्त पदे, शासनमान्य मागासवर्गीय बिंदु नामावली (रोस्टर), सेवाजेष्ठता यादी, संबधित कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन खालील अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | पदोन्नतीचे पद | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. अजित भ. पाटील | कर निर्धारक व संकलक | १ |
| २ | श्री. श्रीकांत मुरलीधर मोरे | मुख्यलेखाधिकारी | १ |
| ३ | श्री. हरेश लक्ष्मण पाटील | नगरसचिव | १ |
| ४ | श्री. शिवाजी बारकुंड | कार्यकारी अभियंता, (जल व मलनिःस्सारण व पाणी पुरवठा विभाग) | १ |
| ५ | श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) | १ |
| ६ | श्री. केसरीनाथ दादु म्हात्रे | सहाय्यक आयुक्त | २ |
| ७ | श्री. विजय सदानंद पाटील | सहाय्यक आयुक्त | २ |
| ८ | श्री. स्वप्निल ज्ञानू सावंत | सहाय्यक आयुक्त | २ |
| ९ | श्री. संजय गोखले | सहाय्यक आयुक्त | २ |
| १० | श्री. मनोहर म्हात्रे | प्रभाग क्षेत्रिय अधिकारी | २ |
| ११ | श्री. सुधीर सावंत | उपकर निर्धारक व संकलक | २ |
| १२ | श्री. नरेंद्र र. पाटील | जनसंपर्क अधिकारी | २ |
| १३ | श्री. चिंतामण शिंदे | अधिक्षक मार्केट परवाना | २ |
| १४ | श्री. संजय तायशेटे | स्टोअर ऑफिसर | २ |
| १५ | श्री. हेमंत पाटील | उपकर अधिक्षक | २ |
| १६ | श्री. दिलीप जगदाळे | प्रभाग क्षेत्रिय अधिकारी | २ |
| १७ | श्रीम. विजया गंभीरराव | उपमुख्य लेखापरिक्षक | २ |
| १८ | श्री. शरद बेलवटे | लेखाधिकारी | २ |
| १९ | श्री. वासुदेव वि. शिरवळकर | उप नगरसचिव | २ |
| २० | श्री. बाबुराव वाघ | प्रभाग क्षेत्रिय अधिकारी | २ |
| २१ | श्री. मोरेश्वर पहुरकर | सुरक्षा अधिकारी | २ |
| २२ | श्री. माफिल्डा डिमेलो | उपमुख्य लेखापरिक्षक | २ |
| २३ | श्री. दादासाहेब खेत्रे | कामगार कल्याण अधिकारी | २ |
| २४ | श्री. जनार्दन भासे | अंतर्गत लेखापरिक्षक | २ |
| २५ | श्री. गोविंद परब | आस्थापना अधिक्षक | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्री. वसंत राणे | विशेष कार्य अधिकारी | २ |
| २७ | श्री. रामचंद्र आसोदेकर | समाज विकास अधिकारी | २ |
| २८ | श्री. सुदाम गोडसे | प्रशासकिय अधिकारी | २ |
| २९ | श्री. सुनिल यादव | चौकशी अधिकारी | २ |
| ३० | श्री. संजय लक्ष्मण दोंदे | प्रभाग क्षेत्रिय अधिकारी | २ |
| ३१ | श्री. अविनाश बुधाजी जाधव | सहाय्यक लेखापरिक्षक | २ |
| ३२ | श्री. नरेंद्र चव्हाण | प्रशासन अधिकारी | २ |
| ३३ | श्री. चंद्रकांत बोरसे | सहाय्यक लेखापरिक्षक | २ |

तसेच महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग – १ व वर्ग – २ ची सरळसेवेने भरावयाची चार एकाकी रिक्त पदे अनुक्रमे, **अन्ननिरिक्षक, उपअभियंता, विधी अधिकारी, व सहाय्यक संचालक, नगररचना** अशी पदे जाहिर वृत्तपत्रात जाहिरात देऊन उमेदवाराकडून अर्ज मागविण्यांत आले होते. त्यानुसार प्राप्त उमेदवाराची गठीत निवड समिती मार्फत उमेदवाराची पदास आवश्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव, इ. विचारात घेऊन मुलाखती घेण्यांत आलेल्या असून खालील प्रमाणे उमेदवाराची निवड करण्यात आली आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नेमणूकीचे पद | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. माणिक आबा दुबोले | अन्ननिरिक्षक | २ |
| २ | सौ. सई हेमंत वडके | विधी अधिकारी | २ |
| ३ | श्री. सुरेश दशरथ वाकोडे | उपअभियंता | १ |
| ४ | श्री. दिलीप प्रभाकरराव घेवारे | सहा. संचालक नगररचना | १ |

वरील प्रमाणे दिलेली पदोन्नती व सरळसेवेने नेमणूक केलेली कार्यवाही नियमानुसार झालेली आहे. तरी मा. आयुक्त यांनी अधिकारी/कर्मचारी यांना दिलेल्या पदोन्नतीस तसेच सरळसेवेने केलेल्या नेमणूकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) (३) नुसार मंजूरी देण्यांत येत आहे. सरळसेवेने निवड केलेल्या अन्ननिरिक्षक, उपअभियंता व सहा. संचालक, नगररचना यांनी यापूर्वी अनुक्रमे मिरा - भाईंदर महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरविकास विभागामध्ये सेवा केल्याने त्यांचे तेथील निवृत्तीवेतन, अंशराशीकरण, रजा अंशराशीकरण, भविष्य निर्वाह निधी खात्यातील इतर जमा रक्कम इ. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे वर्ग करुन घेण्यास व मागील सेवा कायम स्वरुपी स्विकृत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. परंतू त्यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेत नेमणूक केलेल्या संवर्गात सेवाजेष्ठता मिरा भाईंदर महानगरपालिकेत नेमणूक झाल्याची दिनांक धरण्यात यावी यास ही सभा मंजुरी देत आहे.

मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग – १ व वर्ग – २ संवर्गातील अधिकाऱ्यांना राजपत्रित अधिकाऱ्याचा दर्जा देण्यास व पुढील कार्यवाहीस करण्यास ही मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री ~~ह्यरल~~ बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजूर**

**पिठासीन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(६३)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०।६।०६

(ज प्रस्ताव)

प्रकरण क्र. ४३ सभा दि. २०/०६/०६

## ठराव

ठराव क्र. ३६

मिरा भाईदर महापालिकेची लोकसंख्या सुमारे ६.५० लाख आहे.अनेक उद्योजक शहरात धंदा करण्याकरीता येत आहे व महापालिका सदर उद्योजकांना परवाना फि देऊन परवानगी देते.महापालिकेच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर मास – मटन विक्रीची दुकाने आहेत व काही दुकानदार महापालिकेची परवानगी न घेता जानवरांची कत्तल करतात.सदर जानवरांचे मांस खाणे योग्य आहे की नाही त्याची ही तपासणी होणे अत्यंत गरजेचे आहे पण महापालिकेचा कत्तलखाना नसल्याने तशी खबरदारी घेतली जात नाही.त्याचप्रमाणे अनेक मास – मटन विकणारे दुकानदारांनी महापालिकेची परवानगी न घेता दुकाने उघडली आहेत त्यामुळे महापालिकेचा परवाना फि मध्ये ही नुकसान होत आहे व दुकानदार मास – मटन उघडया मध्ये ठेवतात त्यामुळे रोगराई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी मी असा ठराव मांडतो कि,महापालिका हद्दीत अनधिकृत रित्या मास – मटन विक्री करणारे उद्योजकांवर त्वरीत कारवाई व्हावी व महापालिकेचा त्वरीत कत्तलखाना उघडण्याकरीता प्रशासनाने पाऊल उचलावे.

सुचक :- अग्रवाल ओमप्रकाश गं.

अनुमोदक :-
(शिवप्रकाश प्र. भुरेका)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

(ल प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ४४ :-** **सन्मा. सदस्य श्री. केशव रामभाऊ घरत यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत.**

(सन्मा. सदस्य श्री. केशव रामभाऊ घरत हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

**प्रकरण क्र. ४५ :-** **सन्मा. सदस्या श्रीम. अनिता जयवंत पाटील यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - प्रशासकिय इमारतीस नाव देणे बाबत.**

(सन्मा. सदस्या श्रीम. अनिता जयवंत पाटील ह्या गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २०/६/२००६

**प्रकरण क्र. ४६ :-** सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - नगरभवन इमारतीस नांव देणेबाबत.

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

**प्रकरण क्र. ४७ :-** **सन्मा. सदस्य श्री. रोहिदास आत्माराम पाटील यांचे दिनांक १६/०६/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका सभागृहास नांव देणेबाबत.**

(सन्मा. सदस्य श्री. रोहिदास आत्माराम पाटील हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००६

**दुःखवटा ठराव क्र. ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांचे वडील श्री. अनंतराव भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. तसेच नगररचना विभागाचे अधिकारी श्री. सुनिल म्हात्रे ह्यांच्या वडीलांचे दुखःद निधन झालेले आहे व परिवहन विभागातील लिपिक श्री. वसंत राणे ह्यांच्या मुलाचे दुखःद निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे श्री. दादाभाई भास्कर वैती यांचे निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा दि. २०/०७/२००६

**प्रकरण क्र. ४८ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी नवीन (आठ) सदस्यांची नेमणुक करणे.**

**ठराव क्र. ३८ :-** **दिनांक :- २०/०७/२००६**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(३) अन्वये स्थायी समितीचे ०८ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत :-

१) श्री. मोहन मधुकर पाटील
२) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
३) श्री. मिलन गोविंदराव पाटील
४) श्री. केशव रामभाऊ घरत
५) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
८) श्री. गजानन लक्ष्मण भोईर

वरील निवृत्त होणारे सदस्यांच्या जागी नवीन आठ सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम २०(५) अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस सदस्यांची नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण १४ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस कोणीही सदस्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे १४ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) श्री. अशोक पांडुरंग पाटील, (२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी, (३) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण, (४) श्रीम. संगिता कैलाश पाटील, या ०४ सदस्यांनी माघार घेतल्यामुळे १० उमेदवार बाकी राहीले व स्थायी समिती सदस्य पदी ०८ (आठ) सदस्यांची निवड करणे असल्याने गुप्त मतदान घेण्यांत आले. गुप्त मतदान घेतले असता खालीलप्रमाणे प्रत्येक सदस्यास मते मिळाली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | ५६ |
| २ | गीता भरत जैन | ६४ |
| ३ | जेन्वी युस्टस आल्मेडा | ८८ |
| ४ | नयना गजानन म्हात्रे | ९६ |
| ५ | परशुराम पद्माकर म्हात्रे | ७२ |

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| ६ | माळी रविंद्र भिमदेव | ६८ |
| ७ | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | ७२ |
| ८ | रोहिदास शंकर पाटील | ७२ |
| ९ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ६० |
| १० | हंसु कमलकुमार पांडे | ६४ |

वरीलपैकी ज्या उमेदवारांना जास्त मते मिळाली आहेत त्या आठ उमेदवारांची नावे अशी आहेत :-

१) श्री./श्रीम. गिता भरत जैन

२) श्री./श्रीम. डोन्नी यूस्टस अल्मेडा

३) श्री./श्रीम. परशुराम प. म्हात्रे

४) श्री./श्रीम. माळी ~~भिमदेव~~ रविंद्र

५) श्री./श्रीम. मेंडोसा स्टिवन

६) श्री./श्रीम. रोहिदास शं. पाटील

७) श्री./श्रीम. शशिकांत भोईर

८) श्री./श्रीम. हंसु कमलकुमार पांडे

याप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदावर ०८ (आठ) सदस्य बहुमताने निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**महापौर/पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०७/२००६

प्रकरण क्र. ४९ :- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे (संरक्षण व जतन) (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्षप्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नेमणूक करणेबाबत.

ठराव क्र. ३९ :-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे (संरक्षण व जतन) (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये १२ सदस्य व ३(३) अन्वये ०३ नामनिर्देशित सदस्य खालीलप्रमाणे एकूण १५ सदस्यांची नियुक्ती ही सर्वसाधारण सभा करीत आहे.

**वृक्षप्राधिकरण समिती सदस्य**

१) श्री. आयुक्त सो. अध्यक्ष
२) श्री. महेंद्रसिंग चौहान
३) श्री. टेरी परेरा
४) श्री. आत्माराम गावंड
५) सौ. उर्मिला आमरे
६) श्री. तुलसीदास म्हात्रे
७) सौ. शुभांगी नाईक
८) श्री. शफीक खान
९) सौ. रिटा शाह
१०) सौ. सुनीता पाटील
११) श्री. सुरेंद्र तिवारी
१२) ~~[illegible]~~ सौ. जिवी वाडि

**नामनिर्देशित सदस्य**

१) भगवती शर्मा
२) बळीराम भोसले
३) श्री. जवाहरभाई सोमचंद शाह

वरील समितीवरील सदस्यांची मुदत एक वर्ष राहील व याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सुचक :- श्री. हेरल्ड बोर्जीस अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

पिठासीन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०७/२००६

दु:खवटा ठराव क्र. ३९(अ) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबईसह भाईंदरमध्ये दि. ११ जुलै रोजी रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये जी जिवितहानी झाली तसेच मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील श्री. गोरख बा. मेढेकर, श्री. नितीन मेढेकर व त्याचप्रमाणे खासदार श्री. वसंतरावजी चव्हाण यांचे निधन झाले. सर्व मृतात्म्यांना शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांच्या कुटूबियांच्या दु:खात ही महासभा सहभागी आहे.

सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/०८/२००६
## (दि. ०८/०८/०६ रोजीची तहकूब सभा)

प्रकरण क्र. ५० :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम १ अन्वये दि. १८/०५/२००६ रोजी ठराव क्र. २३ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांवर सदस्यांची ठरावाद्वारे नावे घोषित करणे.

ठराव क्र. ४० :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० पोटकलम १ अन्वये दि. १८/०५/२००६ रोजी ठराव क्र. २३ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांवर पुढीलप्रमाणे सदस्यांची नांवे घोषित करण्यांत येत आहेत.

**समितीचे नांव :- पाणी पुरवठा समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | श्री. केशव रामभाऊ घरत |
| २. | सौ. उर्मिला कोमल भामरे |
| ३. | श्री. याकूब इस्माईल कुरेशी |
| ४. | श्री. चिंतामण कमलाकर पाटील |
| ५. | सौ. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे |
| ६. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील |
| ७. | सौ. सुनिता कैलाश पाटील |
| ८. | सौ. उमा विश्वनाथ सपार |
| ९. | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी |

**समितीचे नांव :- विधी समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | श्री. आसिफ गुलाब शेख |
| २. | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील |
| ३. | श्री. मिलन गोविंद पाटील |
| ४. | सौ. अनिता जयवंत पाटील |
| ५. | श्री. अनंत रामचंद्र पाटील |
| ६. | श्री. शफीक अहमद खान |
| ७. | सौ. शानु गोहील |
| ८. | सौ. रिटा सुभाष शहा |
| ९. | श्री. अशोक बळवंत पाटील |

याप्रमाणे सदस्यांच्या नावाच्या यादीसह विशेष समित्या स्थापन करणेबाबत ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मोहन पाटील.     अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

2000

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०८/२००६

**प्रकरण क्र. ५१ :-** बंदिस्त बाल्कनीसाठीच्या दंडनिय शूल्काच्या आकारणीसाठी फेरविचार करणेबाबत.

**ठराव क्र. ४१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

(७५)

मिरा भाईदर महानगरपालिका
मा. महासभा, दि. ०८/०८/०६ ची
तहकुब सभा दि. २९/८/२००६.

प्रकरण क्रमांक ५२ :- महापालिका कराची वसुली मोठया प्रमाणावर होण्यासाठी मालमत्ता धारकांना प्रोत्साहनपर मालमत्ता कराच्या रक्कमेवर बट्टा (सूट) देणेस मंजुरी मिळणे बाबत...

ठराव क्रमांक ४२ :-

मा. आयुक्त सो., हयांची विषयासंदर्भात टिप्पणी वाचन करण्यांत आली.

मिरा भाईदर महानगरपालिकेचे मालमत्ता कर व इतर सर्व कर ही प्रमुख उत्पन्नाची साधने आहेत. मालमत्ता कर व इतर सर्व कर वेळच्या वेळी मागणीनुसार वसुल होणे महानगरपालिकेस आर्थिक दृष्टया आवश्यक आहे. महानगरपालिकेने हाती घेतलेली विकास कामे मुदतीत पुर्ण करुन घेण्याच्या दृष्टीने त्या कामी लागणारा निधी वेळच्या वेळी उपलब्ध होणे तितकेच जरुरीचे आहे. महानगरपालिकेची सर्व कराची मागणी सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात थकबाकीसह एकुण ५६.५५ कोटी इतकी अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या विकास कामासाठी लागणारा निधी वेळच्या वेळी उद्दीष्ट साध्य करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेचा कराचा भरणा नागरिकांनी वेळीच केल्यास महानगरपालिकेला लागणारा निधी वेळीच उपलब्ध होऊ शकेल.

नगरपालिकेच्या कालावधीमध्ये नगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार बिल दिल्यापासून १५ दिवसाचे आत कर भरणा-या नागरिकाला १% सूट देण्याची तरतुद होती, त्यामुळे नागरिक १% सूटीचा फायदा घेऊन कराचा भरणा मोठया प्रमाणावर करीत होते. जे मालमत्ता धारक कराचा भरणा वेळेवर करीत नाहीत, मोठया प्रमाणावर रक्कम थकीत ठेवतात अशा मालमत्ता धारकांवर विलंबाबद्दल १२% दराने व्याजाची आकारणी महानगरपालिका करीत आहे, अशा कारवाईमुळे महानगरपालिकेस व्याजाचे उत्पन्न मिळत असते. ज्याप्रमाणे कराचा भरणा विलंबाने भरणा-या थकबाकीदारांना शासन म्हणून व्याज आकारले जाते तसेच कराचा भरणा वेळेवर व विहीत मुदतीत करणा-या करदात्यांना प्रोत्साहनार्थ म्हणून कराच्या भरण्यावर सूट दिल्यास प्रामाणिकपणे कर भरणा-या नागरिकांस न्याय दिल्यासारखे होईल.

महानगरपालिकेची विकास कामे वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीने विकास कामासाठी लागणारा निधी मोठया प्रमाणावर वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रामाणिकपणे मुदतीत कर भरणा-या करदात्यांना सूट दिल्यास नागरिक मोठया प्रमाणावर कराचा भरणा भरण्यास प्रवृत्त होईल, अशा प्रकारे ठाणे महानगरपालिकेस देखील वेगवेगळया मुदतीत वेगवेगळया दराने सूट दिली जात आहे.

महानगरपालिकेचे विकास कामासाठी लागणारा निधी वेळेवर उपलब्ध होण्याचे दृष्टीने नागरिकांना कराचा भरणा वेळेवर करण्यास प्रोत्साहनार्थ महानगरपालिकेचे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे बिल मालमत्ता धारकांस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत भरणाऱ्या मालमत्ताधारकांस बिलाच्या कराच्या रक्कमेवर ३% व १ महिन्याच्या आत भरणा-या मालमत्ता धारकांस बिलाच्या कराच्या रक्कमेवर 2% इतकी सूट देणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

मालमत्ता धारकांना सूट दिल्याचा फायदा वेळीच होण्याच्या दृष्टीने बिल भरणा केल्यानंतर त्याच दिवशी मालमत्ता धारकांस अदा करण्यांत यावी.

मालमत्ता धारकांनी मोठया प्रमाणावर कराचा भरणा करण्याच्या दृष्टीने सूट देणे आवश्यक असल्याने कराच्या भरणा रक्कमेवर सूट देणे कामी अंदाजपत्रकात रु. ५० लाख अतिरिक्त अनुदानाची तरतुद करणेस **"महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१"** या कलमाखाली मंजुरी देण्यांत येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सूचक :- श्री.** **अनुमोदक:- श्री.**

एक महिना ५% बिलात
दोन महिना २% सूट देण्यात येत आहे

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा, दि. ०८/०८/२००६ ची**
**तहकुब सभा दि. २१/०८/२००६**

**प्रकरण क्र. ५३** :- **"मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७" नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दरास मंजुरी मिळणे बाबत...**

**ठराव क्र. ४३** :-

महानगरपालिका हद्दीतील इमारतींना व मालमत्तेला मालमत्ता कराच्या आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दर निश्चित करुन करयोग्य मुल्य ठरविण्याची तरतुद महानगरपालिका अधिनियमात आहे.

महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी तात्कालीन नगरपालिकेमध्ये "महानगरपालिका अधिनियम १९६५" मधील तरतुदीनुसार प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांच्या कर आकारणीसाठी भाडे मुल्याचे वाजवी दर ठरवून देण्याचे अधिकार नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग हयांना होते. त्या अधिनियमातील तरतुदीनुसार नगरपालिकेच्या मालमत्तेला कर आकारणी मा. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे हयांचे पत्र क्र.प्रा.मु./मिभानपा/कर आकारणी ९९ सननर-ठाणे/२४२८, दि. १४/१०/१९९९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार केली जात आहे. सदरहू ठरवून दिलेले दर हे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील आहेत, त्याच दरानुसार महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत भाडे मुल्य निश्चित केले जात आहे.

शहरातील इमारती/मालमत्तांची खालीलप्रमाणे वर्गवारी दर निश्चित करताना विचारात घेतली जात असते.

अ- आर.सी. सी.

ब- लोड बेअरिंग/सिमेंट शिट्स व कौलारु

क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती

ड- झोपडी, कुंडाच्या भिंती

अशी वर्गवारी असताना काही विभागामध्ये वरील वर्गवारीपैकी काही वर्गवारीच्या मालमत्तांना मा. सहा. संचालक नगररचना, ठाणे यांनी कर आकारणीचे दर निश्चित केलेले नसल्याने अडचणीचे होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वेगवेगळया प्रकारच्या मालमत्ता विचारात घेता महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांच्या कर आकारणीसाठी सोबतच्या तक्त्याप्रमाणे भाडे मुल्याचे वाजवी दर प्रस्तावित करण्यांत आलेले आहेत.

## महानगरपालिका क्षेत्रातील विविध विभागामध्ये (मालमत्ता कर आकारणीसाठी) भाडेमुल्य निश्चित करण्यासाठी ठरविलेले दर

| अ. क्र. | विभागाचे नांव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फूट भाडे | |
|---|---|---|---|---|
| | | | रहिवासी वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मिरारोड (पुर्व) | अ- आर सी. सी<br>ब- लोड बेअरिंग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | १.६० पैसे<br>१.४० पैसे<br>०.७० पैसें<br>०.४० पैस | ३.०० पैसे<br>२.५० पैसे<br>१.५० पैसे<br>— |
| २ | घोडबंदर काशिमिरा, मिरा,पेणकरपाडा,चेणे वर्सोवा सर्व महामार्गालगत | अ- आर सी. सी<br>ब- लोड बेअरिंग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | १.६० पैसे<br>१.२० पैसे<br>०.५५ पैसें<br>०.३५ पैस | ३.०० पैसे<br>२.०० पैसे<br>१.०० पैसे<br>— |
| ३. | घोडबंदर काशिमिरा, मिरा,महाजन पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व गावठाण | अ- आर सी. सी<br>ब- लोड बेअरिंग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | १.४० पैसे<br>१.२० पैसे<br>०.५५ पैसें<br>०.३५ पैस | २.८० पैसे<br>२.४० पैसे<br>१.०० पैसे<br>— |
| ४ | उत्तन | अ- आर सी. सी<br>ब- लोड बेअरिंग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- झोपडी, कुडाच्या भिंती | ०.८५ पैसे<br>०.६५ पैसे<br>०.५५ पैसे<br>०.३२ पैसे | १.५० पैसे<br>१.२० पैसे<br>०.८० पैसे<br>-- |
| ५ | राई मुर्धे, डोंगरी चौकी, मारेबा | अ- आर सी. सी<br>ब- लोड बेअरिंग सिमेंट शिट्स व कौलारु<br>क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- झोपडी, कुडाच्या भिंती | ०.८५ पैसे<br>०.६५ पैसे<br>०.५५ पैसे<br>०.३२ पैसे | १.५० पैसे<br>१.२० पैसे<br>०.८० पैसे<br>— |
| ६ | काजूपाडा, चेणे वर्सोवा, माशाचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजन वाडी, घोडबंदर, आदिवासी पाडयामधील आदीवासी कुटुंबे. | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती<br>ड- झोपडी, कुडाच्या भिंती | ०.०५ पैसे<br>०.०५ पैसे | — |
| ७ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपीग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरिता असलेले) | अ- आर सी. सी | -- | ४.०० |

**टीपः**- सदरचे दरामध्ये दर ४ वर्षानी ५% दर वाढ करण्यांत यावी.

शहरामध्ये मालमत्ता व जमिनीचे बाजार मुल्य सतत वाढत आहे. जमिनीचे/मालमत्तेचे वाढते भाव विचारात घेता करयोग्यमुल्य ठरविणेसाठी वरिलप्रमाणे नमूद केलेल्या दरास मंजुरी देण्यांत येत आहे.

**सूचकः- श्री. आसिफ शेख** **अनुमोदकः- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०८/२००६

**प्रकरण क्र. ५४ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने आर.सी.एच. फेज - २ प्रकल्प सुरू करणेस मंजुरी मिळणे बाबत.**

**ठराव क्र. ४४:-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(८०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ८/८/०६ ची तहकुब सभा दि. २९/८/०६.

प्रकरण क्र. ५५...... चेणा येथील बस दुर्घटना, बॉम्बस्फोट दुर्घटना व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना मानधन अदा केलेबाबत कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ...४५.....

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत दि.२/५/२००६ रोजी ठाणे परिवहन सेवेची बस चेणा येथील नदीत पडून फार मोठा अपघात झाला. या बसमध्ये बरेच प्रवासी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील होते. या दुर्घटनेमध्ये ३५ लोक मृत्यूमुखी पडले व ३४ लोक जखमी झाले या दुर्घटना स्थळावर महानगरपालिकेमार्फत त्वरीत अग्निशमन दल व रुग्णवाहीका सेवा पाठवून मृत्यूमुखी पडलेल्यांना बाहेर काढले व जखमींना बस मधून बाहेर काढून रुग्णालयात औषधोपचारा करीता तातडीने हलविण्यांत आले या बस दुर्घटनेतील मृत व्यक्तींना व जखमींना मानवतेच्या दृष्टीने अनुक्रमे २५ हजार व रु.१० हजार अनुदान देणेबाबत मा.महापौर महोदयांनी महासभेच्या मान्यतेने सभागृहात दि.१८/६/२००६ रोजीचे महासभेमध्ये घोषणा केली होती.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा रोड येथे दि.११ जुलै २००६ रोजी बॉम्ब स्फोट झाला होता. त्या दिवशी मिरा भाईंदर शहारातील विविध खाजगी रुग्णालयामध्ये जखमींना दाखल करण्यात आले होते. त्या रुग्णावर पैशाअभावी उपचारामध्ये कमतरता पडून रुग्ण दगावण्याची शक्यता होती. त्यामुळे त्या रुग्णांवर खाजगी डॉक्टराकडून योग्य उपचार होण्यासाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तात्काळ बॉम्ब स्फोटातील जखमीची दखल घेऊन बॉम्बस्फोटातील जखमीवर होणारा खर्च महानगरपालिकेकडून देण्यात येईल असे सांगीतले म्हणून सर्व खाजगी रुग्णायालयातील डॉक्टर्सनी शर्थीचे प्रयत्न करुन अनेक रुग्णांचे प्राण वाचविले. दि.१३/७/२००६ रोजी या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/आरोग्य/३५७/२००६-०७ नुसार लेखी कळविण्यांत आले. त्यानंतर विविध वृत्तपत्रातून अशा बातम्या प्रसिध्द होऊ लागल्या की, सदर खर्च हा शासन किंवा रेल्वे प्रशासन देणार आहे. परंतु बॉम्ब स्फोटात झालेल्या जखमी रुग्णांना वैद्यकीय उपचार तातडीने उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिकेने वरील

घोषणा केली होती. दि. १ ऑगस्ट, २००६ रोजी पश्चिम रेल्वेने वृत्तपत्रात जाहिर केलेल्या आव्हानानंतर जाहीरातीत नमुद केलेल्या दुरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधला असता पश्चिम रेल्वेच्या डॉ. इंदिरा सारनाथ यांच्या समवेत दुरध्वनीवर केलेल्या चर्चेनुसार बॉम्ब स्फोटात जखमी झालेल्या रुग्णांवरती करण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयाचा झालेला खर्च Central Government Health Scheme अन्वये देणार असल्याचे सांगितले व महापालिकेकडे असलेली खाजगी रुग्णालयाची देयके रेल्वे प्रशासनाकडे सादर करावी असे सांगितले. त्यामुळे दुबार प्रदान होऊ नये म्हणून सदरची देयके खाजगी रुग्णालयांना प्रदान करण्यांत आलेली नाहीत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय खेळांत प्राविण्य मिळाल्याबाबत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मा.महापौरांनी महासभेच्या मंजूरीने सभागृहात घोषित केल्याप्रमाणे श्री. मिल्टन डिसोजा, बॉक्सींग स्पर्धेबाबत अनुदान रक्कम रु.२,३०,०००/- व श्रीम. सिंपल कौर, वेटलिफ्टींग स्पर्धेत अनुदान रु.५०,०००/- देण्यात आलेले आहेत.

अशा प्रकारे उक्त तिन्ही बाबतीत महानगरपालिका फंडातून खालीलप्रमाणे झालेल्या खर्चास (१) बस दुर्घटना रु.१२,१५,०००/- (२) बॉम्ब स्फोट दुर्घटना रु.२,०५,९५०/- (३) खेळातील प्राविण्य अनुदान रु. २.८० लाख असे एकूण रु.१७,००,९५०/- रक्कमेचे अनुदान वाटपास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (३) नुसार या ठरावाद्वारे कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक (आरिफ कुरेशी) | अनुमोदक (मोहन पाटील)

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०८/२००६

प्रकरण क्र. ५६ :- सन्मा. सदस्य श्री. रमेश धरमचंद्र जैन यांचे दि. १६/७/०६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मौजे भाईंदर स.क्र. २६२/१ नविन मंजूर बांधकामापेक्षा जास्त बांधकाम केल्याने लेखी तक्रार करुन सुद्धा कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासन नगर विकास परिशिष्ट क्र. जी. ई. एन १०९६/४५ प्र.क्र. १५/नवि २७ अन्वये कारवाई करणे.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदर विषय योग्य त्या गोषवाऱ्यासह घेण्याचे ठरविण्यांत आले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०८/२००६

प्रकरण क्र. ५७ :- सन्मा. सदस्य श्री. रविंद्र भिमदेव माळी यांचे दि. २/८/०६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. काजुपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुवठा पाईपलाईन टाकणेकामी जागा दिलेल्या कर्मचाऱ्यांना कमहानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नेमणूक देणेबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदर विषय योग्य त्या गोषवाऱ्यासह घेण्याचे ठरविण्यांत आले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०८/२००६

**प्रकरण क्र. ५८ :-** **सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक ०३/०८/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांसाठी आपत्कालिन परिस्थिती तात्पुरत्या स्वरूपात राहण्याकरिता संक्रमण शिबिराची व्यवस्था करणेबाबत.**

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदर विषय योग्य त्या गोषवाऱ्यासह घेण्याचे ठरविण्यांत आले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/०८/२००६
## (दि. ०८/०८/२००६ रोजीची तहकुब सभा)

दुःखवटा ठराव क्र. ४६ :-

भारतरत्न मा. बिसमिल्ला खॉ यांचे निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर परिसरात ११ तारखेला जो बॉम्बस्फोट झाला. त्याच्यामध्ये ज्या व्यक्ती मरण पावल्या. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आर्किटेक्ट श्री. गिरीश प्रधानजी ह्यांच्या मातोश्री व उपसचिव श्री. वासुदेव शिरवळकर ह्यांच्या मातोश्री ह्यांचेही दुःखद निधन झालेले आहे. त्या सर्व मृतांना ही सभा त्यांना श्रध्दांजली अर्पण करत आहे.

सर्व मृतांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी.                अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

**प्रकरण क्र. ५९ :-** दि. १८/०४/२००६, दि. १८/०५/२००६ (तहकुब) व दि. १८/०५/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४७ :-**

दि. १८/०४/२००६, दि. १८/०५/२००६ (तहकूब) व दि. १८/०५/२००६ (दि.१८/०५/२००६ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२०/०९/२००६

प्रकरण क्र. ६० - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या स्वरुपात राहण्यासाठी संक्रमण शिबीराची व्यवस्था करणेबाबत.

ठराव क्र. ४८ -

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीतील रहिवासी तसेच आपात्कालीन परिस्थितीत बेघर होणा-या रहिवाश्यांकरिता तात्पुरता निवारा पाणी, विज, बाथरुम, शौचालय, इ. व्यवस्थेसह शेड, तंबू बांधणे करिता, महानगरपालिका हद्दीतील जागा मा. आयुक्त यांनी निश्चित करुन रहिवाशांना तात्पुरत्या स्वरुपात निवारा उपलब्ध करुन देणेबाबत मंजूरी देण्यात येत आहे. सदर कामी येणा-या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक - श्री. हॅरल बोर्जीस

अनुमोदक - श्री. परशूराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

पिठासन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

(८८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/९/२००६

**प्रकरण क्र. ६१ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस भाडयात स्वातंत्र्य सैनिकांना सवलत देणे बाबत. (परिवहन समिती दि. ३/७/०६ ठराव क्र. १५ अन्वये शिफारस केलेले प्रकरण.)**

**ठराव क्र. :-** ४९

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम दि. १५/०९/२००५ पासून प्रत्यक्षात बस सेवा कार्यान्वित झालेली आहे. परिवहन उपक्रमाकडे स्वातंत्र्य सैनिकांकडून बस प्रवासासाठी सवलतीच्या दराने बस भाडयामध्ये सवलत मिळणे बाबतची मागणी होत आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तसेच ठाणे महापालिका परिवहन उपक्रम यांच्याकडील उपलब्ध माहितीनुसार स्वातंत्र्य सैनिकांना मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शहरातील स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या कडील ताम्रपत्राची ओळख पटवून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस भाडयामध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्याकरीता मा. महासभा मंजुरी देत आहे.

सूचक : 4.20 P.M
महेंद्र सिंह चौहाण

अनुमोदन :
परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(८९)

## मा. महासभा दि. २०/९/२००६

**प्रकरण क्र. ६२ :- विद्यार्थी व प्रवासी पास योजनेच्या दराबाबत फेरविचार करणे व इयत्ता १२ वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेत सवलतीचे भाडे आकारणेबाबत. (परिवहन समिती दि. १४/८/०६ ठराव क्र. २३ अन्वये शिफारस केलेले प्रकरण.)**

**ठराव क्र. :-** ५०.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने शालेय विद्यार्थी व प्रवाश्यांकरीता मासिक, द्वैमासिक व त्रैमासिक पास योजना मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. ४ दि. ०४/०१/२००६ व मा. महासभा ठराव क्र. ८० दि. २०/०१/२००६ अन्वये ठराव पारित करुन प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कोकण विभाग यांच्याकडून भाडेसारणीस अंतिम मंजुरी प्राप्त केल्यानंतर दि. १८/०७/२००६ पासून सदर पास योजना सुरु करण्यात आलेली आहे. परंतु सदर योजनेस फारसा प्रतिसाद मिळत नाही. सदर योजनेअंतर्गत इयत्ता दहावी पर्यंत १८ वर्ष वयाच्या शालेय विद्यार्थ्यांनाच त्यांचा फक्त लाभ होत आहे. त्यामुळे इयत्ता १२ वी पर्यंत उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्यामुळे व मनपा हद्दीतील शाळांना साप्ताहिक सुट्टी वगळता फक्त २४ दिवस काही शाळांचे कामकाज चालत असल्यामुळे सदर पास योजनेचा फारसा फायदा होत नाही. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमाकडून मासिक पास योजनेसाठी २६ दिवसाचे दुहेरी प्रवासाचे भाडे आकारुन ३० दिवसासाठी प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन दिली जात होती. सदर मासिक पास योजनेमुळे शालेय विद्यार्थ्यांना व प्रवाशांना कोणताही आर्थिक फायदा होत नाही. अशाप्रकारच्या मोठया प्रमाणावर तक्रारी सन्मा. परिवहन सदस्य, नगरसेवक व शालेय विद्यार्थी, प्रवाशांकडून येत आहेत.

त्यानुसार सदर पास योजनेबाबतच्या दरांची फेर रचना करतांना पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना २० दिवसाच्या दुहेरी प्रवासाचे भाडे आकारुन सवलतीचा दराने मासिक पास देणे व सर्वसाधारण प्रवाशांकरीता २० दिवसाचे दुहेरी भाडे आकारुन ३० दिवसाच्या प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देणे योग्य होईल. विद्यार्थ्यांना ही सवलत फक्त शाळेच्या व महाविद्यालयाच्या वेळेत घरापासून शिक्षण संस्थेपर्यंत जाणेयेण्याकरीता उपलब्ध राहील. ~~परंतु अर्धवेळ किंवा पूर्णवेळ~~ नोकरी धंदा करणारे विद्यार्थी या सवलतीला पात्र असतील ~~ठरणार नाहीत~~. १२ वीत, पदवीधर शिकणारे विद्यार्थी नोकरी धंदा करणारे पात्र असतील

सदर योजना राबवितांना परिवहन उपक्रमाच्या उत्पन्नात काही प्रमाणात तूट येण्याची शक्यता आहे. परंतु सदर योजना सुरु केल्यास परिवहन उपक्रमास हमखास प्रवासी उपलब्ध होऊ शकतील. तसेच आगाऊ रक्कम प्राप्त होईल. त्यामुळे पर्यायाने प्रवासी परिवहन उपक्रमाच्या बस सेवेशी बांधिल राहतील. यापेक्षा पास योजनेत जास्त सवलत देणे संयुक्तीक व हितावह ठरणार नाही.

तसेच ही सभा या ठरावान्वये असा निर्णय घेते की, दहावी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तिकीट दरात देण्यात येणारी सवलत यापुढे पदवी पर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येईल. तिकीट दरामध्ये सवलत फक्त शाळेच्या व महाविद्यालयाच्या वेळेत घरापासून शिक्षण संस्थेपर्यंत जाणे-येण्याकरीता उपलब्ध राहील. पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तिकीट दराच्या सवलती करीता कोणतीही वयाची अट असणार नाही. तरी वरील प्रमाणे पास योजनेच्या दरात फेरबदल करणेबाबत मा. महासभा मंजुरी देत आहे.

सूचक : (आसिफ शेख)

अनुमोदन : परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

प्रकरण क्र. ६३ :- महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) अध्यादेश २००६ चे नियम ३ मधील तरतुदीनुसार मनपा क्षेत्रातील सोसायटींना सुका कचरा व ओला कचरा वेगवेगळा साठविण्यासाठी प्लास्टीक डब्बे देण्याबाबत. (मा. आरोग्य परिरक्षण समिती सभा दि. २४/०८/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १२)

ठराव क्र. ५१ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२०/०९/२००६

**प्रकरण क्र.** ६४ -

**विषय – बंदिस्त बाल्कनी साठीच्या दंडनिय शुल्काच्या आकारणी बाबत.**

**ठराव क्र.** ५१ -

- तात्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ७५, दि.०५/०८/९२ अन्वये बंदिस्त बाल्कनीसाठी दंडनिय शुल्क म्हणून रु.५००/- (प्रती बाल्कनी) साठी आकारणे निश्चित केलेले आहे. तेव्हापासून आद्यापपर्यंत या दंडनिय शुल्कामध्ये वाढ झालेली नसल्यामुळे व सदरची दंडाची रक्कम ही सर्वसाधारण मिरा भाईंदर शहरासाठी समान असल्यामुळे विकसनशील क्षेत्रासाठी व अत्यल्प विकसनशील क्षेत्रासाठी तसेच बाल्कनीची लांबी - रुंदी, कमी जास्ती साठीही समान एकच रक्कम रु.५००/- प्रति बाल्कनी ठरविण्यात आल्याचे दिसून आल्यामुळे व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षासाठी विकास आकाराच्या रक्कमेत वाढ अपेक्षित असल्यामुळे याबाबत सुधारणा करुन जमिनीच्या बाजारी दराप्रमाणे प्रिमियम रक्कम (प्रती चौ.मी.) आकारणे बाबत यापुर्वी मा. महासभा ठराव क्र. ९४, दि.२०/०३/०६ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार सदरचे बदल दि.०१/०४/०६ पासून अंमलात आणण्याचे ठरविले असता सर्व वास्तुविशारद तसेच विकासक बंदिस्त बाल्कनी साठीच्या दंडनिय शुल्कामध्ये एकदम झालेली वाढ ही फारच मोठ्या प्रमाणात असून अन्यायकारक असल्याच्या तक्रारी वारंवार करत असून भोगवटा दाखला घेण्याचे प्रस्ताव फारच कमी झालेले आहे. याबाबत फेरविचार होणेबाबत वारंवार विनंती करुन मा. महासभेने वाढ केलेल्या दंडनिय शुल्कासाठीच्या प्रिमियम ऐवजी मिरा भाईंदर शहर हे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दी लगत असल्यामुळे मुंबई महानगरपालिकाप्रमाणे बंदिस्त बाल्कनी साठीचे सद्याच्या प्रचलित दराप्रमाणे दंडनिय शुल्काची आकारणी करण्याबाबत विनंती केलेली आहे.

बृन्हमुंबई महानगरपालिकासाठीचे सद्याचे प्रचलित दर बृन्हमुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. सीएचई /डीपी/६, दि.३०/०४/०२ नुसार खालील प्रमाणे आहेत.

(८२) 44 R.P. (Legal)

| वर्णन | दंडनिय शुल्काची रक्कम |
|---|---|
| बंदिस्त बाल्कनीच्या ५.०० चौ.मी. क्षेत्रा पर्यंत | रु.२,०००/- |
| व त्यावरील प्रत्येक २.५० चौ.मी. क्षेत्रासाठी | रु.१,०००/- |

दि.०१/०४/०६ पासून आजपर्यंत भोगवटा दाखला घेण्याचे कमी झालेले प्रमाण व मिरा भाईंदर शहरातील विकासक, वास्तुविशारद यांच्या विनंतीचा विचार करता दि.२०/०३/०६ च्या मा. महासभेने मंजूर केलेल्या बंदिस्त बाल्कनी साठीच्या प्रिमियम ऐवजी मुंबई महानगरपालिकाप्रमाणे बंदिस्त बाल्कनी साठी सध्याच्या प्रचलित दराप्रमाणे दंडनिय शुल्काची रक्कम (वरिल प्रमाणे) ~~दि. १-४-२००६ पासून~~ आकारणे बाबत ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक - हेरल बोर्जीस    अनुमोदक - परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २०/०९/२००६

**प्रकरण क्र. ६५ - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाचा प्रस्ताव मान्यता मिळणेसाठी शासनास सादर करणे बाबत.**

**ठराव क्र. ५३ -**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह काही भाग वगळून शासनाचे नगरविकास विभाग अधिसुचना क्रं. टिपीएस १२९६/८४७/ सीआर/ १६२/९६ युडी १२ दि.१४/५/९७ अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्रं. टिपीएस-१२९८/नपा सीआर-८९/९८/ युडी-१२ दि.२५/८/२००० अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. सदर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दि.१५ जुलै १९९७ व दि.१५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे. त्यानंतर दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी मिरा भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत झालेले आहे.

अ) मौजे - भाईंदर येथील मांडली तलाव क्षेत्र (३७६९ चौ.मी.) ही जागा नगरपरिषद स्थापन झाल्यापासून नगरपरिषदेच्या ताब्यात आहे. तेथे नगरभवनाची इमारत बांधलेली आहे. तिचा वापर सुरु आहे. सदर जागा विकास योजनेमध्ये सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविण्यात आलेली आहे. सदरची जागा ही सार्वजनिक वापरासाठी असल्याने महसूल व वन विभागाच्या दि.०४/०२/८३ च्या परिपत्रकानुसार सदरची जागा विकास योजना आराखड्यात आरक्षण म्हणून दर्शविणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करुन सदरील जागेत "नगरभवन" असे नामाभिदान दर्शविण्याचे आहे.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रमाणे वर्णन केलेले रस्ते हे विद्यमान अस्तित्वातील रस्ते असून सदरचे रस्ते विकास योजनेने अंतर्भूत केलेले नसल्याने व सदरच्या रस्त्यांचा वापर सार्वजनिक स्वरुपाचा असल्याने मंजूर विकास योजनेत ९.० मी. रुंद रस्ते प्रस्तावित करणे आवश्यक आहे. त्यामुळे मा. महासभा दि.१८/०४/२००६, ठराव क्र. ११ नुसार मंजूर विकास योजनेत खालीलप्रमाणे रस्ते दर्शविण्याचे ठरविले आहे.

४) दाचकुलपाड्याकडे जाण्याकरिता लक्ष्मीबाग ते दाचकुलपाडा रस्ता.

५) माश्याच्या पाड्याकडे जाण्याकरिता काशि जनता नगर ब्रीज ते मंदीरापर्यंतचा रस्ता.

६) बाभळीचा भाट क्र. १ व २ कडे राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पासूनचा रस्ता.

<u>राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील नाले -</u>

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १९ | घोडबंदर सगनादेवी ते बसस्टॉप रस्त्यालगतचा नाला | १.५० | १.५० |
| २० | माशाचा पाडा, लक्ष्मी बाग वेस्टन हॉटेल, विठ्ठल मंदिर कडून वाहत जाणारा नाला | ११.०० | १५.०० |
| २१ | होली क्रॉस शाळा जनता नगर ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ उघाडी पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २२ | महाजन वाडी, महाविष्णू मंदिर, दिल्ली दरबार, पंजाब फॉन्ड्री घोडबंदर खाडीकडे जाणारा नाला | ४, ७, १०, १५, ३० | ४, ७, १०, १५, ३० |
| २३ | पेणकरपाडा, खोडीयार नगर स्मशानभूमी समोरील नाला | ३.०० | ४.०० |
| २४ | मिराधाम ते पंजाब फॉन्ड्रीकडे जाणारा नाला | ३.०० | ३.०० |

<u>मिरा रोड मधील नाले -</u>

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| २५ | मिरा रोड ते भाईंदर (पु.) रेल्वे समांतर नाला | ३.०० | ३.०० |
| २६ | शांतीनगर मधील नाला | २.०० | ५.०० |
| २७ | शांतीनगर सर्कल ते स्टेशनकडे जाणारा रस्त्यालगत नाला | २.०० | २.०० |
| २८ | शगुन हॉटेल ते जाफरी ब्रीज पर्यंतचा नाला | १०.०० | १०.०० |
| २९ | गोकूळ विलेज, विजय पार्क, शगुन हॉटेल पर्यंतचा नाला | २.०० | २.०० |

ड) मंजूर विकास योजनेत मौजे - उत्तन, स.क्र. ४३, १२०, १०८सी, १७८डी, ही जागा विकास योजनेप्रमाणे डोंगराळ तसेच नाविकास क्षेत्रात दर्शविली असून खाजगी मालकीची आहे. या जागेतून १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करुन विकास योजनेमध्ये फेरबदल करावयाचे ठरविले आहे. त्यानुसार मा. महासभा दि.१८/०४/२००६, ठराव क्र. ६ नुसार मान्यता दिलेली आहे.

तसेच वरील अ.क्र. (अ) ते (ड) विकास योजने मध्ये अंतर्भूत केलेले नसल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा. महासभा ठराव क्र. ४४, दि.२९/०९/२००५, ठराव क्र. ११, दि.१८/०४/२००६, ठराव क्र. ६, दि.१८/०४/२००६, ठराव क्र. ६६, दु.१८/११/२००५ नुसार मंजूरी दिलेली होती. त्याअनुषंगानेदि.०२/०७/२००६ दै. वृत्तमानस, दि.०३/०७/२००६ दै. मुंबई संध्या, दि.०२/०७/२००६ दै. हमारा महानगर, दि.१९/०६/२००६ दै. सकाळ, दि.१८/०६/२००६ दै. नवशक्ति या वृत्तपत्रात जाहीर सूचना देवून संबंधीतांच्या सूचना व हरकती मागविलेल्या होत्या. सदर सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अनुक्रमे दि.२८/०६/२००६, दि.३०/०६/२००६ रोजी प्रसिध्द झालेल्या होत्या.

त्यांना वार्षिक मालमत्ता करात १०% सवलत दिल्यास या योजनेचा चांगला प्रतिसाद मिळू शकतो. त्याअनुषंगाने विकास नियंत्रण नियमावली फेरबदलास मा. महासभा ठराव क्र. ३१, दि.२०/०६/०६ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. तसेच शासन राजपत्र भाग दोन दि.२०/०७/२००६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच दै. सागर व दै. हमारा महानगर दि.२६/०७/०६ रोजीच्या वृत्तपत्रात जाहीर सूचना देवून सूचना हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. सूचना व हरकती **"निरंक"** आहेत.

वर नमुद केलेल्या (अ), (ब), (क), (इ), (ई) बाबत एकही सूचना वा हरकत प्राप्त झालेली नाही. सबब जाहीर सूचनांच्या अनुषंगाने विकास योजनेमध्ये उक्त (अ) ते (ई) फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार शासनास सादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक -** श्रीमती रोझलीन कोलासो

**अनुमोदक -** श्री परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

8 S M. (Legal)

(९८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. २०.९.२००६

**प्रकरण क्र.** - ६६

**ठराव क्र.** - ५४

विषय - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घरांना / गाळ्यांना दुरुस्ती / उंचीसाठी व कुंपणभिंत बांधण्यास परवानगी देतांना शुल्क आकारणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान घराची, औद्योगिक गाळ्याची, दुकानाची दुरुस्ती व उंची वाढविण्यास तसेच कुंपणभिंत बांधण्यास परवानगी मिळण्यासाठी या विभागासाठी सुमारे ४०० ते ५०० अर्ज प्राप्त होत असतात. अशा अर्जामधील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यावर, (१) घराच्या व गाळ्याचा मुळ संरचनेत बदल न करणे, (२) चटईक्षेत्राचे उल्लंघन न करणे, (३) विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत न होवू देणे ईत्यादी अटींवर दुरुस्ती व उंची वाढविण्यास परवानगी देण्यात येते. सदर परवानगीचे वेळी तत्कालीन नगरपरिषद खास सभा ठराव क्र. १०६(ब), दि.३०/०३/१९९८ अन्वये घर दुरुस्तीसाठी व कुंपणभिंतीसाठी रु.५००/- व औद्योगिक गाळा दुरुस्ती व उंची साठी रु.१,०००/- शुल्क आकारण्यात येत आहे. सदरचे शुल्क अत्यंत कमी असल्यामुळे व महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी वरील प्रमाणे आकारण्यात येणा-या शुल्कात वाढ होणे आवश्यक वाटते. याबाबत मा. स्थायी समितीमध्ये चर्चा होवून मा. सदस्यांनी शुल्क वाढविणेबाबत सांगितलेले आहे. यास्तव घर दुरुस्तीसाठी प्रती मालमत्ता रु.५,०००/- (अधिकृत झोपडीसाठी रु.५००/-) तसेच औद्योगिक (गाळा) व वाणिज्यासाठी (दुकान) दुरुस्ती व उंची वाढविणेसाठी प्रती मालमत्ता रु.१०,०००/- व कुंपणभिंत रु.२,५००/- प्रती सर्व्हे क्रमांक इतके शुल्क आकारणे आवश्यक वाटते. वर्षभरात साधारणतः घर दुरुस्तीचे ३०० व गाळा उंचीचे २०० अर्ज प्राप्त होत असतात. सदरच्या आकारणीमुळे प्राप्त होणा-या अर्जास परवानगी दिल्यास चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या उत्पन्नात सुमारे रु.२५,००,०००/- इतक्या रक्कमेची वाढ होण्याची शक्यता आहे. सबब वरील प्रमाणे दुरुस्ती व उंचीसाठी देण्यात येणा-या परवानगीच्या वेळी शुल्क वाढविण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक** - (आसिफ शेख)

**अनुमोदक** - परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

**प्रकरण क्रमांक :-** ( ६७ ) :- " Suburban Railway User's Consultative Committee" वर मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत प्रतिनिधी पाठविणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

**ठराव क्रमांक :-** ( ५५ )

रेल्वे प्रशासन व रेल्वे प्रवाशी यांच्यामध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टीने रेल्वेची " Suburban Railway User's Consultative Committee" वर नव्याने नियुक्त करावयाच्या सदस्यामध्ये मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत श्री. ~~ध्रुवकिशोर मन्साराम पाटील~~ यांचे नाव पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :-** श्री हेरल बोर्जिस **अनुमोदन :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

DKV/Dk/TH

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. ३० / ८ /२००६

**ठराव क्र. - ५६**

**प्रकरण क्र. - ६८**

**विषय :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आर्थिक साहाय्याने आर. सी. एच. फेज् - २ प्रकल्प सुरू करणेस मंजुरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि. ५.०६.२००४ रोजीच्या महासभेत ठराव क्र. ११, विषय क्र. ९ मंजूर करणेत आलेला आहे. याद्वारे केंद्र शासनाच्या अनुदानातून R.C.H. फेज् - २ कार्यक्रम राबविण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करून मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाला संगोपन व शालेय आरोग्य पुणे - १ यांचे पत्र जा. क्र. रा कुकका / अर्बन आर सी एच/ कक्ष १७/३३६५९-६१/०६, दि. ८.०६.२००६ नुसार संबंधित प्रकल्पाला एप्रिल २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीसाठी मान्यता मिळालेली आहे. या प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेस शासनातर्फे टप्प्याटप्प्याने अनुदान मिळेल. तसेच प्रकल्प कालावधीनंतर म्हणजेच एप्रिल २०१० पासून हा प्रकल्प महानगरपालिकेस स्वबळावर चालवावयाचा आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या ८ लाखाचे वर असून नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेने ७ आरोग्य केंद्रे, एक उपकेंद्र व एक फिरता दवाखाना चालू केलेला आहे. R.C.H. - २ प्रकल्पांतर्गत सध्या कार्यरत असलेल्या आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण, उपकेंद्राचे आरोग्य केंद्रात रूपातंर व नवीन ५ आरोग्य केंद्रे चालू करण्याचे ही महासभा मंजुरी देत आहे.

तसेच महानगरपालिकेचे एकही प्रसुतीगृह नसल्याने व प्रसुतीसेवा पुरविण्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, भाईंदर अपुरे पडत असल्याने एक माता व बाल रूग्णालय चालू करण्यास व प्रस्तावित आरोग्य केंद्रे व माता व बालरूग्णालय यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग, तज्ज्ञ डॉक्टरांची पदे, प्रोग्राम मॅनेजमेंट युनिट व त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग इ. मिळून खालील प्रमाणे करार पध्दतीने ठोक पगारावर पदे भरणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**आरोगय केंद्रांकरिता लागणारा कर्मचारी वर्ग :-**

१. वैद्यकीय अधिकारी - ५

२. LHV/PHN - ५

३. ANM - ३१

४. Clerk - ५

५. Peon - १३

६. Link Workers - १३०

**माता व बालरूग्णालयासाठी तज्ज्ञ :-**

१. बालरोग तज्ज्ञ - १

२. स्त्री रोग तज्ज्ञ - १

३. भूल तज्ज्ञ - १

**प्रोग्राम मॉनिटरिंग युनिटसाठी लागणारा कर्मचारी वर्ग :-**

१. प्रोग्राम ऑफिसर / को-ऑर्डिनेटर / वैद्यकीय अधिकारी - १

२. अकाउन्टंट ऑफिसर - १

३. डेटा एन्ट्री ऑपरेटर - १

**(सदर पदांसाठी पात्रता शासनातर्फे कळविण्यात येणार आहे.)**

| अ. क्र. | वर्ष | शासनाकडून प्राप्त होणारा निधी (रू. मध्ये) | महापालिकेस करावा लागणारा खर्च (रू. मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | २००६-०७ | ७६,१६,५९३.०० | Nil |
| २. | २००७-०८ | ८२,२४,२४१.०० | Nil |
| ३. | २००८-०९ | ५८,४९,७३१.०० | २७,१५,०००.०० |
| ४. | २००९-१० | ३७,६९,८००.०० | ४०,७२,५००.०० |
| | एकूण | २,५४,६०,३६५.०० | ६७८७५००.०० |

या कर्मचाऱ्यांचा पगारावरील खर्च २००८ पर्यंत पूर्णपणे (१०० टक्के) शासनांकडील अनुदानात भागवण्यात येईल. २००८-२००९ मध्ये ५० टक्के खर्च अनुदानातून तर ५० टक्के खर्च महानगरपालिका निधीतून करावा लागणार आहे. २००९-१० मध्ये २५ टक्के खर्च शासन अनुदानातून तर ७५ टक्के खर्च महानगरपालिका निधीतून करावा लागणार आहे.

१०२

एप्रिल २०१० नंतर संपूर्ण खर्च महानगरपालिका निधीतून करणेस ही महापालिका मंजुरी देत आहे. तसेच इतर सर्व खर्चही उदा, औषधी खर्च, उपकरणांचा खर्च, कार्यालयीन खर्च, उपकरण देखभाल खर्च, व इतर अनुषंगिक खर्च हे महानगरपालिकेस करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

R.C.H. - २ प्रकल्प राबविण्यासाठी व प्रकल्प कालावधीमध्ये शासनाचे अनुदाना व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त खर्च महानगरपालिकेने करण्यासाठी तसेच आरोग्य केंद्राकरिता जागा भाडयाने घेण्यासाठी वा महानगरपालिकेची जागा असेल तेथे बांधकाम व इतर किरकोळ दुरूस्ती करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या आवश्यक त्या खर्चास ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

**सुचक** हेरल्ड बोर्जीस **अनुमोदक** - ॲड. रवि व्यास

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

903

# मिरा भाईदर महानगरपालिका

**महासभा दि. २०.०९.२००६**

प्रकरण क्र. ६९
**ठराव क्र. ५७**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर **बांधा, वापरा व हस्तांतरीत** करा या तत्वावर उत्तन व पाली येथील जागेवर प्रक्रिया करणेसाठी प्रकल्प उभारणीकामी मे. हेंजर बायोटेक एनर्जी यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाकरिता आवश्यक क्षेत्र | ३० एकर ३० वर्षाकरिता |
| २) | महापालिकेस मे. हेंजर बायोटेक एनर्जी यांच्याकडून प्राप्त होणारे जागाभाडे | रू. १ प्रति चौरस मिटर प्रति वर्ष |
| ३) | प्रक्रिया पूर्णत्वाअंतीचे Rejection Material | 19% |
| ४) | महापालिका वापराकरिता खत पुरवठा बाजार मुल्यापेक्षा | ३५ टक्के कमी दराने |

मे. हेंजर बायोटेक एनर्जी यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावास ही महासभा मंजूरी देत आहे.

वरील प्रकल्पामधून निघणारे Rejection Material ची विल्हेवाट लावणेसाठी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० मधील तरतुदीनुसार Land fill साईट तयार करणेकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

उत्तन येथे महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणारा घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खाजगी जागा भाडे तत्वाने घेण्यात यावी याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजूरी देत आहे.

सूचक (आसिफ शेख)

अनुमोदक
श्री. परशुराम पाटील

महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

**प्रकरण क्र. ७० :-** **सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ११/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - ना फेरीवाला क्षेत्र, नो पार्किंग झोन, एकेरी मार्ग याबाबत स्थायी समितीने शिफारस केलेल्या महासभा ठराव क्रमांक ६७ अन्वये नो पार्किंग झोन व एकेरी मार्ग निर्णय होणेबाबत.**

(मा. पिठासिन अधिकारी ह्यांच्या आदेशानुसार सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल हे सभेस गैरहजर असल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

प्रकरण क्र. ७१ :- सन्मा. सदस्य श्रीम. रिटा सुभाष शाह यांचे दिनांक १५/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बिगर मंजुर नकाशा बांधकामाबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

प्रकरण क्र. ७२ :- सन्मा. सदस्य श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भोला नगर येथील विस्थापित झालेल्या लोकांचे पुर्नवसन करणेबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

प्रकरण क्र. ७३ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

प्रकरण क्र. ७४ :- **सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मौजे मुर्धे मोर्वा येथिल इलेक्ट्रॉनिक पार्क झोन बाबत महापालिकेचे धोरण स्पष्ट करणेबाबत.**

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००६

**दुःखवटा ठराव क्र. ५८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. रतनलाल जोशी ह्यांचे निधन झाले. तसेच स्वातंत्र्य सेनानी श्री. भाऊ पंडीत ह्यांचेही दि. २०/०९/२००६ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. रोहित सुवर्णा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/१०/२००६

**प्रकरण क्र. ७५ :-** **दि. २०/०६/२००६ व दि. २०/०७/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ५९ :-**

दि. २०/०६/२००६ रोजीचे इतिवृत्तांत तहकूब ठेवण्यात येत असून दि. २०/०७/२००६ रोजीचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१२/१०/२००६

(११७)

प्रकरण क्रमांक ( ७६ ) रस्त्याना नावे देण्याबावत (मा.स्थायी समिती सभा दि.२७/०७/२००६ रोजीचे प्रकरण क्र.६० व दि.३१/०८/२००६ रोजीचे प्रकरण क्रमांक ९४)

ठराव क्रमांक :- ( ६० )

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील खालील रस्ते/चौक यांच्या नामकरण प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' मधील प्रकरण ११(२) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | नामकरण |
|---|---|---|
| १ | प्लीझंट पार्क रस्ता | महात्मा ज्योतिबा फुले मार्ग |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर प्लीझंट पार्क चौक | सावित्रीबाई फुले चौक |
| ३ | लोढा पार्क (रेल्वे बॉम्बस्फोट झालेला चौक) | हास्यकवी डॉ.श्यामसुंदर शर्मा चौक |
| ४ | प्लीझंट पार्क ते जांगीड (हेतलपार्क) | स्व.वसंतराव चव्हाण मार्ग |
| ५ | सृष्टी पोलिस चौकी समोरील चौक | स्वामी आत्मनंदजी महाराज चौक |
| ६ | एस.के.स्टोन ते एम.आयजी कॉम्प्लेक्स रस्ता | महात्मा गांधी मार्ग |
| ७ | भाईदर(पू.) उड्डाणपूल लगत सर्व्हीस रोड | स्व.राजेश पायलट मार्ग |
| ८ | सुभाषचंद्र बोस मैदान समोरील चौक (उत्तन रोड) | वाल्मिकी चौक |
| ९ | आझादनगर गल्ली नं.२ | अमर शहीद भगतसिंग मार्ग |
| १० | आझादनगर गल्ली नं.३ | अमर मौलाना अब्दुल कलाम आझाद मार्ग |
| ११ | रामदेव पार्क रस्ता | श्री.आई माता मार्ग |
| १२ | महाराणा प्रताप येथील यशोदिप बिल्डींग कॉर्नर | जलाराम बाप्पा चौक |
| १३ | प्रकाश मार्केट नारायण नगर क्रॉस रोड | मारूती मंदिर मार्ग |
| १४ | न्यु गोल्डन नेस्ट क्रॉस रोड | जैन मदिर मार्ग |
| १५ | मिरारोड शांतीनगर मधील चौक | रामपियारी चौक |
| १६ | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. ११ समोर मधील चौक | जुलेलाल चौक |
| १७ | शांतीनगर व शितलनगर मधील रस्ता (गणेश मंदिराजवळ) | **भारतरत्न सरदार पटेल मार्ग** |
| १८ | कनकिया पोलिस चौकी समोरील रोड (स्कुल) | स्वातंत्र्यसैनिक जे.एन.राव मार्ग |
| १९ | शांतीनगर सेक्टर नं.३ मधील रस्ता | वुध्दीसागर मार्ग |
| २० | शांतीनगर अय्यपा मंदिर समोरील चौक | जाफरी सायगी चौक |
| २१ | शांतीनगर सेक्टर क्र.७ मधील मार्ग | जय अंबे मार्ग |
| २२ | शांतीनगर सेक्टर क्र.८ मधील मार्ग | साईबाबा मार्ग |
| २३ | शांतीनगर सेक्टर क्र.९ मधील मार्ग | भोलेनाथ मार्ग |
| २४ | शांतीनगर सेक्टर क्र.५ मधील मार्ग | विल्लावर **असोशिएशन** मार्ग |
| २५ | शांतीनगर सेक्टर क्र.५ समोरील रस्ता (भारत गॅस समोर) | स्वातंत्र्य सैनिक भिखालाल एच मोदी मार्ग |
| २६ | शांतीनगर रस्ता मासळी मार्केट समोरील चौक | सरयु माता चौक |
| २७ | नर्मदा कुंज ते नाकोडा बिल्डिंग पर्यंत गार्डन | नर्मदा-महादेव गार्डन |
| २८ | मिरारोड गोकूळ व्हिलेज चौक | लिटल फ्लॉवर चौक |
| २९ | देवचंदनगर,आकाशगंगा, अशोक सम्राट, पार्श्वनगर ५ मधील चौक | पंजाबी केसरी आचार्य श्री. विजय वल्लभ सुरी स्वरजी महाराजा साहेब चौक |

वरील नामकरणाचे फलक बसविणे कामी येणा-या खर्चास सुध्दा मान्यता देण्यात येत आहे. सदर ठरावाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सुचक:- श्री.हेरल बोर्जिस    अनुमोदक:- श्री.परशूराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

मिरा-भाईदर महानगरपालिका

SSS/DK/M/4

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१२/१०/२००६

**प्रकरण क्र. ७७ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीकरीता सानुग्रह अनुदान देणेबाबत**

**ठराव क्र.** ६१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी कामगार संघटनांनी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस व सानुग्रह अनुदान देणेबाबत विनंती केलेली आहे. परंतू मागील पाच वर्षापासून शासनाने कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचे बंद केलेले असून महानगरपालिका कर्मचारी बोनस ॲक्टनुसार बोनस मिळण्यास पात्र नाहीत. त्यामुळे महानगरपालिका कर्मचाऱ्याना बोनस शासनाचे निर्णयाशिवाय देता येत नाही. मात्र यासंदर्भात नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६७/नवि-२४, दि.२७/११/२००२ च्या अनुषंगाने दि.३१/१०/२००२ रोजी श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व इतर यांच्या मागण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीतील कार्यवृत्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका स्तरावर आर्थिक परिस्थितीनुसार सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबत निर्णय घेण्यात यावा. मात्र राज्यशासन महानगरपालिका कर्मचाऱ्यांना वेतनासाठी कोणत्याही प्रकारचे अनुदान देत नसल्यामुळे सानुग्रह अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

सन २००५ चे वर्षासाठी महानगरपालिकेच्या महासभेत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना फक्त सानुग्रह अनुदान देण्याबाबत ठराव पारित करण्यात येऊन वर्ग - १ ते वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांना रु.४५००/- प्रदान करण्यास तसेच रोजंदारी कर्मचारी व सुवर्णजयंती रोजगार योजनेचे कर्मचारी यांना प्रत्येकी रु.२५००/-, बालवाडी शिक्षिका यांना रु.१०००/- तसेच महानगरपालिका शिक्षकांना रु.२७००/- सानुग्रह अनुदान मंजूर करण्यास मंजूरी दिली होती. दिवाळी निमित्त यावर्षी सन २००६ मध्ये कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेबाबत कामगार संघटनांनी मागणी केलेली आहे.

सन २००६-०७ या वर्षाच्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष **" फ "** संकिर्ण मध्ये एकूण रु. ७० लाख इतकी सानुग्रह अनुदानासाठी तरतुद केलेली आहे. सदर तरतुदीपैकी वर्ग - १ वर्ग - २, वर्ग – ३ व वर्ग - ४ यांना रु...४६००/-, व रोजंदारी व सुवर्णजयंती रोजगार योजनेच्या कर्मचाऱ्यांना तसेच ठोक वेतन व मानधनावरील कर्मचाऱ्यांना रु..२६००/-. महानगरपालिका शिक्षकांना रु..3000/-... व बालवाडी शिक्षिकांना रु..१३००/-. दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेस मा. महासभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस**

**अनुमोदन :- ~~श्री. परशुराम पाटील~~** ॲड. एस. ए. खान

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## महासभा दि. १२/१०/२००६

**प्रकरण क्र. ७८ :-** काजूपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणे कामी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नेमणूक देणेबाबत .

**ठराव क्र. ६२:-**

तत्कालीन नगरपालिकेत महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने ५० दशलक्ष लिटर क्षमतेची १३५० मी. मी. व्यासाची नविन पाणिपुरवठा पाईप लाईन काजुपाडा ते घोडबंदर या महानगरपालिकेच्या क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत टाकण्यात आलेल्या पाईप लाईन करिता काजुपाडा येथे त्या परिसरातील शेतकऱ्यांनी जमिन उपलब्ध करून दिलेली होती. सदर शेतकऱ्याच्या मुलांना मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२ (क) अन्वये रोजंदारीवर घेण्यात आले होते. प्रत्यक्षात सहा कर्मचारी कार्यरत होते. त्यांची नावे खालील प्रमाणे.

१) श्री प्रदिप बिस्तुर भरले.
२) श्री महादेव मंगळ तारवी.
३) श्री पुंडलिक वासुदेव चौधरी.
४) श्री महादेव कृष्णा तारवी.
५) श्री उमेश शनिवार तारवी.
६) श्री शशिकांत बाबु तारवी.

वरिल कर्मचाऱ्यांना दि. ०१/०२/२००४ पासून कामावरून कमी करण्यात आले होते. तद्नंतर मा. महासभा दि. १९/०६/२००३ ठराव क्र. १६ अन्वये ठराव पारित करून सदर कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात आली होती.

शासनाकडे सदर प्रस्ताव पाठविला असता शासनाने क्रमांक मिभापा-२००४/४६९/प्र.क्र.१४०/०४/नवि-२८ दि. २६/०६/२००६ च्या पत्रान्वये '' मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार वर्ग - ३ व वर्ग - ४ मधील पदावर नियुक्ती करीता महापालिका सक्षम आहे. त्यामुळे रोजंदारी कर्मचाऱ्याबाबत महानगरपालिकेने योग्य तो निर्णय घ्यावा. तसे करताना पदांची उपलब्धता, प्रचलित शासन आदेश, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी इ. विचारात घेउन उचित कार्यवाही करावी'' असे नमुद केले आहे. शासनाने महानगरपालिकेने प्रस्तावास कुठेही विरोध केलेला नाही. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगार या संवर्गातील पदे रीक्त असून सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक पात्रता व इतर निकश वयोमानात वर नमुद सहा कर्मचारी बसत असल्याने व नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार महासभा सक्षम असल्याने त्यांना '' सफाई कामगार'' या पदावर रू. २५५०-३२०० या वेतनश्रेणीत कायम स्वरूपी नेमणुक देण्यास एक खास व अपवादात्मक बाब म्हणुन ही महासभा मंजुरी देत आहे.

### ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. पाटील परशुराम दामोदर
५) श्रीम. संगिता विजय म्हात्रे
६) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
७) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
९) श्रीम. गोहिल शानु
१०) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्री. पाटील जयंत महादेव

# मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी वर्गास सानुग्रह अनुदान

## वर्ष-२००५-०६

| अ.क्र. | कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल | गेल्यावर्षी वाटप केलेले अनुदान | | | अंदाजपत्रकातील तरतुद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्मचारी संख्या | अनुदान रक्कम | एकूण | | |
| १ | अधिकारी / कामगार लिपिक | १२५५ | ४५०० | ५६,४७,५०० | ७०,००,००० लाख | ६३.७१ लाख |
| २ | डेप्युटेशन अधिकारी | १२ | ४५०० | ५४,००० | | |
| ३ | इतर कर्मचारी | | | | | |
| | बालवाडी शिक्षिका | २७ | १००० | २७,००० | | |
| | सुवर्ण जयंती | २ | २५०० | ५,००० | | |
| | आरोग्य वैद्यकिय कर्मचारी | ३४ | २५०० | ८५,००० | | |
| | ठोक वेतन (वाहनचालक व इतर) | ५ | २५०० | १२,५०० | | |
| ४ | महानगरपालिका शिक्षक | २०० | २७०० | ५,४०,००० | | |
| | एकूण कर्मचारी | १५३५ | -- | ६३,७१,००० | | |

## वर्ष-२००६-०७

| अ.क्र. | कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल | गेल्यावर्षीप्रमाणे वाटप केल्यास अनुदान | | | अंदाजपत्रकातील तरतुद | अपेक्षित वाढ (रु. ३०० प्रमाणे) | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्मचारी संख्या | अनुदान | एकूण | | | |
| १ | अधिकारी/कर्मचारी/लिपिक | १३०७ | ४५०० | ५८,८१,५०० | ७०,००,०० लाख | ४५०० + ३०० = ४८०० | ६२,७३,६००/- |
| २ | शाळेच्या शिक्षिका | १९५ | २७०० | ५,२६,५०० | | २७०० + ३०० = ३००० | ५,८५,०००/- |
| ३ | बालवाडी शिक्षिका | २७ | १००० | २७,००० | | १००० + ३०० = १३०० | ३५,१००/- |
| ४ | सुजयो ठोक वेतन | २ | २५०० | ५,००० | | २५०० + ३०० = २८०० | ५,६००/- |
| ५ | महानगरपालिका ठोक वेतन | ७ | २५०० | १७,५०० | | २५०० + ३०० = २८०० | १९,६००/- |
| ६ | प्रतिनियुक्ती | १० | ४५०० | ४५,००० | | ४५०० + ३०० = ४८०० | ४८,०००/- |
| | **एकूण खर्च** | १५४८ | -- | ६५,०२,५००/- | | -- | ६९,६६,९००/- |

१३) श्री. रविंद्र भीमदेव माळी
१४) श्री. घरत केशव रामभाऊ
१५) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
ऊर्फ
शिंदे पुजा प्रताप
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२१) श्री. खान शफीक अहमद
२२) श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२३) श्री. कोलासो लिओ इजिदोर
२४) श्रीम. शाह रिटा सुभाष
२५) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
२६) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे

## ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
३) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
४) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
५) श्री. रोहिदास शंकर पाटील
६) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
७) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
८) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
९) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१०) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
११) श्री. पाटील शरद केशव

## ठरावाला तटस्थ असलेले सदस्य

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
४) श्री. पाटील रतन कृष्णा
५) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
६) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
७) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/१०/२००६

**प्रकरण क्र. ७९ :-**

**सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०५/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मालमत्ता नावात फेरबदल बाबत.**

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

११७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/१०/२००६

**प्रकरण क्र. ८० :-**

**सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०५/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत.**

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १२/१०/२००६

**प्रकरण क्र. ८१ :-** सन्मा. सदस्य श्रीम. रिटा सुभाष शाह यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बिगर मंजुर नकाशा बांधकामाबाबत.

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/१०/२००६

प्रकरण क्र. ८२ :-

सन्मा. सदस्या श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, भोला नगर येथील लोक विस्थापित झाले. योजनेत रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्यांना प्राधान्य देऊन घरे उपलब्ध करून देण्यात यावीत असे स्पष्ट निर्देश शासनाने मनपाकडे दिले आहेत. आरक्षण क्र. २२२ व २२२ अ (बेघरांसाठी घर) या जागेच्या मालकाने / विकासकाने १०१ सदनिका मनपाकडे दि. १६/०८/२००६ रोजी विनामुल्य हस्तांतरीत करणार आहेत असे लेखी पत्र दिले आहे. तरी मनपा ने १०१ सदनिका ताब्यात घेऊन विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ९ टेबल ३-१ ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्तापीत होणाऱ्या झोपडीधारकांना सदरील घरे देऊन पुर्नवसन करणे व घरे वाटप करण्याबाबत मनपाने धोरण निश्चीत करून योग्य निर्णय घेणेबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/१०/२००६

**प्रकरण क्र. ८३ :-**

**सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ गजानन पाटील यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत.**

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/११/२००६

**प्रकरण क्र. ८४ :-**

**दि. २०/०६/२००६ (दि. १२/१०/२००६ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण), दि. ०८/०८/२००६ व दि. २१/०८/२००६ (दि. ०८/०८/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ६३ :-**

दि. २०/०६/२००६ (दि. १२/१०/२००६ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण), दि. ०८/०८/२००६ व दि. २१/०८/२००६ (दि. ०८/०८/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/११/२००६

प्रकरण क्र. ८५ :-

अंदाजपत्रक सन २००६-०७ इ. अंशदान अ शाळा, कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे या लेखाशिर्षामधील जादा तरतुद आवश्यक लेखाशिर्षाकरिता उपलब्ध करणे. (मा. शिक्षण मंडळ सभा दि. १२/०९/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २६)

ठराव क्र. ६४ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/११/२००६

**प्रकरण क्रं. :-** ( ८६ ) जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखडयात (C.D.P.) समाविष्ट विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. :-** ( ६७ )

मिरा-भाईदर महानगरपालिका मा. महासभा दि. २०/०१/२००६ ठराव क्र. ८५ अन्वये जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत मिरा-भाईदर महानगरपालिकेचा समावेश करण्यास व शहर विकास आराखडा तयार करुन घेण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर कामी महानगरपालिकेने तांत्रिक सल्लागार म्हणुन मे. टंडन ॲन्ड असोशिएट्स यांची नेमणुक केली होती. त्यांच्यामार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शहर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर शहर विकास आराखडयाची अंमलबजावणी २०३१ सालापर्यंत करावयाची आहे. सदर शहर विकास आराखडयाचे सादरीकरण मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील राज्य शासनाच्या सुकाणू समिती समोर मा. आयुक्त यांनी केलेले असुन त्यास सुकाणु समितीने तत्वता मान्य केले आहे. सदर शहर विकास आराखडयात नमुद प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडुन ३५%, राज्य शासनाकडुन १५% व उर्वरीत ५०% खर्च महानगरपालिकेस करावयाचा आहे. सदर शहर विकास आराखडयात खालील प्रकल्पांचा समावेश करण्यात आलेला असुन त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन राज्यशासनाकडे मान्यतेकरीता पाठवावयाचे आहेत. भुमिगत गटार योजने कामी तयार करण्यात आलेला DPR राज्य शासनाच्या सुकाणु समितीने मंजुर करुन अंतिम मंजुरी करीता केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आलेला आहे. सदर शहर विकास आराखडयात समावेश करण्यात आलेल्या प्रकल्पांचा तपशिल परीशिष्ठ "अ" मध्ये जोडला आहे.

## परिशिष्ट - "अ"

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दहिसर चेक नाका ते काशिमिरा जंक्शन पर्यत सर्व्हिस रोड व गटार बांधणे. | रू. १७.०० |
| २ | विकास आराखडयातील रस्ते | रू. १००.०० |
| ३ | मिरारोड स्थानकावर (पूर्व) / (प) रस्ता जोडणारा उड्डाणपुल बांधणे. | रू. २४.५२ |
| ४ | सिमेंट कॉक्रीट रोड | रू. ३०.०० |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन रस्त्याचे रूंदीकरण करून रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ५५.७३ |
| ६ | रिंग रूट प्रकल्प | रू. ६९.०३ |
| ७ | जेसल पार्क येथे भुयारी मार्ग करणे व मिरारोड भाईंदर दरम्यान रेल्वे ट्रॅक खाली चार क्लर्वट बांधणे. | रू. १३.०० |
| ८ | पोशीर धरणासाठी महानगरपालिकेने भरावयाची रक्कम | रू. २७२.०० |
| ९ | बारवी / सुर्या / मोरबे उद्भवातुन पाणी पुरवठा योजना. | रू. १००.०० |
| १० | चेना नदी जवळ बंधारा बांधून उद्भव तयार करणे. | रू. ४०.०० |
| ११ | डिझास्टर मॅनेजमेंट अंतर्गत विविध कामे करणे | रू. ३३.०० |
| १२ | जलशुध्दीकरण व उद्भवापासून शहरापर्यत उध्ववाहीणी टाकणे. | रू. ६०.०० |
| १३ | शहरातील वितरण व्यवस्थेचे मजबुती करण | रू. ८०.०० |
| १४ | भुयारी गटार योजना | रू. ३४३.०० |
| १५ | एकात्मिक नाले प्रकल्प | रू. २२२.२६ |
| १६ | घनकचरा प्रकल्प | रू. ७४.०० |
| १७ | काशिमिरा जंक्शन येथे उड्डाणपुल बांधणे. | रू. १७.०० |
| १८ | बहूमजली वाहनतळ उभारणे. | रू. १.०० |
| १९ | बसस्थानके बांधणे. | रू. १.०० |
| २० | वाहतुक नियोजन व सुधारणा (स्टीट्र फर्निचर इत्यादी) | रू. ६.०० |
| २१ | B.S.U.P. योजना अंतर्गत घरकुल बांधणे. | रू. ११.१० |
| २२ | कत्तलखाना बांधणे. | रू. ८.५२ |
| २३ | फिशींग इंडस्ट्रीसाठी पायाभुत सुविधा | रू. ५०.०० |
| २४ | टाउुन पार्क | रू. ७.०० |
| २५ | म्युनिसिपल हॉस्पीटल | रू. ६.०० |
| २६ | विश्रामगृह बांधणे. | रू. ०.२५ |
| २७ | स्टेडियम बांधणे व गार्डन | रू. १९३.६० |
| २८ | टाउुन हॉल व नाटयमंदिर बांधणे. | रू. ५.०० |
| २९ | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात मार्केट बांधणे | रू. २.०० |
| ३० | मैदाने विकसीत करणे. | रू. १५.०० |
| ३१ | क्रिडा संकुल | रू. ५.०० |
| ३२ | कम्युनिटी हॉल | रू. २.०० |
| ३३ | जकात नाका व इमारत | रू. २८.०६ |
| ३४ | वेलफेअर सेंटर | रू. ०.५० |
| ३५ | पुस्तकालय (वाचनालय) | रू. ०.५० |

| | | |
|---|---|---|
| ३६ | अग्निशमन केंद्र उभारणे व यंत्र खरेदी | रू. ६.८० |
| ३७ | प्रभाग कार्यालय व हॉस्पीटल बांधणे. | रू. २.२८ |
| ३८ | अर्बन गव्हरनर्सच्या निर्देशक नुसार प्रशासकीय कामकाज पध्दतीसाठी | रू. २५.०० |
| | **एकूण** | रू. १९२५.१७ |

वरील पैकी अ. क्र. ६,१४,२४,३७ या कामांना यापूर्वीच अनुक्रमे मा. महासभा दि. ५/०६/२००४ ठराव क्र. ०७ मा. महासभा दि. १८/१२/२००४ ठराव क्र. ५९ मा. महासभा दि. १८/०५/२००६ ठराव क्र. २१ मा. महासभा दि. १८/०५/२००५ ठराव क्र. २० मान्यता दिलेली आहे. प्रस्तावात नमूद सर्व कामे हि सन २०३१ पर्यत टप्प्याटप्प्याने हाती घ्यावयाची आहेत. अ.क्र. ६, १४, २४,३७ हि कामे वगळून इतर कामांच्या खर्चास व प्रशासनाने तयार केलेल्या शहर विकास आराखडयास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रशासनाच्या आवश्यकतेनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी तांत्रिक सल्लागार नेमण्यास व त्याकरीता येणा-या खर्चास सुध्दा मंजुरी देण्यात येत आहे तथापी मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने मुंबई मधील कामानिमित्त येणारे सर्व मिरा-भाईदर परिसरात वास्तव्यास आल्याने या शहराची लोकसंख्या हि सन १९९१ ते २००१ या कालावधीत सुमारे ३०० % टक्क्यानी वाढलेली आहे. सदर शहरात झालेली लोकसंख्या वाढ व पुरविण्यात यावयाच्या नागरी सुविधांचा विचार करता या शहराकरीता तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखडयात नमुद कामाकरीता जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्यूअल मिशन अंतर्गत प्रकल्पा खर्चापैकी केंद्र शासन व राज्य शासन कडून अनुक्रमे ३५ % व १५ % अनुदान मिळणार आहे व ५० % खर्चाची रक्कम महापालिकेने उभी करावयची आहे. या ऐवजी ८० % निधी केंद्र व राज्यसरकार कडून उपलब्ध करून देण्याकरिता एक खास बाब म्हणून राज्य सरकार मार्फत केंद्र सरकार कडे शिफारस करण्यास हि सभा मंजूरी देत आहे. केंद्र शासनाच्या JNNURM अंतर्गत आवश्यक असलेल्या Reforms ची यादी परिशिष्ट "ब" मध्ये जोडली आहे. सदर Reforms अंमलात आणण्यास व केंद्र शासन सोबत आवश्यक करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर योजनेत समाविष्ठ करण्यात येणाऱ्या कामांकरीता शासनाच्या इतर योजनेतून किंवा कर्जातून महानगरपालिका निधी उपलब्ध होत असल्यास सदर कामे त्यामधून हाती घेण्यात यावीत.

सदरची बाब तातडीची असल्याने ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त मंजूर होण्या आधीच करणेत यावी.

**सुचक** :- श्री. हॅरल बोर्जिस **अनुमोदन** :- श्री. महेंद्रसिंग चौहान

ठराव सर्वानुमते मंजूर

पिठासन अधिकारी
मिरा-भाईदर महानगरपालिका

# परिशिष्ठ "ब"

Reforms Asssessment :- Mandatory Reforms

1. Double Entry accounting System
2. Adoption of public disclosure law
3. Passage of community participation law
4. All special agencies under one umbrella
5. formation of citizens technical advisory group
6. Planning functions to ULBS
7. Introduction of e- governances
8. Reform of Property tax to improve the resources base of ULBS
9. Levy of Resonable user charges

Reforms Assessment :- Optional Reforms

1. Revision of bye laws to streamline the approval process
2. Reservation of land for Housing for urban poor
3. Revision of bye law to make rain water harvesting mandatory
4. Bye – Laws to reuse of reclaimed water

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. १७-११-२००६

**प्रकरण क्र. ८७ :- महानगरपालिकेची १० वर्षे पुर्ण झालेली व निरूपयोगी वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे विक्री करणे बाबत.**

**ठराव क्र.** ६५

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे एकुण ७४ वाहने असुन एकुण वाहनापैकी २५ वाहनांना १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असुन सदर वाहने जुनी व नादुरूस्त झाली आहेत. सदरची वाहने निर्लेखित करणेबाबत शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-१०९१/प्र.क्र. १२/विनियम, दि. १ ऑक्टोबर १९९१ नुसार अटीबाबत मार्गदर्शन केलेले आहे. एकूण २५ वाहनापैकी १५ वाहाने कायम स्वरुपी बंद असुन ९ वाहाने हे चालु स्थितीत आहेत. चालु स्थितीतील वाहानांचा दुरुस्ती व इंधन खर्च हा इतर वाहानांच्या दुरुस्ती व इंधन खर्चापेक्षा जास्त होत असुन सदर स्थितीत ही वाहने वापरणे योग्य नाही कारण ही वाहने वारंवार दुरुस्ती करुन ती परत नादुरूस्त होतात. त्यामुळे सदरची वाहने मनपाच्या आर्थिक दृष्टया किफायतशिर नसल्याने ते निर्लेखित करणे योग्य होईल.

१० वर्षे पुर्ण झालेली व निरूपयोगी झालेली वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे विक्री करणेबाबत एकुण २५ वाहनांची तपासणी करून त्यांची स्थिती व किंमत ठरवुन देणेबाबत जा.क्र. मनपा/वाहन/~~३४७~~ ९४९/२००५-०६ दि. ~~०८/११/२००५~~ २४/८/२००५ अन्वये मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांना विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी वाहनांची तपासणी करून बाजारभावाप्रमाणे प्रत्येक वाहानाची किंमत व यांत्रिक स्थिती याबाबत दि. ३१/१२/२००५ रोजी अहवाल सादर केलेले आहते. मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांचे व्हॅल्युएशन नुसार तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ (क.) प्रमाणे कार्यवाही करुन खालीलप्रमाणे वाहने निर्लेखित करावी व उड्डाणपुलाखाली पडून असलेले भंगार याची लिलावाद्वारे विक्री करण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडतो ~~करून त्यांची लिलावाद्वारे विक्री करणेस ही सभा मंजुरी देत आहे.~~

**निर्लेखित करावयाचा वाहनांचा तपशिल**

| वाहनाचा प्रकार | वाहनाची खरेदी दिनांक | वाहनाची क्र. | वाहनांस झालेला कालावधी | दि.३१-१२-२००५ रोजी आर.टी.ओ. अहवालानुसार वाहनाची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| कॉन्टेसा | १५/०९/१९९४ | MH-04-AN-4401 | १२ वर्षे | २०,०००/- | नादुरुस्त बंद |
| जीप | ०१/१२/१९९२ | MH-04-A-7858 | १४ वर्षे ८ महिने | ३०,०००/- | चालु स्थितीत |
| जीप | ०९/०३/१९९२ | MH-04-Q-28 | १४ वर्षे ६ महिने | २०,०००/- | नादुरुस्त बंद |
| जीप | ०९/०३/१९९३ | MH-04-Q-29 | १३ वर्षे ६ महिने | १५,०००/- | चालु स्थितीत |
| जीप | ०१/१२/१९९४ | MH-04-Q-2103 | १२ वर्षे ८ महिने | १५,०००/- | चालु स्थितीत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जीप | ०१/१२/१९९४ | MH-04-Q-2107 | १२ वर्षे ८ महिने | २८,०००/- | चालु स्थितीत |
| जीप | २९/१२/१९८८ | MGR-9600 | १७ वर्षे ९ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| मारुती जिप्सी | ०३/०५/१९९० | MH-04-A-2455 | १६ वर्षे ४ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| रूग्णवाहिका | १२/०४/१९९४ | MH-04-H-124 | १२ वर्षे ५ महिने | ३०,०००/- | चालु स्थितीत |
| शववाहिका | २५/०९/१९९५ | MH-04-H-8301 | ११ वर्षे | १,५०,०००/- | चालु स्थितीत |
| फिरता दवाखाना | ३१/०३/१९९३ | MH-04-H-108 | १३ वर्षे ६ महिने | १,७५,०००/- | चालु स्थितीत |
| फायर फायटर | २७/०४/१९८७ | MCY-598 | १९ वर्षे ५ महिने | १,५०,०००/- | नादुरुस्त बंद |
| धुर/दवा फवारणी व्हॅन | २७/०७/१९८७ | MH-04-S-5746 | १९ वर्षे २ महिने | ५०,०००/- | नादुरुस्त बंद |
| पाणी टँकर | ३१/०३/१९९३ | MH-04-P-2392 | १३ वर्षे ६ महिने | ६०,०००/- | नादुरुस्त बंद |
| पाणी टँकर | ३१/०३/१९९३ | MH-04-P-2394 | १३ वर्षे ६ महिने | १,५०,०००/- | चालु स्थितीत |
| पाणी टँकर | १४/०२/१९९५ | MH-04-P-2396 | ११ वर्षे ७ महिने | १,५०,०००/- | चालु स्थितीत |
| डोझर | ०१/०३/१९९३ | MH-04-B-388 | १३ वर्षे ६ महिने | २०,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | ०१/०३/१९९३ | MH-04-B-248 | १३ वर्षे ६ महिने | १५,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | ०१/०३/१९९३ | MH-04-B-249 | १३ वर्षे ६ महिने | १५,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | १२/०९/१९९२ | MH-04-B-250 | १४ वर्षे | २२,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | १२/०९/१९९२ | MH-04-B-225 | १४ वर्षे | २२,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | २०/०२/१९८७ | MH-04-B-226 | १९ वर्षे ७ महिने | १५,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | २०/०२/१९८७ | MGR-3974 | १९ वर्षे ७ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| ट्रॅक्टर | ०९/०२/१९८८ | MGR-7488 | १८ वर्षे ७ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| रूग्णवाहिका (मॅटॅडोर) | २४/१२/१९८२ | MCY-5431 | २४ वर्षे ७ महिने | १०,०००/- | नादुरुस्त बंद |

सुचक :-

अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला.

मा. महापौर.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/११/२००६

**प्रकरण क्र. ८८ :-** सन्मा. सभापती, प्रभाग समिती क्र. १ श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक १०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी वर्गाच्या सेवा जेष्ठता प्रकरणात / वेतनवाढीस सलग सेवेत / अनेक कर्मचाऱ्यावर अन्याय झाल्यामुळे त्या कामी सभागृहाची समिती नेमून अहवाल तयार करण्याबाबत.

सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी सदरचा प्रस्ताव मागे घेतला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १७/११/२००६

**प्रकरण क्र. ८९ :-** सन्मा. सदस्या श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक १०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, भोला नगर येथील लोक विस्थापित झाले. योजनेत रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्यांना प्राधान्य देऊन घरे उपलब्ध करून देण्यात यावीत असे स्पष्ट निर्देश शासनाने मनपाकडे दिले आहेत. आरक्षण क्र. २२२ व २२२अ (बेघरांसाठी घर) या जागेच्या मालकाने / विकासकाने १०१ सदनिका मनपाकडे दि. १६/०८/२००६ रोजी विनामुल्य हस्तांतरीत करणार आहेत असे लेखी पत्र दिले आहे. तरी मनपा ने १०१ सदनिका ताब्यात घेऊन विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ९ टेबल ३-१ ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्तापीत होणाऱ्या झोपडीधारकांना सदरील घरे देऊन पुर्नवसन करणे व घरे वाटप करण्याबाबत मनपाने धोरण निश्चीत करून योग्य निर्णय घेणेबाबत.

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत शासनाकडून गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/११/२००६

प्रकरण (९०) उपप्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण (२) नुसार प्रस्ताव उद्यान अधिक्षक या पदाच्या सेवानियमात दि. १२/०८/२००५ ठराव क्र. २९ मध्ये बदल करुन सुधारित सेवा नियमास मान्यता देणे.

ठराव क्र. (८७)

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १२/०८/२००५ ठराव क्र. २९ अन्वये उद्यान अधिक्षक पदाचे सेवानियम करण्यात आले आहेत. सदर पद हे वर्ग-३ चे असल्याने सदर पदाचे मा. महासभा दि. १२/०८/२००५ ठराव क्र. २९ मध्ये सेवा नियमात बदल करुन खालील प्रमाणे सेवानियम करण्यात यावेत.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १. | उद्यान अधिक्षक | १ पदोन्नती (१००%) | | १) मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची पदवी/पदविका प्राप्त.<br>२) एल.एस.जी.डी. परिक्षा प्राप्त.<br>३) एल.जी. एस. परिक्षा प्राप्त.<br>४) भाईंदर नगरपरिषद/ महानगरपालिका शहरातील उद्याने, बगीचे व रस्त्याच्या कडेला दुतर्फा झाडे लावणे, त्यांचे दैनंदिन निगा, विकास व तत्संम कामांचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>५) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण. |
| २. | उद्यान विद्या सहाय्यक | २ पदोन्नती (१००%) | | १) मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठाची पदविका प्राप्त.<br>२) एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण.<br>३) भाईंदर नगरपरिषद/ महानगरपालिका शहरातील उद्याने, बगीचे व रस्त्याच्या कडेला दुतर्फा झाडे लावणे, त्यांचे दैनंदिन निगा, विकास व तत्संम कामांचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>४) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण. |

वरील प्रमाणे सेवा नियम फेरबदलास व त्यानुसार पद भरणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :-
श्री. महेंद्रसिंग चौहाण

अनुमोदक :-
श्री. लिओ कोलासो

ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासन अधिकारी

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/१२/२००६

**प्रकरण क्र. ९१ :-**

**दि. २०/०९/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ६८ :-**

दि. २०/०९/२००६ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/१२/२००६

**प्रकरण क्र. ९२ :-** **मनपाच्या सभागृह / इमारती / बंगले यांना नांवे देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र. ६९ :-

| | | |
|---|---|---|
| मुख्य इमारत | :- | स्व. इंदिरा गांधी भवन |
| मुख्य सभागृह | :- | छत्रपती शिवाजी महाराज सभागृह |
| स्थायी समिती सभागृह | | लालबहादूर शास्त्री सभागृह |
| प्रभाग समिती क्र. ०१ | :- | स्व. काका बॅप्तीस्टा प्रभाग कार्यालय |
| प्रभाग समिती क्र. ०२ | :- | डॉ. राजेंद्रप्रसाद प्रभाग कार्यालय |
| प्रभाग समिती क्र. ०३ | :- | मोरेश्वर नारायण पाटील प्रभाग कार्यालय |
| प्रभाग समिती क्र. ०४ | :- | मौलाना अब्दुल कलाम आझाद प्रभाग कार्यालय |
| नगरभवन कार्यालय | :- | स्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन |
| नागरी सुविधा केंद्र | :- | स्व. राजीव गांधी नागरी सुविधा केंद्र |
| मा. महापौर बंगला | :- | त्रिवेणी निवास |
| मा. आयुक्त बंगला | :- | पारिजात निवास |

सुचक :- श्री. हुरल कोर्गीस    अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/१२/२००६

**प्रकरण क्रं. :- ( ९३ )** काजुपाडा ते घोडबंदर येथे ५० एम. एल. डी. वाढीव पाणिपुरवठा पाईप लाईन टाकणे कामी जागा दिलेल्या उर्वरीत प्रकल्प ग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी नेमणुक देणे बाबत..

**ठराव क्रमांक :- ( ७० )**

मिरा-भाईंदर शहराकरीता ५०.०० एम. एल. डी वाढीव पाणीपुरवठा करीता १३५०.०० मी. मी. व्यासाची जलवाहीनी टाकण्याकरीता सदर भागातील शेतक-यांनी जागा उपलब्ध करुन दिली होती. सदर शेतक-यांच्या मुलांना नगरपालिका वेळेत सामावुन घेण्याकरीता मा. स्थायी समिती सभा दि. १६/१०/२००० ठराव क्र. २२९ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तद्नंतर मा. महासभा दि. १९/०६/२००३ ठराव क्र. १६ अन्वये सदर कर्मचा-यांना सेवेत सामावुन घेण्याकरीता आवश्यक तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता दिली. शासनाकडील क्रमांक मिभापा-२००४/४६९/ प्र.क्र. १४०/०४/ नवि-२८ दि. २६/०६/२००६ च्या पत्रान्वये सदर नेमणुकीस महानगरपालिका सक्षम असुन पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे. सदर कर्मचा-यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १. | श्रीधर अनंत म्हात्रे. |
| २. | विनोद दशरथ म्हात्रे. |
| ३. | परशुराम नरेश म्हात्रे. |
| ४. | गुलाब गजानन पाटील. |
| ५. | जगदिश दिगंबर म्हात्रे. |
| ६. | जयहिंद बाबुराव म्हात्रे. |
| ७. | हनुमान शासिक पाटील |
| ८. | नामदेव शांताराम पाटील |
| ९. | राजाराम मोतीराम पाटील |
| १०. | जयप्रकाश नारायण पाटील |

| | |
|---|---|
| ११. | राजकुमार केशव पाटील |
| १२. | आकाश जयहिंद पाटील |
| १३. | नरेश मोतीराम पाटील |
| १४. | राजेश शांताराम पाटील |
| १५. | रमेश नारायण पाटील |
| १६. | विलास रामचंद्र वारंग |
| १७. | एडवर्ड ॲन्थॉनी फिलीप्स |
| १८. | किशोर मदन पाटील |

वरील कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "सफाई कामगार" या संवर्गातील पदे रीक्त असल्याने सदर पदावर नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार एक खास व अपवादात्मक बाब म्हणुन ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री हॅरल बोर्जिस.

अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला.

पिठासिन अधिकारी महानगरपालिका
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/१२/२००६

**प्रकरण क्र. :-** ९४

**ठराव क्र. :-** ७१

**विषय :-** **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन व प्रभागनिहाय वॉर्ड साफसाफाई कामाबाबत.**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन व प्रभागनिहाय वॉर्ड साफसाफाई करणे कामाच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चेअंती घनकचरा व्यवस्थापनाचे तांत्रिक बाबी तसेच नविन बंदिस्त वाहनावर येणारा भांडवली खर्च, कंत्राटी कामगार ॲक्ट नुसार देण्यात येणारे वेतन भत्ते इत्यादी बाबी तपासून घनकचरा व्यवस्थापनाचे संकल्प चित्र एक महिन्यात तयार करून मा. महासभेपुढे सादर करण्यात यावा. व सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांना ३१ मार्च २००७ पर्यंत मुदत वाढ देणेस हि महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :-** (sd/-) **अनुमोदक :-** (sd/-)

(sd/-)

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२१/१२/२००६**

**प्रकरण क्र. ९५** - **विकास योजनेतील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या आरक्षीत जागा (बगीचे / क्रिडांगण / शाळा) विकसीत करण्यासंबंधी धोरण निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र. ७२** -

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह काही भाग वगळून शासनाचे नगरविकास विभाग अधिसुचना क्रं. टिपीएस १२९६/८४७/ सीआर/ १६२/९६ युडी-१२ दि.१४/५/९७ अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्रं. टिपीएस-१२९८/नपा सीआर-८९/९८/ युडी-१२ दि.२५/८/२००० अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. सदर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दि.१५ जुलै १९९७ व दि.१५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे. त्यानंतर दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी मिरा भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत झालेले आहे.

मंजूर विकास योजने मध्ये एकूण ३८६ आरक्षण असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण आरक्षणे | - | ३८६ |
| महानगरपालिकेने विकसीत करावयाची आरक्षणे | - | ३५६ |
| खाजगी जागेवर | - | ३१५ |
| सॉल्ट विभागाच्या जागेवर | - | २० |
| शासकिय जागेवर | - | २१ |

आतापर्यंत महानगरपालिकेने शासकीय जागेवरील ६, समावेशक आरक्षणाच्या तरतुदीतून १६, टि.डी.आर. तरतुदीद्वारे ८ अशी एकूण ३० आरक्षणे विकसीत केलेली आहेत. यु.एल.सी. कडून २ आरक्षणाखालील जागा ताब्यात आलेली आहेत. तसेच टि.डी.आर. तरतुदीद्वारे २,०८,३८६.०७ चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. तसेच सुमारे ४१५ कि.मी. विकास योजनेतील रस्त्यापैकी १५० कि.मी. लांबीचे रस्ते विकसीत झालेले आहे.

934



आरक्षीत जागा टप्प्याटप्पाने विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात ताब्यात येत असून त्या जागा विकसीत करण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षीत जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विकास प्रमाणपत्राद्वारे हस्तांतरीत केलेली आरक्षणे विकसीत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामध्ये आरक्षीत जागा खाजगी विकासकांना / सेवाभावी संस्थांना विकसीत करण्यासाठी देण्याचे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका सुध्दा विकासहक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात आलेली आरक्षणे (बगीचे / क्रिडांगण /शाळा, ई.) ३० वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या भाडे तत्वावर दिल्यामुळे सदरच्या जागा विकसीत करण्याकरिता महानगरपालिकेस येणारा खर्च वाचणार आहे व वार्षिक भाडेपट्ट्याद्वारे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना १५ जुलै १९९७ पासून मंजूर झालेली आहे. २० वर्षात संपुर्ण विकास योजनेची अंमलबजावणी करुन शहरातील नागरीकांना सोईसुविधा उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर विकासकांना / सेवाभावी संस्थांना आरक्षीत जागा विकास करण्यास भाडेपट्यावर दिल्यास सदरच्या जागेचा लवकर विकास होवू शकतो व महानगरपालिकेस सदरची आरक्षणे विकसीत करण्यास येणारा खर्च वाढू शकेल व भाडेतत्वावर सदरच्या जागा दिल्यामुळे वार्षिक भाड्यापोटी महानगरपालिकेस उत्पन्न मिळू शकेल. आरक्षणे लवकर विकसीत झाल्यामुळ अतिक्रमण होणार नाही.

सबब महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षीत जागा खाजगी विकासकांमार्फत / सेवाभावी संस्थांमार्फत भाडेतत्वाद्वारे विकसीत करण्याबाबत प्रशासनाने जागा ताब्यात घेवून अटीशर्ती ठरवून व महानगरपालिकेच्या हिताच्या अटीशर्ती ठरवून निविदा मागवून सदर प्रस्ताव सहाय्यक संचालक, नगररचना, महापौर, उपमहापौर, आयुक्त, सभागृह नेता, सभापती स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता, शहर अभियंता यांची समिती नेमून त्यांच्या समोर ठेवून अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**सुचक - श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदक - श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.०६/१२/२००६

प्रकरण क्र. ९६ -

विषय – मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील आ.क्र. २२२ व २२२अे या "हौसिंग फॉर डिसहाऊस्ड" या आरक्षणाबाबत.

ठराव क्र. ७३ -

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात बेघरांसाठी घरे (Housing for Dishoused) करिता खालील प्रमाणे आरक्षण आहे.

| आरक्षण क्रमांक | गांव व सर्व्हे क्रमांक | आरक्षणाचे एकूण क्षेत्र (हेक्टर) | जागेची मालकी | सि.आर.झेड. |
|---|---|---|---|---|
| २२२ | मौजे – नवघर स.क्र. (नविन) १९३पै., २२पै., २७पै., २८पै., १९२पै., १९४पै. | ४.२३ | खाजगी | —— |
| २२२अे | मौजे – नवघर स.क्र. (नविन) २२पै., २७पै., ३२पै., ३१पै., २४पै., २५पै., २३पै., २०पै., १८पै. | ५.७६ | खाजगी | ७०% सि.आर.झेड. |
| ७२ | मौजे – भाईंदर स.क्र. (नविन) ३७८पै., ३७२पै., ३३७पै. | ७.२६ | सॉल्ट विभाग | १००% सि.आर.झेड. |
| १५० | मौजे – भाईंदर, स.क्र. (नविन) १७८पै., १७९पै., १७६पै., १७४पै., १५८पै. | ७.२६ | सॉल्ट विभाग | १००% सि.आर.झेड. |

मिरा भाईंदर महानगरपालिकच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम ९(१) नुसार "हौसिंग फॉर डिसहाऊस्ड" विकसीत करण्याबाबतचे समुचित प्राधिकरण महानगरपालिका (मिरा भाईंदर) पब्लिक / सेमी पब्लिक / मालक स्वतः विकसीत करु शकतात. विकास नियंत्रण नियमावलीच्या अधिन राहुन आ.क्र. २२२ व २२२अे मधील सि.आर.झेड. ने बाधीत क्षेत्र वगळून एकुण ८ - प्रस्तावांना १६९१४.८२ चौ.मी. क्षेत्रासाठी खालील प्रमाणे बांधकाम परवानगी दिलेली असून उर्वरीत जमीन टप्प्याटप्प्याने विकसीत होत आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २३१/८ | मिभा/मनपा/नर/ १४१५/०६-०७, दि. २९/७/०६ | १६९.६४ चौ.मी. | मे. गुजरात इंटरप्राईजेस पत्ता- वरील प्रमाणे | मे. बॉम्बे आर्किटक्चरल कन्सलटंट जी-१, प्रथमेश अपा., डिसोझा स्ट्रिट, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समोर, भाईंदर (प.) | १ |
| ८ | २३१/३ | मिभा/मनपा/नर/ १५०३-०६-०७, दि.०३/०८/०६ | ५०९.५५ चौ.मी. | मे. गुजरात इरटरप्राईजेस पत्ता- वरील प्रमाणे | मे. बॉम्बे आर्किटक्चरल कन्सलटंट जी-१, प्रथमेश अपा., डिसोझा स्ट्रिट, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समोर, भाईंदर (प.) | ३ |
| | | | | | **एकूण** | **१०१** |

एकूण मंजूर क्षेत्रापैकी १०% मर्यादित सदनिका १६९१.४८ चौ.मी. क्षेत्राच्या (१६.७५ चौ.मी. च्या) (१०१) सदनिका जागेचे विकासक महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरीत करणार आहेत. उर्वरित ४०% मर्यादित १६.७५ चौ.मी. च्या सदनिका जागेवर बांधावयाच्या आहेत. स्थळ निरीक्षण केले असता ६७ सदनिकांचे बांधकाम पुर्ण झालेले असून पैकी ४१ सदनिकांची ताबा पावती मिळालेली आहे.

विकासक मे. गुजरात एंटरप्राइजेस, मे. गुजरात प्रॉपर्टीज, म. गुजरात इस्टेट यांनी दि.१५/०९/२००६ व दि.१९/०९/२००६ अन्वयेच्या पत्रान्वये १०% च्या मर्यादित एकुण ४१ तयार सदनिका महानगरपालिकेने ताब्यात घेण्याबाबत पत्रव्यावहार केलेला आहे. सदर तयार सदनिका ताब्यात घेण्याबाबत या कार्यालयाकडून कार्यवाही चालू आहे.

सदर आरक्षण विकसीत होउन मिळणारी १०% घरे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनिमय क्र. ९ टेबल ३-१-ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्थापित होणाऱ्या विस्थापीतांना (अधिकृत मालमत्ता) सदरील घरे द्यावयाची आहेत.

याबाबत आतापर्यंत विकास योजनेतील नवीन रस्ते / रस्ता रुंदीकरणात किंवा धोकादायक इमारतीमधील रहिवाशांच्या तात्पुरत्या व्यवस्थाकामी वाटप होणेकामी आयुक्त स्तरावर कार्यवाही करणेस ही महासभा मंजूरी देत आहे. सदर ठरावास तात्काळ अंमल देणेत येत आहे.

**सुचक -** **अनुमोदक -**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१२/२००६
## (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ९७ :-** **अग्निशमन दलासाठी अत्याधुनिक फायर फायटिंग पंप (चिता सिस्टम) खरेदीस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानरगपालिकेचे अग्निशमन दल ही अत्यावश्यक सेवा असून २४ तास कार्यरत असते. मिरा भाईंदर परिसरात लहान गल्ल्यांमध्ये इमारती बांधलेल्या असुन, आपत्कालीन प्रसंगी तेथे मोठे वाहन घेउन जाणे अडचणीचे होते. अग्निशमन दलाने टाटा मोबाईल हे लहान वाहन खरेदी केलेले आहे. त्यावर सदर अत्याधुनिक फायर फायटींग पंप, (Fire Fighting Pump) (चिता सिस्टम) केल्यास मिरा भाईंदर परिसरातील लहान गल्ली मधील इमारती मध्ये आपत्कालीन प्रसंगी लहान लहान घटना स्थळी सुलभरित्या पोहचू शकेल. सदर चिता सिस्टम मध्ये ३० मिटर उंची पर्यंत पाणी फेकण्याची क्षमता आहे. त्यामुळे अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना होज टाकण्यासाठी लागणारा वेळ हा वाचणार आहे. सदरची सिस्टम ही टाटा २०७ ह्या पिक अप वाहनावर लावण्यात येणार असल्याने अरुंद रस्त्यावर सदरची सिस्टम उपयोगी ठरणार आहे.

इंडस्ट्रियल एरियामध्ये मोठमोठी वाहने उभी असतात व रस्ता अरुंद असतो. अशाठिकाणी मोठी वाहने नेणे खुप अडचणीचे होते. त्याच ठिकाणी लहान वाहन असले तर कमीत कमी वेळेत घटना स्थळी पोहचू शकते. तसेच लहान वाहन इंडस्ट्रियल एरियामध्ये गल्ली बोळात नेणे सोपे जाते. या सिस्टमद्वारे कमी पाण्याने मोठी आग विझवता येईल व घटनेच्या ठिकाणी कमी प्रमाणात नुकसान होईल.

सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकात साधनसामग्री व भांडारे या शिर्षकाखाली रू. ५० लाख एवढी तरतुद करण्यात आलेली असून माहे नोव्हेंबर २००६ पर्यंत एकूण खर्च रू. ११,४६,२३१/- एवढा झालेला आहे. सदर चिता सिस्टम खरेदी करणेसाठी अंदाजे २४ लाख रूपये खर्च अपेक्षित आहे. तरी चिता सिस्टम खरेदी करणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. तसेच अग्निशमन दल ही अत्यावश्यक सेवा असल्याने साहित्य खरेदी हे तात्काळ करावे लागत असल्याने यापुढे मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी घेण्यास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ची तहकुब सभा दि. २१/१२/२००६

**प्रकरण क्र. ९८ :-** महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत.

सदर विषयाचा गोषवारा प्रशासनाकडून आला नसल्यामुळे सदर विषय मा.महापौरांच्या आदेशाने पेन्डीग ठेवण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**महासभा, दि.०६/१२/२००६**

**प्रकरण क्र. ९९ :- मालमत्ता नोंदणी करण्यासाठी महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला देणे बाबत विचार विनिमय करणे बाबत...**

**ठराव क्र. :-** ७५

मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी या भागात ग्रामपंचायत व नगरपालिका कार्यरत होत्या. ग्रामपंचायत काळापासून नगरपालिका ते महानगरपालिका अस्तित्वात येईपर्यंत मोठया प्रमाणावर इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. त्या इमारतीना तात्कालीन ग्रामपंचायत नगरपालिकेने रितसर परवानग्या दिलेल्या आहेत. ग्रामपंचायत व नगरपालिका काळात बांधलेल्या इमारतीमध्ये लोक रहावयास आले असून सर्व इमारती रहिवास व्याप्त असून खाजगी जागेतील आहेत. सदरहू इमारतीमधील फ्लॅट धारकांनी फ्लॅट खरेदी विक्री केल्यास बॅकेकडून व वित्तीय संस्थाकडून कर्ज घेण्यासाठी सदरचे दस्तऐवज नोंदणी करणे अनिवार्य ठरत आहे. नोंदणी कार्यालयातून नोंदणी करणे कामी संबंधित इमारत बांधकाम परवानगी अथवा वापर परवाना असल्याबाबत फ्लॅट खरेदी विक्री करण्याकामी महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला मागणी करतात. अशा प्रकारचे ना-हरकत दाखले उपायुक्त मुख्यालय हयाच्या दि.०५/०७/२००४ च्या आदेशान्वये सप्टेंबर - २००६ पर्यत मोठया प्रमाणावर देण्यांत आलेले आहेत. त्या दाखल्यानुसार ब-याच फ्लॅट धारकांनी आपले दस्तऐवज नोंदणी करुन घेतली आहेत.

सध्या अशा प्रकारचे नोंदणी करणे कामी पुर्वी दिलेल्या ना-हरकत दाखल्याप्रमाणे दाखले मिळावे म्हणून ब-याच फ्लॅट धारकांनी मागणी अर्ज सादर केलेले आहेत. कर विभागाकडून शासकीय पत्राचा संदर्भ देउन अशा प्रकारचे दाखले देता येणार नाहीत असे सांगण्यात येते. वास्तविकता नगरपालिका काळात झालेल्या इमारती या खाजगी जागेत असून त्या रहिवास प्राप्त आहेत. इमारतीमध्ये गेल्या २०-२५ वर्षापासून नागरिक राहत आहेत. कर विभगातून अशा प्रकारचे दाखले मिळण्याच्या संदर्भात इमारत बांधकाम परवानगी व इमारत वापर परवाना या कागदपत्राची मागणी केली जात आहे. सदरहू बांधलेल्या इमारती या फार पुर्वीपासून च्या असून इमारतीच्या गृहनिर्माण संस्था देखील स्थापन झालेल्या आहेत. इमारत बांधणारे विकासक सध्या अस्तिवात नाहीत व उपलब्ध नसल्याने इमारत बांधकाम विषयक कागदपत्रे फ्लॅट धारकांना मिळू शकत नाहीत. फ्लॅट धारक अशी कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरत आहेत.

अशा प्रकारच्या इमारती रहिवास प्राप्त असून नगरपालिकेने अशा इमारतीना नियमानुसार कर आकारणी केली आहे. तसेच पाणी पुरवठा विभागामार्फत अशा इमारतीना पाणी पुरवठा व वीज कंपनीमार्फत वीज पुरवठा उपलब्ध करुन दिला आहे.

महानगरपालिकेने नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून ब-याच इमारतीना त्या सन १९९४-१९९५ पुर्वीच्या असल्या व त्यास कर आकारणी झाली आहे. या निकषावर बरीच पाणी पुरवठा कनेक्शन देण्यात आली आहेत. अशा प्रकारे पाणी कनेक्शन देताना ती इमारत अधिकृत वा अनाधिकृत हयाचा विचार न करता वर नमूद केलेल्या निकषावर पाणी कनेक्शन दिली आहेत.

नोंदणी करणेकामी मागणी अर्ज करणारे फ्लॅट धारक हे वर नमूद केलेल्या निकषामध्ये बसत आहेत. मागणी करणारे अर्जदार हे नागरिक असून त्यांच्या राहण्याच्या घरासाठी शासनाने उदार धोरण ठेवून सर्व बॅकामार्फत कर्ज उपलब्ध करुन दिले आहे. बॅकाकडून कर्ज मिळवून घेणेसाठी संबंधित फ्लॅटचे दस्तऐवज नियमानुसार नोदणी करणे अत्यावश्यक आहे. फ्लॅट दस्तऐवज नोदंणी घेण्याशिवाय बॅकेकडून कर्ज मिळू शकत नाही. नोंदणी कामी ना-हरकत दाखले मागणी करणारे फ्लॅट धारक ज्या इमारतीत राहतात त्या फार जुन्या इमारती असून रहीवास प्राप्त आहेत. महानगरपालिका कोणत्याही इमारतींना कर आकारणी करताना ती इमारत अधिकृत असो वा अनधिकृत असो तरी "अनधिकृत बांधकामाविरुध्द करावयाच्या कायदेशीर कारवाईस बाधा न येता अथवा कर आकारणी केली तरी इमारती अधिकृत होत नाही" या अटीवर कराची आकारणी करीत आहे अशा अनधिकृत इमारतीना देखील कराची आकारणी केलेली आहे. इमारती हया जुन्या कालावधीपासून बांधल्या असून संबंधित इमारतीचे मालक उपलब्ध नसल्याने बांधकाम विषयक आवश्यक असलेले कागदपत्र फ्लॅट धारक सादर करु शकत नाहीत. कर्ज मिळविण्यासाठी नोदंणी करणे अनिवार्य ठरत असल्याने त्या कामी महानगरपालिकेचा दाखला मिळणेस फ्लॅट धारकांना येणा-या अडचणी व त्यांची होणारी गैरसोय या सर्वाचा विचार करता आवश्यक ते प्रतिज्ञापत्र संबंधीत फ्लॅट धारकांकडून लिहून घेऊन अशा प्रकारचे नोंदणी करणे कामी नागरीकांना आवश्यक असणारे फ्लॅट खरेदी विक्री करणे कामी ना-हरकत दाखले सन डिसेंबर २००२ पर्यतच्या सर्व इमारतींना देण्यात यावे.

सूचकः- [signature] अनुमोदकः- [signature] २७/१/०३.

ठराव सर्वानुमते मंजुर

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ची तहकुब सभा दि. २१/१२/२००६

**प्रकरण क्र. १०० :-** श्री. संजय काकडे, शाखा अभियंता यांना महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त पदांवर कायम स्वरुपी सामावून घेणेबाबत निर्णय घेणे.

सदर विषयाचा गोषवारा प्रशासनाकडून आला नसल्यामुळे सदर विषय मा.महापौरांच्या आदेशाने पेन्डीग ठेवण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५४७

**मा. महासभा दि. ०६.१२.२००६**

**प्रकरण क्र. १०१ : महानगरपालिकेकडून शिक्षण मंडळाला रक्कम वर्ग करणेबाबत.**

**ठराव क्र. : ७६**

मिरा - भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाची सभा दि. १२.०९.२००६ ठराव क्र. २७ अन्वये सन २००६-०७ या अर्थ संकल्पातील लेखाशिर्ष अंशदाने (अ) शाळा, कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे मध्ये असलेल्या १ कोटीच्या तरतुदी पैकी शासन निर्णय दि. २८.०२.१९९१ नुसार संस्थांना रु. ३० लाख एकत्रित अनुदान देण्याची तरतुद आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामधील उर्वरीत रु. ७० लाख सोबतच्या पुर्नविनियोजनाचे 'अ' विवरण पत्राप्रमाणे शिक्षण मंडळास वर्ग करणेस मान्यता देण्यांत येते.

**नमुना क्रमांक १०,(FORM १०)**

नियम ३० (३) पहा

**शिक्षण मंडळ मिरा-भाईंदर महानगरपालिका**

| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी | अद्यावत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी | अद्यावत खर्च | प्रस्तावित रक्कम | अभि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १ |
| इ.१ | **अंशदाने**<br>अ) शाळा कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे | शैक्षणिक संस्थांना अनुदान | १ कोटी | - | १ कोटी | **फ. संर्किण**<br>**प्र. क्र.२३ (नविन)** | १) विद्यार्थी व शिक्षकांचे प्रशिक्षण | ७० लाख | | १० लाख | |
| | | | | | | | २) शिक्षकांचे वेतन (तात्पुरती नियुक्ती) | | | १ लाख | |
| | | | | | | | ३) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षा फि व मार्गदर्शक पुस्तके मोफत पुरवठा करणे | | | ३ लाख | |
| | | | | | | | ४)मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचा दप्तर, बुट व मौजे मोफत पुरवठा करणे. | | | १४ लाख | |
| | | | | | | | ५) क्रिडा साहित्य खरेदी | | | ५ लाख | |
| | | | | | | | ६) शिक्षण मंडळ सदस्य मानधन व सभा भत्ता | | | ५ लाख | |
| | | | | | | | ७) विद्यार्थ्यांकरीता आकस्मित वैद्यकीय खर्च | | | २ लाख | |

| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी | अद्यावत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी | अद्यावत खर्च | प्रस्तावित रक्कम | अ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | |
| | | | | | | ड-१(४) **प्राथमिक/माध्यमिक शिक्षण** | शाळेतील विद्यार्थ्यांना वहया, पुस्तके, गणवेश, बॅच मोफत वाटप. | २५ लाख | | ३० लाख | |

वरील प्रमाणे पुर्नविनोजन पत्रकास मंजुरी देण्यांत येत आहे. लेखा विभागाने मंजूर पुर्नविनियोजन पत्रकानुसार तरतुदी बदलण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

**सुचक :** **अनुमोदन :**

ठराव सर्वानुमते मंजुर

**महापौर**

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/१२/२००६

**प्रकरण क्र. १०२ :- वाढीव पाणी पुरवठ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ७७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ३५ द.ल.लि. प्रति दिन पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला असून त्यासाठी अंदाजपत्रक तयार करावयास व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तांत्रिक अहवालास येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा.महासभा दि.२१/१२/२००६

प्रकरण क्र. (१०३) मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना पदोन्नती बाबत.

ठराव क्र. ७८ :-

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कर्मचा-यांना पदोन्नती देण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) नुसार गठित केलेल्या समितीने पदोन्नती निवड समितीने आस्थापनेवरील मुख्य लिपिक, वरिष्ठ लिपिक, लिपिक, वाहन चालक, शिपाई या संवर्गातील रिक्त पदांवर अनुशेषाप्रमाणे पदोन्नती देण्यात आलेले आहे.

संवर्ग - मुख्यलिपिक

| अ.क्र. | नाव | प्रवर्ग | पदोन्नतीचे नाव | पदोन्नती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री अशोक गायकवाड | अनु.जाती | मुख्यलिपिक | २०/१०/२००६ |
| २ | श्रीम.चारूशिला खरपडे | अनु.जमाती | मुख्यलिपिक | २०/१०/२००० |
| ३ | श्री प्रकाश कुलकर्णी | खुला | मुख्यलिपिक | २०/१०/२००० |
| ४ | श्री जगदिश भोपतराव | खुला | मुख्यलिपिक | २०/१०/२००० |
| ५ | श्री सुर्यकांत दातीर | खुला | मुख्यलिपिक | २०/१०/२००० |

संवर्ग - वरिष्ठ लिपिक

| अ.क्र. | नाव | प्रवर्ग | पदोन्नतीचे नाव | पदोन्नती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री देवीदास डि.भालेराव | अनु.जाती | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २ | श्री जितेंद्र कांबळे | अनु.जाती | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ३ | सौ.माधुरी रा.धेगडमल | अनु.जाती | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ४ | श्री रामु शंकर केंजळे | अनु.जमाती | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ५ | सौ.वैशाली पाटील | अनु.जमाती | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ६ | श्री सुनिल नेहे | विजा/भज | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ७ | श्री रूतूजा पिंपळे | विजा/भज | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ८ | श्री दामोदर संखे | विजा/भज | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ९ | श्रीम.लॉरिटा घाडगे | वि.मा.प्र. | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १० | श्री भरत ताम्हणकर | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| ११ | श्री पांडूरंग वना पाटील | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १२ | श्री भास्कर श.पाटील | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १३ | श्री दशरथ हंडोरे | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १४ | श्री केशव फोफीरकर | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १५ | श्री अरूण धर्माधिकारी | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १६ | श्री प्रभाकर म्हात्रे | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १७ | श्री कांतीलाल पाठारी | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १८ | सौ अन्नपुर्णा आवडेकर | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| १९ | श्री लहू चौधरी | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २० | श्री महानंदा पाटील | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २१ | सौ सुलभा म्हात्रे | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २२ | सौ चित्रा पाटील | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २३ | सो नाताळ रिबेलो | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २४ | श्री जोगिंदर पाटील | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |
| २५ | श्री दत्तात्रय वरकुटे | खुला | वरिष्ठ लिपिक | २०/१०/२००६ |

संवर्ग - लिपिक

| अ.क्र. | नाव | प्रवर्ग | पदोन्नतीचे नाव | पदोन्नती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री दिलीप ब.कांबळे, स.का. | अनु.जाती | लिपिक | २०/१०/२००६ |
| २ | श्री मिलिंद पवार, शिपाई | अनु.जाती | लिपिक | २०/१०/२००६ |
| ३ | श्री जयवंत कुमार शिंदे, स.का. | अनु.जमाती | लिपिक | २०/१०/२००६ |
| ४ | श्री राजेंद्र लक्ष्मण रावते, स.का. | अनु.जमाती | लिपिक | २०/१०/२००६ |
| ५ | श्री नितिन राठोड, फिटर | वि.जा./भ.ज.(ब) | लिपिक | २०/१०/२००६ |
| ६ | श्री महादेव न.बंदिछोडे, मजूर | वि.जा./भ.ज. | लिपिक | २०/१०/२००६ |
| ७ | श्री विनोद चरणसिंग राठोड, शिपाई | वि.जा./भ.ज. | लिपिक | २०/१०/२००६ |

संवर्ग - शिपाई

| अ.क्र. | नाव | प्रवर्ग | पदोन्नतीचे नाव | पदोन्नती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री देविदास पाटील | खुला | शिपाई | २०/१०/२००६ |
| २ | श्री संतोष पाटील | खुला | शिपाई | २०/१०/२००६ |

संवर्ग - वाहनचालक

| अ.क्र. | नाव | प्रवर्ग | पदोन्नतीचे नाव | पदोन्नती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री यशवंत बरफ | अनु.जमाती | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| २ | श्री नरेश संखे | विजा/भज | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ३ | श्री प्रकाश कोटीयाना | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ४ | श्री सत्यवान पाटील | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ५ | श्री सुलेमान मुलानी | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ६ | श्री दत्तात्रेय पाटील | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ७ | श्री याकुब आरेकम | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ८ | श्री बाळू सुर्यवंशी | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |
| ९ | श्री अच्युत नलावडे | खुला | वाहन चालक | २०/१०/२००६ |

वरील प्रमाणे पदोन्नती निवड समितीने केलेल्या निर्णयानुसार मा.महासभेच्या अवलोकनासह मंजूरी देत आहे. तसेच मा.औद्योगिक न्यायालय ठाणे येथील दावा क्र.१४९/२००५ व मा.उच्च न्यायालय दावा क्र.६२८७/०५ मध्ये झालेल्या निकालानुसार कनिष्ठ अभियंता संवर्गातील चार अभियंत्याना मागील सेवाजेष्ठता धरून उपअभियंता पदावरील पदोन्नतीस व त्या अनुशंगाने सेवाजेष्ठता यादीस बदलास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच बालवाडी शिक्षिका, डॉक्टरर्स, नर्स व इतर आरोग्य विभागातील मंजूर पदे, महिला व बालविकास अधिकारी, सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी, सहाय्यक नगररचनाकार, अधिक्षक या मंजूर पदावरील पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

संगणक विभागातील संगणक चालक व लघुलेखक यांच्या नेमणूकीस ही मंजूरी देण्यात येत आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

सुचक : श्री हॅरेल बोर्जीस

अनुमोदन : सौ.रिटा शहा

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/१२/२००६

**प्रकरण क्र. १०४ :-** **महापालिका आस्थापनेवरील ५३८ कर्मचाऱ्यांच्या सेवा जेष्ठतेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. २३/०३/२००५ रोजी पारित झालेला ठराव क्र. १७९ नुसार कार्यवाही करणेबाबत.**

ठराव क्र. ७१:-

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेच्या आस्थापनेवर सन १९९०-९१ पासून ५३८ रोजंदारी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. सदरच्या कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी सामावून घेणेस मा. सर्वसाधारण सभा दि. ०४/०८/१९९७, ठराव क्र. ४९ अन्वये ठराव पारीत करुन कर्मचाऱ्यांच्या यादीसह शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आलेला होता. त्यानुसार शासन आदेश क्र. एम.सी.के. १०९७/प्र.क्र. ५८३/९७/४, दि. १ मे २००० नुसार नगरपालिका आस्थापनेवर ५३८ रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणेंत आले.

उक्त रोजंदारी ५३८ कर्मचाऱ्यांना दि. १ मे २००० पासून कायम केल्याने सन १९९०-९१ या आर्थिक वर्षापासून नगरपरिषदेमध्ये केलेली सेवा धरण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांमधील काही कर्मचाऱ्यांचे वय जास्त असल्याने, त्यांना नियमानुसार पेन्शन मिळणार नाही / तसेच त्यांची ५ ते १० इतकीच वर्षे सेवा होणार आहे. त्यामुळे त्यांना निवृत्तीनंतर मिळणारे फायदे, पेन्शन, ग्रॅज्युइटी इत्यादी बाबतचा लाभ त्यांना मिळणार नाही. वरील वस्तुस्थितीचा विचार करुन सध्या महापालिकेमध्ये ५३८ कायम स्वरुपी असलेले कर्मचारी यांनी केलेली सेवा, तसेच कर्मचारी यांची वाढलेली वये इत्यादींचा विचार करता, संबंधित कर्मचाऱ्यांची सेवा दि. ०१/०३/१९९३ पासून लागु केल्यास निवृत्तीनंतर अनुज्ञेय असलेले फायदे प्राप्त होतील.

वरील वस्तुस्थितीचा विचार करुन ५३८ कायम कर्मचारी हे येथील स्थानिक रहिवाशी असून, त्यांच्या सेवेचा लाभ वेळोवेळी महानगरपालिकेला झालेला आहे. सदर सर्व कर्मचारी चतुर्थ श्रेणीमधील असल्याने त्यांची सेवा दि. ०१/०३/१९९३ पासून धरल्यास निवृत्तीनंतर होणारे फायदे, लाभ त्यांना मिळतील. तरी ५३८ कायम कर्मचारी यांची दि. ०१/०३/१९९३ पासून सेवाजेष्ठता धरणेबाबत त्याचप्रमाणे ५३८ कर्मचाऱ्यांपैंकी लिपीक पदाकरिता शैक्षणिक पात्रता धारण करीत असलेल्या काही पात्र कर्मचाऱ्यांना लिपीक या पदावर पदोन्नती देण्यांत आली होती. त्यापैकी १९९३ पूर्वीपासून दहावी पास व टंकलेखन ही पात्रता धारण करीत असलेल्या पात्र कर्मचाऱ्यांची लिपीक पदाची सेवाजेष्ठता ही दि. ०१/०३/१९९३ पासून ग्राह्य धरणेस तसेच सेवा पुस्तकात नोंद घेणेंस व येत्या वर्षाच्या येणाऱ्या सेवाजेष्ठता यादीत प्राधान्यक्रमाने नोंद घेऊन सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करणेंबाबत मा. स्थायी समिती

सभा दि. २३/०३/२००५, ठराव क्र. १७९ नुसार कार्यवाही करणेस तसेच सदर ठरावाच्या अनुषंगाने दि. ०१/०३/१९९३ पूर्वीपासूनचे लिपीक या पदास आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करीत असलेल्या परंतु मा. स्थायी समिती सभा दि. २३/०३/२००५ ठराव क्र. १७९ मध्ये समाविष्ट न झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांची लिपीक पदाची सेवाजेष्ठता ही दि. ०१/०३/१९९३ पासून ग्राह्य धरण्यांत यावी व त्याप्रमाणे सेवा पुस्तकात नोंद घेणेंस व येत्या वर्षाच्या येणाऱ्या सेवाजेष्ठता यादीत प्राधान्यक्रमाने नोंद घेऊन, सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करणेंबाबत व त्यानुसार अनुज्ञेय असलेले सर्व फायदे व सवलती देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :-** शशिकांत ना. भोईर **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

९५५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा, दि. ६/१२/२००६

प्रकरण क्र - १०५.
ठराव क्र. - ८०

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत काही इमारती मधिल सदनिकांना/दुकांनाना एकाच दराने कर आकारणी होणे क्रम प्राप्त होते. या कर आकारणी मध्ये सुसुत्रता येणे करीता मा. महासभेने दि. १९/१०/२००५ रोजी ठराव क्र. ५७ पारित करुन वृत्तपत्रांत जाहिरात देवून दि. २३/०६/२००६ पर्यंतच्या अर्जावर प्रशासनाकडून कार्यवाहि केलेली आहे. परंतु वरील नमूद केलेल्या मूदती नंतर आलेल्या अर्जावर प्रशासना कडून समसमान कर आकारणी बाबतची कार्यवाहि झालेली नाही. यामुळे काही नागरीक या समान दर आकारणी पासून वंचित राहिलेले आहेत. या करीता मा.महासभा ठराव क्र.५ दि. १९/१०/२००५ च्या कार्यवाहिचा कार्यकाल 31 मार्च २००७ पर्यंत करावा, तसेच 31 मार्च २००७ पर्यंत प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची योग्य ती छाननी करुन अर्जदारांना समसमान दर आकारणीस हि सभा मंजूरी देत आहे.

सूचक - [signature]

अनुमोदक - अॅड. एस. ए. खान [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१२/२००६
## (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र.१०६ :-**

**सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक ३०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणेबाबत.**

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये उत्पन्नाचे अनेक स्त्रोत आहेत. त्यापैकी अग्निशमन विभागातर्फे कॅपिटेशन फी आकारणेबाबत दि. २०/०३/२००६ रोजीच्या मा. महासभेत ठराव क्र. ९९ पारित करण्यात आला होता. या ठरावानुसार अग्निशमन विभागाने चालू आर्थिक वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कॅपिटेशन फी पोटी ९० लाखाचे उत्पन्न मिळवलेले आहे. आणि आता राहिलेल्या तीन महिन्यामध्ये ५० लाखापेक्षा जास्त उत्पन्न आपल्याला मिळेल अशी शक्यता आहे. त्याबाबत त्यांचे अभिनंदन करुन अभिनंदनाचा ठराव मांडतो. आपण २००६ मध्ये ठराव केलेला आहे. पण राहिलेल्या ज्या इमारती आहेत. त्यांना सुद्धा ह्या ठरावाची अंमलबजावणी करून त्यांच्या कडून मागिल कॅपिटेशन फी वसूल करावी. तसेच अग्निशमन यंत्रणा त्याबाबत राबविण्याची त्यांना सक्ती करावी. तसेच अग्निशमन विभागाने यापुढे सर्व इमारतींना कॅपिटेशन फी आकारून महापालिकेचे उत्पन्न वाढवावे. तसेच परवाना विभागात देखिल उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातुन पावले उचलावीत. २००६-०७ आर्थिक वर्षात परवाना विभागामार्फत परवाना फी दोन - अडीच कोटी वसूल होण्याची तरतुद आहे. पण त्यांच्याकडून २० ते २५ लाखाचीच वसूली झालेली आहे. निश्चितच मिरा भाईंदर महानरगपालिकेमध्ये कारखाने, दुकाने, हॉस्पिटल्स, अन्य काही व्यवसाय जे इथे चालतात त्याच्याकडून त्यांना लायसन्स फी आणि परवाना फी आपण लागू केली तर निश्चितच मिरा भाईंदर महापालिकेचे १० कोटी रुपयाचे उत्पन्न वाढेल. तसे पाहता प्रत्यक्षात फारच कमी वसुली झालेली आहे. तरी परवाना विभागाने महापालिका हद्दीतील दुकाने, कारखाने, टपऱ्या, हॉटेल्स, हॉस्पीटल्स, गॅरेज, गोडाउन, भंगारवाले, व्हिडीओ सेंटर, अधिकृत फेरिवाले इ. सर्व दुकानदारांना परवाना फी आकारावी. तसेच परवाना देण्याबाबत शहरात प्रभागनिहाय कॅम्प लावून फी वसूल करण्याबाबतचा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. प्रियांका करंबेळे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१२/२००६
## (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १०७ :-**

**सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर यांचे दिनांक ३०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - शासनाच्या नियमानुसार बदलीबाबतच्या तिन वर्षाच्या कालावधीचा विचार करुन प्रशासनाने नुकत्याच बदली केलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत.**

**ठराव क्र. ८२ :-**

महानगरपालिका प्रशासनाने नुकत्याच १२ अधिकाऱ्यांच्या प्रशासकिय कामकाजात सुसूत्रता आणण्याकरीता बदल्या केल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या बदल्या किमान तीन वर्षाच्या आत करु नयेत असे शासनाचे नियम आहेत. कारण अधिकारी बदली होऊन एखाद्या पदावर नियुक्त झाल्यावर त्या विभागाच्या समस्या कर्तव्य व अन्य प्रशासकिय कामकाजाची माहिती होण्यातच ३ ते ४ महिने लागतात. व त्यावेळी त्याबाबत पूर्ण माहिती होते. त्यावेळी त्या अधिकाऱ्याची बदली होते व नवीन येणाऱ्या अधिकारी त्या विभागाच्या प्रशासकिय कामकाजात स्थिरस्थावर होण्यास ३ ते ४ महिने घेणार असे चक्र नियमित होत राहिल्यास नागरिकांची कामे निर्णयाविना प्रलंबित राहणार. महानगरपालिकेची सार्वजनिक निवडणूकीचा काळ जवळ आला आहे. व अशा परिस्थितीत आम्हा नगरसेवकांना नागरिकांसमोर जाणे फार अडचणीचे होणार आहे व नागरीकांमध्ये असंतोष निर्माण होत आहे.

यावर महानगरपालिका प्रशासनाने गांर्भियाने विचार व शासनाच्या नियमानुसार बदली बाबतचा ३ वर्षाचा कालावधीचा विचार झालेल्या बदल्यांना स्थगिती आदेश देऊन संबंधित अधिकाऱ्यांकडून ३ वर्षाचा कालावधी देऊन किमान ३ वर्षाच्या कालावधीत परीणामकारक काम करणेंस द्यावे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/१२/२००६
## (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १०८:-**

**सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०१/१२/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तीच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत.**

**ठराव क्र. ८३ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील अंध, अपंगाना टेलिफोन व बुथ देण्यासाठी जागा देणेबाबत नियमावली दि. ३०/८/२००४ रोजीच्या मा. महासभेत ठराव मंजुर झाला असून त्यानुसार शिफारस केलेली नियमावली महाराष्ट्र शासन यांच्याकडून महसूल विभागाच्या दि. २६/४/२००१ च्या शासन निर्णयानुसार अपंगांच्या स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी धोरण निश्चित आहे. केलेल्या अटीशर्टीच्या अधीन राहून नियमावली अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ अन्वये मान्यता दिली आहे. आज महापालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी बेकायदेशीर परवाने देण्यात येत आहेत. यामुळे रस्त्यावर चालणे व वाहणे चालवणे कठीण झालेले आहे. तसेच, ग्रामपंचायत काळापासून नुतणीकरणासाठी दाखले प्रलंबित पडलेले आहेत. करिता यापुढे अपंग व अंध यांना बुथ मंजुर करताना हे महाराष्ट्र शासन नियमावली अ, ब, क प्रमाणे देण्यांत यावेत. तसेच ग्रामपंचायत व नगरपालिके काळापासून ज्या एन.ओ.सी. रिन्युअल केलेल्या नाहीत अशा एन.ओ.सी. रिन्युअल करुन द्याव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल.** **अनुमोदन :- श्री. शिवप्रकाश भुदेका.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २०/०१/२००७

**प्रकरण क्र. १०९ :-**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(२) अन्वये मा. परिवहन समितीच्या रिक्त होणाऱ्या सहा (६) सदस्यांच्या जागी नवीन (सहा) सदस्यांच्या नेणमुकीकरिता.**

**ठराव क्र. ८५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २५(२) अन्वये मा. परिवहन समितीचे ०६ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत :-

१) श्रीम. उमा श्याम पाटील
२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३) श्री. अशोक तिवारी
४) श्री. रेनॉल्ड बेचरी
५) श्री. प्रशांत पालांडे
६) श्री. श्याम मदने

वरील निवृत्त होणारे सदस्यांच्या जागी नवीन सहा सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २५(२) अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस सदस्यांची नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण ०८ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस (१) श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे ह्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे ०७ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) श्री. सुरेश यशवंत भोईर ह्यांनी माघार घेतल्यामुळे ०६ उमेदवार शिल्लक राहिले. मा. परिवहन समिती सदस्य पदी ०६ (सहा) सदस्यांची निवड करावयाची असल्याने व सहा उमेदवार शिल्लक राहिल्याने मा. परिवहन समिती सदस्य या पदाकरिता **(१) श्री. अमर कलानी राउत, (२) श्री. अशोक सुर्यदेव तिवारी, (३) श्री. गुलाम मुस्तुफा अब्दुल वहाब पटेल, (४) श्री. राजेश हरिश्चंद्र परब, (५) श्री. रेनॉल्ड गिल्बर्ट बेचरी, व (६) श्री. श्यामराव शिवराम मदने** ह्या सदस्यांची बिनविरोध निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००७

प्रकरण क्र.११७ :- दि. १२/१०/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ८६ :-

दि. १२/१०/२००६ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- [signature] अनुमोदन :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(962)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००७.

**प्रकरण क्र.** :- ३११
**ठराव क्र.** :- ८७

**विषय :-** **प्रभागनिहाय साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन करण्याच्या कामास मंजूरी देणेबाबत.**

**अ) खाजगीकरणातून प्रभागनिहाय साफसफाई करणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग निहाय साफसफाईची कामे समाधानकारक करण्याच्या दृष्टीने कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे सोयीस्कर होण्यासाठी महापालिका क्षेत्राची एकुण १६ गटात विभागणी करून रस्ते सफाई, गटारे सफाई, आदी साफसफाई कामे खाजगीकरणातून करण्यात येणार असून याकामी आवश्यक लागणारे एकुण १७४६ मजूर व घनकचरा व्यवस्थपन अंतर्गत आवश्यक मजूर घेण्यात यावे. सदर कामगारांना कंत्राटी कामगार किमान वेतन कायदया नुसार मुळ वेतन, दर सहामहीन्यांनी वाढणारे दर, शासन नियमानुसार देण्यात येणारे विविध भत्ते आदी देण्यात यावे तसेच खाजगी करणामार्फत वॉर्ड साफसफाई कामाच्या प्रस्तावास मान्यता देत असून याकामी येणारा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात साफसफाई व सोयी अंतर्गत वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षातून करण्यात यावा.

**ब) घनकचरा व्यवस्थापन :-**

शहरात मोठ्याप्रमाणात नागरीवस्ती, औद्योगिक परिसर, व्यापारी संकुले, बाजार परिसर, दवाखाने, दुकाने त्याचप्रमाणे नव्याने होत असलेले नागरीकरण आदीमधून सध्या दररोज सुमारे ४०० मेट्रीक टन ओला व सुका कचरा निर्माण होत आहे. सदर कच-याचे व्यवस्थापन करणेकामी १६ गटाकरिता आवश्यक असलेली वाहने सध्या कार्यरत असलेल्या पध्दतीनुसार भाडयाने घ्यावी व त्यावर आवश्यक लागणारे कामगार किमान वेतन कायाद्यानुसार कंत्राटदाराकडून घेण्यास व याकामी येणारा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात साफसफाई व सोयी अंतर्गत वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षातून करण्यात यावा.

वरिल दोन्ही प्रस्तावित कामाच्या निविदा एक वर्षाकरिता मागविण्यात याव्यात व याकामी येणा-या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांचे देयके अदा करणे कामी आरोग्य विभागात तरतुद उपलब्ध नसल्याने सदरची तरतुद मनपा.च्या इतर विभागातील अखर्चीत लेखाशिर्षातून वर्ग करणेस हि सभा मंजूरी देत आहे.

(दोन्ही प्रस्तावित)

**सुचक :-** सौ. रिटा शाह।

**अनुमोदक :-** श्री. परशुराम पाटील

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २०/०१/२००७

**प्रकरण क्र. ११२ :-** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेली दारिद्र्य रेषेखालील कुटुंब यादी मा. महासभेच्या निदर्शनास आणून देणे बाबत.

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव तहकूब करण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/०१/२००७**

**प्रकरण क्र.११३ :- दुकाने व आस्थापना यांच्या नामफलकावर मराठी भाषेतील अक्षरे सर्व प्रथम लिहिली जाणे आवश्यक करणेबाबत.**

**ठराव क्र. ८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्व दुकानांवर असलेले नाम फलक मराठी, हिंदी, गुजराथी, इंग्रजी आदी बऱ्याच भाषेत आहेत.

ह्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण १८ सप्टेंबर २००० भाद्र २७ शके १९२२ मध्ये नियम करण्यात आले आहेत. त्यात महाराष्ट्र दुकाने व अस्थापना नियम १९६१ च्या नियम २०(अ) मध्ये विद्यमान परंतुकानंतर काही नवीन भर घालण्यात आली आहे. त्यानुसार देवनागरी लिपी अक्षरे इतर भाषेतील किंवा लिपीतील वापरलेल्या अक्षरांपेक्षा कमी ठळक नसावीत.

तसेच मराठी राजभाषा असल्याने पालिका हद्दीतील दुकाने व अस्थापना यांच्या नामफलकावर मराठी भाषेतील अक्षरे सर्व प्रथम लिहिली जावीत असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** प्रभात पाटील

**अनुमोदक :-** [signature]

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/०२/२००७.**

**प्रकरण क्र. ११५ :- दि. १७/११/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ८९ :-**

दि. १७/११/२००६ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन :-** श्री. प्रेमनाथ पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००७

**प्रकरण क्र. ११५ :-** परिवहन उपक्रमासाठी बस गाड्यांची पार्किंग करण्याकरिता महानगरपालिका विकास आराखड्यातील आरक्षणे परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. महासभेस विनंती करणे. (परिवहन समिती सभा दि. २०/१२/२००६ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. ५२ अ)

सदरचा विषय गोषवारा नसल्यामुळे मा. महापौर यांच्या आदेशानुसार पुढील सभेत घेण्याचे ठरले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००७

**प्रकरण क्र. ११६ :-** परिवहन उपक्रमासाठी डेपो, (आगार) बस स्थानक बांधणेकरीता महानगरपालिका विकास आराखड्यातील आरक्षणे परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा. महासभेस विनंती करणे. (परिवहन समिती सभा दि. २०/१२/२००६ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. ५२ ब)

सदरचा विषय गोषवारा नसल्यामुळे मा. महापौर यांच्या आदेशानुसार पुढील सभेत घेण्याचे ठरले.

**सही/-**
**महापौर**
***मिरा भाईंदर महानगरपालिका***

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००७

**प्रकरण क्र. ११७ :-** सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहान यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रिक्त असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुशेष भरणेबाबत.

सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००७

प्रकरण क्र. ( ११६ )

ठराव क्र. ( ९० )

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री देवीदास गंगाधर पाटील व श्री संतोष भाऊराव पाटील यांची शिपाई या पदावर दि. २०/१०/२००६ पासून कायम स्वरूपी नेमणूक करण्याबाबत जा.क्र.मनपा/आस्था/१३१२/ २००६-०७ दि. २०/१०/२००६ च्या आदेशानुसार कळविण्यात आले आहे. परंतु सदर कर्मचारी हे तात्कालीन नगरपरिषद असताना पासून काम करीत आहेत. १ जून १९९२ पासून शिपाई पदावर काम करीत असून तशी नोंद सेवापुस्तकात सुध्दा घेण्यात आलेली आहे. मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०६/९७ ठराव क्र. २० व मा. स्थायी समिती सभा दि. १७/०४/९७ ठराव क्र. १९ (अ) अन्वये आवश्यक मंजू-या घेण्यात आल्या आहेत. सदर कर्म-यांनी महानगरपालिकेने १ जून १९९२ पासून कायम करण्याबाबत मागणी केलेली आहे, परंतु प्रशासनाने दि. २०/१०/२००६ पासून कायम करण्याचे आदेश काढल्याने सदर दोन्ही कर्मचा-यांचे नुकसान होणार आहे. तरी श्री देविदास पाटील व श्री संतोष पाटील यांना शिपाई या पदावर दि. १ जून १९९२ पासून कायम नेमणूकीचे आदेश, सेवाजेष्ठता देण्यास व सेवाजेष्ठतेची सेवापुस्तकात नोंद घेण्यास, नियमानुसार असलेले सर्व फायदे, फरक देण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

सुचक :- (सही) प्रभात पाटील

अनुमोदन :- (सही) संगीता म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

(सही)
पिठासन अधिकारी
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००७

**प्रकरण क्रमांक ( ११९ ) :-**

**ठराव क्रमांक :- ( ८१ )**

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर १) श्री. प्रकाश पांडुरंग पाटील २) श्री. विलास हरीभाउ साळवी हे दि. २३/०५/१९९४ तसेच ३) श्री. सुनिल शांताराम लोनुप्टे ४) श्री. सदानंद गोविंद धुरी हे दि. ०४/११/१९९५ पासुन तत्कालीन नगरपालिका असताना ठेका पध्दतीने वाहन चालक पदावर काम करीत आहेत. त्यांची नेमणूकी ही मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०९/१९९७ ठराव क्र. ४१ (ई) व तद्नंतर मा. सर्व साधारण सभा दि. ०३/११/१९९९ ठराव क्र. २७७ (१५०) अन्वये मंजूरी प्राप्त आहे.

वरील चारही कर्मचारी आजपर्यंत वाहन चालक या पदावर काम करीत असुन आज त्यांचे वय ही वाढलेले आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक या संवर्गातील काही पदे मंजूर आहेत. तसेच वाहन चालक पदावरील काही कर्मचारी हे शारीरीक दृष्टया सक्षम नसल्याने वाहन चालकाचे काम न करता लिपिक व समान वेतन श्रेणीवर इतर कामे करीत आहेत. त्यांच्याऐवजी वाहन चालक म्हणून वरील चार कर्मचारी काम करीत आहेत. सदर चार कर्मचा-यांचे वय ही वाढलेले आहे. तरी सदर चार वाहन चालकांना वाहन चालक या पदनामाची पदे मंजूर करून कायमस्वरूपी नेमणूक करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- प्रेमनाथ पाटील

अनुमोदन :- सौ. संगिता विजय म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

**सभापती**
**स्थायी समिती**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## महासभा दि. २०/०२/२००७

**प्रकरण क्र. १२० :-** सन्मा. सदस्य श्री. लिओ इजिदोर कोलासो यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो हे सभेस उपस्थित नसल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/०२/२००७**

**प्रकरण क्र. १२१ :- सन्मा. सदस्य श्री. शशिकांत आर. शाह यांचे दिनांक १२/०२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारे सर्व परवाने (एन.ओ.सी.) मार्केट परवाना विभागामार्फत देणेबाबत.**

**ठराव क्र. ९२ :-**

प्रकरण क्र. १२१ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३ व ३७६ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग व्यवसाय धारकांना परवाना द्यायची परवानगी सुरु केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे. मात्र विविध प्रकारच्या उद्योग व्यवसायधारकांना महापालिकेच्या विविध विभागामार्फत परवाना देण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. वास्तविक सर्व प्रकारचे परवाने, एन.ओ.सी. हे महानगरपालिकेचे मार्केट परवाना विभागामार्फत देणे आवश्यक आहे. या उपर विविध व्यवसाय धारकांना परवाना, एन.ओ.सी. मिळणेकरीता अर्ज दिल्यानंतर संबंधित विभागाने त्याबाबत अभिप्राय देवून त्यांना परवाने, एन.ओ.सी., "मार्केट परवाना विभागा" मार्फत देण्यात यावे. परस्पर इतर विभागाने परवाने देवू नये असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. शशिकांत शाह.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००७

**दु:खवटा ठराव ९२(अ) :-**

काल अटहारी एकस्प्रेसला जी समझौता एक्स्प्रेस म्हणुन दोन देशातल्या सामंजस्य करारावर आधारीत म्हणुन भारत आणि पाकीस्तान दरम्यान धावते आहे. त्या एक्स्प्रेसवर काल काही घातकी विनाशक शक्तींनी बॉम्बस्फोट घडवुन आणले आणि त्यामध्ये सदुसष्ट लोकांचे बळी गेलेले आहेत. तसेच महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री प्राध्यापक श्री. सदानंद वर्दे साहेब तसेच श्री. अमित विलास विचारे हे नालासोपारा येथे राहतात पण श्री. विलास विचारे यांचे सुपुत्र आहेत त्यांचे देखील या दरम्यान निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दु:खवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/०३/२००७

**प्रकरण क्र. १२२ :-** **मिरा भाईदर महानगरपालिकेचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. २००)**

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या सन २००६/२००७ सुधारित व सन २००७/२००८ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि.२८/२/२००७ विचारात घेवून व शासनाचे नियमानुसार जकातीची रक्कम कायम करुन मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००६/०७ चे सुधारीत व सन २००७/०८ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| उत्पन्न | ''अ'' अंदाजपत्रक | २४४५३.६५ | २००७-०८ | खर्च | ''अ'' अंदाजपत्रक | २२९६९.६५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | ''ब'' अंदाजपत्रक | १२७७.०० | | | ''ब'' अंदाजपत्रक | १५२३.०० |
| | ''क'' अंदाजपत्रक | ७२९३.३० | | | ''क'' अंदाजपत्रक | ८४४३.३० |
| | वृक्षप्राधिकरण | १६२.२५ | | | वृक्षप्राधिकरण | २४५.२५ |
| | | | | | अखेरची शिल्लक | ५.०० |
| | एकूण | ३३१८६.२० | | | एकूण | ३३१८६.२० |

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/३/२००७

**प्रकरण क्र. १२३ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १९९)

**ठराव क्र. ९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००६/२००७ सुधारित व सन २००७/२००८ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १९८ दि. २८/२/२००७ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसहाव दुरुस्तीसहासन २००६/०७ चे सुधारीत व सन २००७/०८ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | "ब" अंदाजपत्रक | **१२७७.००** | **२००७-०८** | **खर्च** | "ब" अंदाजपत्रक | **१५२३.००** |
| | "अ" अंदाजपत्रक हस्तांतरण | **२५०.००** | | | अखेरची शिल्लक | **४.००** |
| | | | | | | |
| | **एकूण** | **१५२७.००** | | | **एकूण** | **१५२७.००** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १७/३/२००७

**प्रकरण क्र. १२४ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १९८)

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००६/२००७ सुधारित व सन २००७/२००८ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि. २८/२/२००७ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसहाव दुरुस्तीसहासन २००६/०७ चे सुधारीत व सन २००७/०८ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | वृक्षप्राधिकरण | १६२.२५ | २००७-०८ | **खर्च** | वृक्षप्राधिकरण | २४५.२५ |
| | "अ" अंदाजपत्रक हस्तांतरण | ८३.०० | | | | |
| | | | | | | |
| | **एकूण** | २४५.२५ | | | **एकूण** | २४५.२५ |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- ॲड. एस.ए.खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

९०५

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## महासभा दि. १७/३/२००७

**दुःखवटा ठराव ९६ :-**

आपल्या सदनातील नगरसेवक नितीन ठाकूर यांचे ''काका'' आणि भाईंदर येथील एक प्रसिद्ध उदयोगपती मोरेश्वर बाळाराम ठाकूर, राममंदिर येथील बऱ्याचशा व्यक्ति, स्थानिक निळकंठ पाटील ह्यांची पत्नी तसेच मुर्धा गावातील रामचंद्र भोईर यांचे दुखःद निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## महासभा दि. १७/३/२००७ (दु. ३.०० वा.)

प्रकरण [illegible]२५, १२६ व पुरक घोषणा प्रकरण क्र. १२७ :-

कोरम अभावी सभा रद्द करण्यात आली.